# घटक-१

## ऐतिहासिक भाषाविज्ञान

**(ऐतिहासिक भाषाविज्ञानाची भूमिका, ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे, ऐतिहासिक आणि तौलनिक भाषाभ्यास, बहुभाषिक व एकभाषिक पुनर्रचन)**

**घटक रचना :**


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ भाषा आणि भाषाभ्यास पद्धती

१.४ ऐतिहासिक भाषाविज्ञान

१.५ ऐतिहासिक भाषा विज्ञानाचा विकास

१.६ ऐतिहासिक भाषा विज्ञानाची मूलतत्त्वे

१.७ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे

 १.७.१ पुरोगामी

 १.७.२ पश्चाद्गामी

१.८ ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचन पद्धती

 १.८.१ तौलनिक अथवा बहुभाषिक पुनर्रचन पद्धती

 १.८.२ अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती

१.९ ऐतिहासिक भाषा विज्ञानाच्या मर्यादा

१.१० समारोप

१.११ संदर्भग्रंथ

१.१२ सरावासाठी प्रश्न


## १.१ उद्दिष्टे

- ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीची भूमिका, कार्यपद्धती समजून घेणे.
- ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती, तौलनिक भाषाभ्यास पद्धती आणि वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचा सहसंबंध लक्षात घेऊन त्यांचा परस्परांच्या कार्यपद्धतीमधील हस्तक्षेप लक्षात घेणे.
- भाषाकुलाची संकल्पना व कोणत्याही भाषेच्या कुलनिश्चीतीमधील ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे महत्त्व स्पष्ट करणे.

munotes.in

- तौलनिक व अंतर्गत पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप लक्षात घेऊन या दोहोंच्या द्वारे कोणत्याही भाषेच्या जनक भाषेचे पुनर्रचन करण्याची पद्धती समजून घेणे.
- ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या मर्यादा व तिच्यावर वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीच्या उगमातून झालेले आक्षेप साधार पाहणे.
- भाषिक परिवर्तनाचा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने या अभ्यास पद्धतीचे महत्त्व लक्षात घेणे.

## १.२ प्रस्तावना

भाषा ही एक सामाजिक व सांस्कृतिक संस्था आहे. इतर अन्य संस्थांप्रमाणेच तिचेही एक शास्त्र प्राचीन काळापासून विकसित होत आले आहे. भाषेच्या अभ्यास पद्धतीला भाषाविज्ञान असेही म्हटले जाते. भाषेचा अभ्यास हा व्याकरणिक पातळीवर प्राचीन काळापासून होत आला असला तरी भाषाविज्ञानाचे अभ्यासक्षेत्र विसाव्या शतकामध्ये उदयास आल्याचे दिसून येते. वैदिक परंपरेतील पाणिनीय व्याकरणासारख्या अत्यंत सूत्रबद्ध अभ्यासाची काही उदाहरणे प्राचीन भाषाभ्यासामध्ये सांगता येतील. भारतीय परंपरेबरोबरच पाश्चात्त्य परंपरेतही लॅटिन भाषेचा विविध टप्प्यावर अभ्यास झालेला आढळून येतो. हा परंपरागत भाषाभ्यास त्या त्या काळात प्रचलित असलेल्या अभ्यास पद्धतीनुसार होत होता. या अभ्यास क्षेत्रांमध्ये एकोणिसाव्या शतकात पारंपरिक व आधुनिक असे दोन दृष्टिकोन उदयास आले. भाषा अभ्यासाचे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र या काळात विकसित झाले नव्हते. हा अभ्यास तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, साहित्याभ्यास, धर्मशास्त्र, इतिहास यांसारख्या अभ्यास क्षेत्रांमध्ये उपस्थित होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या निमित्ताने होत असे. आधुनिक काळात मात्र भाषेला अन्य समस्यांपासून वेगळे काढून तिच्या अभ्यासाचे एक स्वतंत्र व स्वायत्त क्षेत्र निश्चित होत गेले. त्यातूनच आधुनिक भाषा विज्ञानाच्या विविध अभ्यास शाखा अस्तित्वात आल्याचे दिसून येते. या अभ्यासपद्धती मधील एक महत्त्वाची अभ्यास पद्धती म्हणून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा विचार केला जातो.

## १.३ भाषा व भाषाभ्यास पद्धती

संदेशवहन व अर्थवहनाच्या गरजेतून भाषेची निर्मिती झाली. म्हणजेच संदेशवहनाच्या पूर्ततेसाठी मानवी व मानवेतर समाजाने कालोघात जी चिन्हव्यवस्था निर्माण केली तिला भाषा असे म्हणतात. विशिष्ट भौगोलिक, सांस्कृतिक व सामाजिक समूहांच्या वेगवेगळ्या भाषा आढळून येतात. त्याचप्रमाणे विविध भाषांमधील कालक्रमिक परिवर्तनाच्या आधारे मानवी इतिहासामध्ये अनेक भाषांच्या विभिन्न अवस्थांचा शोध भाषाभ्यासाच्या क्षेत्रामध्ये घेतला गेला आहे. भाषाभ्यासाच्या विविध तर्क पद्धतीच्या आधारे तिच्या वेगवेगळ्या अभ्यास पद्धती मानल्या गेल्या आहेत. त्यामध्ये ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती, तौलनिक भाषाभ्यास पद्धती व वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती या महत्त्वाच्या अभ्यास पद्धती मानल्या गेल्या आहेत. या अभ्यास पद्धती भाषेच्या विस्तृत व सर्वांगीण अभ्यासाच्या क्रमात एकमेकीला पूरक ठरतात. कारण भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासामध्ये त्या त्या काळातील भाषिक रूपांमधील परिवर्तने समजून घेण्यासाठी उपलब्ध साधन सामग्रीचा वर्णनात्मक अभ्यास क्रमप्राप्त ठरत असतो. त्याचबरोबर भाषेच्या विकासक्रमात तिचा अन्य भाषांशी आलेला संबंध तपासताना व एकाचा भाषेच्या वेगवेगळ्या

munotes.in

काळातील विभिन्न भाषिक रूपांचा अभ्यास तौलनिक भाषाभ्यास पद्धती मध्ये अंतर्भूत होतो. या अर्थाने वर्णनात्मक व तौलनिक भाषाभ्यास पद्धती ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीला पूरक ठरतात.

बदलत्या प्रदेशानुसार बदलत्या बोलींचा अभ्यास बोलीभूगोल या अभ्यास शाखेमध्ये केला जातो. बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या भाषिक संरचनेचा अभ्यास ऐतिहासिक भाषा विज्ञान या अभ्यास शाखेत केला जातो. कोणत्यातरी एखाद्या कालखंडातील भाषिक संरचनेला अपरिवर्तनीय व स्थिर मानून तिच्या संरचनेच्या व्यवच्छेदक अभ्यास वर्णनात्मक भाषा विज्ञानामध्ये केला जातो. विभिन्न कालखंडातील वेगवेगळ्या भाषिक रूपांचा व दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषांच्या भाषिक रूपांचा तुलनात्मक अभ्यास करुन एका वेगळ्या प्राचीन भाषेची पुनर्रचना तौलनिक भाषाभ्यासात केली जाते. समाजातील विभिन्न सामाजिक व सांस्कृतिक घटिते बोलींना भाषेपासून वेगळे करत असतात. भाषेला व बोलींना प्रभावित करणाऱ्या या सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव क्षेत्रांचा अभ्यास समाज भाषाविज्ञान या अभ्यास शाखेत केला जातो. या प्रमुख अभ्यास पद्धतीं बरोबरच व्यतिरेकी भाषाविज्ञान, भाषांतर विज्ञान, वाक्यचिकित्सा, कोशशास्त्र, व्याकरण अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून भाषिक संरचनेचा अभ्यास केला जातो.

या भाषाभ्यास पद्धतींच्या सहसंबंधावर प्रकाश टाकणारे पुढील विधान या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. ग्रीक, लॅटिन व संस्कृत ह्या एकाच प्राचीन भाषेपासून निघाल्या, हे सिद्ध करण्याचे मुख्य साधन म्हणजे ह्या भाषांचा सांगोपांग वर्णनात्मक अभ्यास हे होय. त्या त्या भाषेच्या एककलिक स्वरूपाचा अभ्यास असा झाला. नंतर त्याचा तौलनिक अभ्यास झाला. ह्या दोन्ही प्रकारच्या अभ्यासाच्या आधारेच ह्या भाषांचा एक इंडो-युरोपियन म्हणून भाषावंश ठरला. तो बोलणारे सर्व लोक आर्यवंशी ठरले. हीच अभ्यासाची पद्धती इतर भाषांना लावून त्यांचे ही वंश निश्चित केले. भाषेच्या अभ्यासाची ही पद्धत ऐतिहासिक व तौलनिक म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या पद्धतीपासून ऐतिहासिक व तौलनिक भाषाशास्त्र फलित झाले. (कृ.पा. कुलकर्णी : २००९ : ८५) या अर्थाने कालानुरुप होत आलेली भाषिक परिवर्तने व कालक्रमात घडून आलेले विविध भाषांमधील ध्वनी, व्याकरण व शब्द संग्रहाच्या पातळीवरील आंतरव्यवहार तपासून एका प्राचीन भाषेचे पूनर्रचन करण्यासाठी ऐतिहासिक व तौलनिक भाषाभ्यास पद्धतीचा उपयोग केला जातो. अर्थात या क्रमामध्ये गरजेनुसार अन्य अभ्यास पद्धतींचा ही उपयोग होत असतो. या अर्थाने या सर्व भाषाभ्यास पद्धती परस्पर विरोधी नसून परस्पर पूरक आहेत असेच म्हणावे लागते. या अभ्यासपद्धती मधील ऐतिहासिक भाषाविज्ञान या अभ्यासपद्धतीचा विचार आपल्याला प्रस्तुत प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

## १.४ ऐतिहासिक भाषाविज्ञान

सर विल्यम जोन्स यांनी ऐतिहासिक भाषा विज्ञानाचा पाया घातला. इ.स. १७८६ मध्ये कोलकाता येथे झालेल्या एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात त्यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांचा सहसंबंध शोधणारा एक निबंध वाचला. या निबंधातून त्यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमध्ये आढळणारी साम्यस्थळे अधोरेखित करुन भाषाभ्यासाचा नवा दृष्टिकोन मांडला. या भाषांमधील हे घनिष्ठ व खोलवर रूजलेले साम्य पाहता त्या साम्याचा व सहसंबंधांचा शोध घेऊन ही साम्यस्थळे आढळणाऱ्या भाषा कोणत्या तरी एका भाषेतून उद्भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते. हे गृहितक केंद्रभागी ठेवून त्यांनी इंडो-युरोपियन भाषाकुलातील

विविध भाषांचा अभ्यास केला. या भाषांच्या मुळाशी असलेली भाषा आज आपणास उपलब्ध नाही.

## १.५ ऐतिहासिक भाषा विज्ञानाचा विकास

भाषेचा अभ्यास हा प्राचीन काळापासून होत असला तरी तो अत्यंत पारंपरिक आणि व्याकरणिक संरचनेपुरताच होत होता. हा अभ्यास पाश्चात्त्य व पौर्वात्य या दोन्ही संस्कृतीमध्ये झाल्याचा दिसून येतो. परंतु सतराव्या शतकातील पाश्चात्त्य संशोधकांनी केलेले देशाटन व त्यातून झालेले भौगोलिक संशोधन यातून नव्या संस्कृतींचा परिचय त्यांना झाला. यातून त्यांची संस्कृती निरीक्षणाची प्रवृत्ती वाढीस लागली. या निरीक्षणासाठी उपलब्ध सामग्रीमधील महत्त्वाची सामग्री म्हणजे बायबल आदी ग्रंथामधील पारंपरिक कथा. जेव्हा या कथांचा अभ्यास केला जाऊ लागला तेव्हा या कथा ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या संदिग्ध वाटू लागल्या, अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. त्या साहित्यासाठी वापरल्या गेलेल्या भाषा-भाषांमधील वैविध्य आणि सारखेपणा स्पष्ट होऊ लागला. पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये बायबलच्या सुरु झालेल्या या चिकित्सेतूनच एकोणिसाव्या शतकात ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे सुतोवाच झाले. त्याच काळात अत्यंत शास्त्रीय व वैज्ञानिक मानल्या जाणाऱ्या या अभ्यास पद्धतीमध्ये भाषांच्या कुलसंबंधी संशोधनाला सुरुवात झाली. ही संकल्पना पुढे विसाव्या शतकात आधुनिक भाषाविज्ञानाच्या रूपाने भाषाभ्यासाचे अनेक वेगवेगळे दृष्टिकोन विकसित झाले त्यातील एक महत्त्वाची अभ्यास शाखा म्हणून या अभ्यास पद्धतीचा विकास झाला.

पंधराव्या व सोळाव्या शतकात घडलेल्या विद्येच्या पुनरुज्जीवानामुळे या समजुतींना धक्के बसले. धार्मिक दृष्टिकोनाचे प्राबल्य ओसरुन धर्मग्रंथ, प्राचीन महाकाव्य, जुनी हस्तलिखिते इ. संहितांची चिकित्सा अधिक साक्षेपाने होऊ लागली. ही चिकित्सा शैलीच्या अंगाने करुन त्यावरुन या संहितांची कालनिश्चिती अधिक नेमकेपणाने होऊ लागली. या संहिताचिकित्सेला फिलॉलोजी (Philology) असे नाव युरोपीय विशेषतः जर्मन परंपरेत मिळाले. त्या वाङ्मयीन संहिता चिकित्सेसाठी भाषेचा, विशेषतः भाषातिहासाचा, तसेच भाषेच्या तुलनेचा अभ्यास अत्यावश्यक ठरु लागला. (मिलिंद मालशे : १९९९ :३२) या अर्थाने युरोपीय अभ्यास परंपरेत बायबल व जेनेनिस या प्राचीन ग्रंथांच्या संहितालक्ष्यी व शैलीवैज्ञानिक चिकित्सेतून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती उदयास आली असे म्हणता येते. त्याचबरोबर सोळाव्या व सतराव्या शतकामध्ये झालेले भौगोलिक शोध व सांस्कृतिक सहचर्यातून निर्माण झालेली भाषिक पातळीवरील सारखेपणा व वेगळेपणाची भावना या अभ्यासासाठी उपयुक्त ठरली.

युरोपीय लोकांचा व्यापार व तत्सम कारणांमुळे भारतासारख्या प्राचीन, सांस्कृतिक व साहित्यिक परंपरा लाभलेल्या प्रदेशाशी ओळख झाली. यामध्ये संस्कृत भाषेसारख्या प्राचीन भाषेशी या युरोपीय लोकांचा परिचय झाला. यातून त्यांच्यामध्ये भाषाभ्यासाचे नवे दृष्टिकोन विकसित होत गेले. याचाच एक भाग म्हणून सर विल्यम जोन्स यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटीन या भाषांच्या प्राचीन रूपांचा तुलनात्मक अभ्यास करुन १७८६ मध्ये संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे यादृच्छिक नसून या भाषांमागे एकच जनक भाषा असावी असा तर्क मांडला. या सूत्राचा तपशीलवार शोध घेण्याच्या क्रमातच भाषेच्या ऐतिहासिक व तुलनात्मक

अभ्यास पद्धती उदयास आल्या. त्याच्या मते या भाषांमधील सारख्या अर्थाचे शब्द तपासले तर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ध्वनीसाम्ये ही आढळतात.

उदा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| संस्कृत | p | i | t | a | r |
| ग्रीक | p | a | t | e | r |
| लॅटिन | p | a | t | e | r |
| इंग्लिश | t | a | th | e | r |

(मिलिंद मालशे : १९९९ : ३२)

या उदाहरणातून संस्कृत, ग्रीक, लॅटिन व इंग्रजी भाषेतील शब्दांचे विभिन्न भाषांमधील ध्वनी व अर्थ साधर्म्याच्या आधारे या भाषा एककुलोत्पन्न असल्याचे मान्य करावे लागते. त्याचबरोबर या प्राचीन भाषांचीही एक वेगळी जनक भाषा कल्पून या ध्वनी साम्याच्या आधारे एका जनक भाषेचे पुनर्रचन करण्याची कार्यपद्धती दर्शविली आहे.

## १.६ ऐतिहासिक भाषा विज्ञानाची मूलतत्त्वे

ध्वनी विचार, व्याकरण विचार, रिती विचार या अभ्यास पद्धतींच्या द्वारे भारतीय परंपरेमध्ये प्राचीन काळापासून भाषेचा अभ्यास होत आलेला आहे. एवढेच नव्हे तर भाषेची कालसंगत, स्थलसंगत, समूहसंगत अशी बदलणारी वेगवेगळी रूपे ही या अभ्यास पद्धतींमध्ये विचारात घेतल्याचे आढळते. या अर्थाने भाषा परिवर्तन व ध्वनी परिवर्तन या भाषाभ्यास क्षेत्रांमध्ये वैदिक काळापासून अभ्यास झाल्याचे दिसून येते. यामध्ये परकीय भाषेच्या प्रभावापासून स्वभाषेच्या अपभ्रंशापर्यंत विविध पैलूंचा विचारही केल्याचे दिसून येते. भारतीय विचार परंपरेपुरता विचार करायचा झाल्यास ध्वनी संरचना व शब्द संग्रहामध्ये भाषेच्या विकासात परिवर्तने होत असतात ही जाणीव सर विल्यम जोन्स यांच्या प्रस्तुत प्रतिपादनाच्या पूर्वीही भारतीय परंपरेत अस्तित्वात होती.

समान स्थळे आढळणाऱ्या दोन किंवा त्याहून अधिक भाषा कोणत्यातरी एकाच भाषेतून उद्भवल्या असाव्यात हा विल्यम जोन्स यांचा विचार नवीन होता. सर विल्यम जोन्स यांनी कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीच्या अधिवेशनामध्ये सादर केलेल्या निबंधामधून दोन नवीन कल्पना भाषाभ्यासामध्ये स्थापित केल्या. एक संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांची जननी एकच मानावी. ती बहुधा आज अस्तित्वात नाही. अस्तित्वात नसलेल्या भाषेपासून उपलब्ध भाषेची उत्पत्ती मानायची ही सर विल्यम जोन्स यांची कल्पनाच मुळात पारंपरिक अभ्यास पद्धतींना व विचार पद्धतींना धक्का देणारी होती. परंतु कोणत्याही भाषेची पूर्वावस्था माहीत नसली तरी भाषेमध्ये आढळणाऱ्या पुराव्यांच्या आधारे तिचे पुनर्रचना करुन नवी भाषिक व्यवस्था कल्पिता येते. ही पुनर्रचन तौलनिक आणि अंतर्गत अशी दोन पद्धतीने करता येते. यामध्ये तौलनिक पुनर्रचन ही बहुभाषिक स्वरूपाची असते. तर अंतर्गत पुनर्रचन एकभाषिक किंवा वर्णनात्मक स्वरूपाची असते.

नियमानुसारी होणारे ध्वनी परिवर्तन हे पुनर्रचनात्मक पद्धतीचे महत्त्वाचे गृहीतक मानले जाते. भाषेच्या इतिहासात जी परिवर्तने घडून येतात ती नियमानुसार होत असतात. ही परिवर्तने काही शब्दात अशी तर काही शब्दात तशी अशी अनियमितपणे घडणारी नसतात. त्यामध्ये एक कालसंगती व तर्कसंगती नैसर्गिकपणे अंतर्भूत असते. त्यामुळे भाषेच्या उपलब्ध व प्राचीन अवस्थेची पुनर्रचना करणे शक्य होते. यातून भाषेच्या प्राचीन रूपापर्यंत जाणे शक्य होते. अशाप्रकारे भाषेच्या ऐतिहासिक रूपांचा शोध तिच्यामध्ये होणाऱ्या नियमबद्ध परिवर्तनामुळे शक्य होतो. हे गृहीतक ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या मुळाशी कार्यरत असते.

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीमध्ये भाषाकुलाच्या संकल्पनेला जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषांचा त्यांच्यातील कालक्रमामध्ये होणाऱ्या बदलांच्या व साम्यस्थळांच्या आधारे अभ्यास करुन त्यांचे वर्गीकरण करणे व समान गुणधर्म दाखवणाऱ्या भाषांना एकाच जनक भाषेतून उद्भवलेल्या भाषाभगीनी मानने भाषाकुलाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे. ही या भाषिक पुनर्रचनेत आढळणारी साम्यस्थळे व्याकरणिक स्वरूपाची असतात. त्याचबरोबर कालसंगत ध्वनी व अर्थ परिवर्तनांना देखील यामध्ये महत्त्व प्राप्त होते. मूलभूत शब्दकोश व रूपव्यवस्थेमध्ये आढळणाऱ्या संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपाच्या साम्यस्थळांचा विचार या भाषिक पुनर्रचनेमध्ये केंद्रभागी असतो. त्यामध्ये यादृच्छिक भाषा व्यवहाराला व शब्दकोशाच्या पातळीवर झालेल्या भाषिक उसनवारीला जास्त महत्त्व नसते. या अभ्यास पद्धतीमध्ये अंतर्भूत असलेल्या भाषिक रूपांचा व परिवर्तनांचा मागोवा घेऊन पुनर्रचनेद्वारे भाषेच्या प्राचीन अवस्थेपर्यंत पोहोचणे शक्य आहे.

सर विल्यम जोन्सच्या विधानात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एकतर त्याने भाषिक साम्याच्या आधारे एका भाषाकुलाची कल्पना केली आणि दुसरे असे की, ह्या भाषांची जननीभाषा जी कोणती असेल ती आता बहुधा अस्तित्वात नसल्याचे त्याने मानले. त्याने वरील विधान करण्यापूर्वी एखाद्या उपलब्ध नसलेल्या भाषेतून म्हणजे ज्या भाषेचे पुनर्रचना करायला हवे अशा भाषेतून उपलब्ध भाषांची उत्पत्ती कल्पिल्याचे धारिष्ठय कुणी केले नव्हते. त्यामुळे उपलब्ध भाषांपैकी त्यातल्या त्यात प्राचीन वाटणाऱ्या भाषेतून, संस्कृतातून इतर भाषांची किंवा ग्रीकमधून लॅटिन भाषेची, उत्पत्ती दाखविण्याचे हास्यास्पद प्रयत्न होत असत. जोन्सच्या या विधानाने हे अशास्त्रीय उद्योग बंद पडले व तौलनिक ऐतिहासिक भाषाशास्त्र उदयाला आले. (म.अ. मेहेंदळे : १९७९: ६) थोडक्यात ऐतिहासिक भाषाभ्यासाचे महत्त्वाचे योगदान म्हणजे भाषाकुलाची कल्पना करुन तिने इंडो-युरोपियन भाषाकुलाची विस्तृत मांडणी केली. याच्या आधारे पुढे विभिन्न भाषांमधील साम्यस्थळे शोधून इतर भाषाकुलांची रचना केली गेली. या अभ्यास पद्धतीमध्ये सर्व भाषांना एकभाषोद्भव मानण्याचाही एक अतेरेकी प्रघात झाला. ज्या भाषा आपण एकाच भाषाकुलातील आहेत असे मानतो त्या सर्व भाषा इतिहास क्रमामध्ये कोणत्यातरी एकाच भाषेतून हळू हळू निर्माण झाल्या आहेत. असे या अभ्युपगमामध्ये मानले गेले.

कोणत्यातरी भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासामध्ये त्या भाषेच्या प्राचीन साहित्यामध्ये उपलब्ध भाषिक रूपांना अनन्यसाधारण महत्त्व असते. त्याचबरोबर ती भाषा ज्या भाषेतून निर्माण झाली त्या भाषेच्या रूपांनाही या ठिकाणी महत्त्व असते. उदा. मराठी, हिंदी, गुजराती, नेपाली या भाषांचे मूळ संस्कृत भाषेमध्ये शोधले जाते आणि ते सापडतेही. या उत्तर भारतातील देवनागरी लिपीतील अर्वाचीन भाषांचा सहसंबंध शोधण्याच्या क्रमामध्ये संस्कृत साहित्याचा फार उपयोग होतो. संस्कृत भाषा साहित्याच्या रूपात उपलब्ध असल्यामुळे या आर्य भारतीय भाषांच्या

ऐतिहासिक अभ्यासामध्ये भाषिक पुनर्रचना या पद्धतींची तितकीशी गरज पडत नाही. परंतु तामिळ, तेलगु, कन्नड या दक्षिण भारतीय द्राविडी भाषांमधील संगती शोधताना तिच्या प्राचीन रूपाकडे जाताना या भाषा ज्या भाषेतून निर्माण झाल्या आहेत त्या भाषेची भाषिक रूपे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या भाषांच्या ऐतिहासिक प्रारूपांचा शोध घेताना भाषिक पुनर्रचना पद्धतीचा उपयोग होतो. थोडक्यात ज्या भाषांच्या प्राचीन रूपांचे नमुने अभ्यासासाठी उपलब्ध होत नाहीत त्या भाषेच्या अभ्यासामध्ये पुनर्रचना प्रक्रिया उपकारक ठरते.

## १.७ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अंगे

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीची पुरोगामी व पश्चाद्गामी ही दोन अंगे मानली जातात.

### १.७.१ पुरोगामी :

या तर्क पद्धतींमध्ये भाषेच्या उपलब्ध प्राचीन रूपांचा अभ्यास करुन कालक्रमात तिच्या मध्ये झालेल्या ध्वनी, व्याकरण व शब्द संग्रहात्मक पातळीवरील परिवर्तनाचा एक आलेख मांडला जातो. त्यामध्ये भाषेच्या पूर्वावस्थेवरुन तिच्या विभिन्न काळातील विभिन्न अवस्थांचा व विकास विस्ताराचा अभ्यास केला जातो. उदा. संस्कृत भाषेच्या भाषिक रूपांच्या आधारे प्राकृत, अपभ्रंश व आजच्या अर्वाचीन भारतीय भाषांच्या विविध अवस्थांचा मागोवा पुरोगामी ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या तर्क पद्धतीनेच घेतला जातो. आर्य भारतीय भाषाकुलातील अनेक भाषांचा अभ्यास या भाषाभ्यास पद्धती द्वारे केला गेला आहे.

### १.७.२ पश्चाद्गामी :

प्रत्येक वेळी सर्व भाषांची प्राचीन रूपे अभ्यासासाठी उपलब्ध असतीलच असे नाही. अनेक वेळा मूळ भाषेची भाषिक रूपे अनुपलब्ध असतात. अशा वेळी त्या भाषेची पूर्वावस्था माहिती नसल्यामुळे व तिची लिखित व मौखिक रूपे उपलब्ध नसल्यास उपलब्ध भाषांमधील भाषिक रूपांच्या आधारे त्यांच्यातील साम्यस्थळे निश्चित करुन अशा जनक भाषेच्या पूर्वावस्थेचे पुनर्रचना केले जाते. भाषाभ्यासाच्या या तर्क पद्धतीला पश्चाद्गामी ऐतिहासिक भाषाविज्ञान असे म्हटले जाते. थोडक्यात भाषेच्या ज्ञात अवस्थेच्या आधारे अज्ञात अवस्थेचा अभ्यास या अभ्यास पद्धतीमध्ये केला जातो. या दोन्ही अभ्यास पद्धतीमध्ये भाषेच्या विकास क्रमामध्ये तिच्या ध्वनिव्यवस्थेमध्ये, व्याकरण व्यवस्थेमध्ये, शब्द संग्रहामध्ये, अर्थ वाहनाच्या नियमनामध्ये झालेल्या मूलभूत परिवर्तनांचा अभ्यास केंद्रभागी असतो.

## १.८ ऐतिहासिक भाषाभ्यासातील पुनर्रचन पद्धती

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीमध्ये तौलनिक पुनर्रचन पद्धती व अंतर्गत पुनर्रचन पद्धती या दोन पुनर्रचन पद्धतींचा वापर केला जातो. त्यांनाच अनुक्रमे बहुभाषिक पुनर्रचन पद्धती व एकभाषिक पुनर्रचन पद्धती असेही म्हटले जाते. या पुनर्रचन पद्धतीच्या आधारे कोणत्याही भाषेच्या उपलब्ध रूपांच्या आधारे प्राचीन आणि अनुपलब्ध भाषेचे पुनर्रचन केले जाते.

**१.८.१ तौलनिक अथवा बहुभाषिक पुनर्रचन पद्धती :**

मूळ भाषेचे पुनर्रचना ज्या प्रमुख पद्धतीने केले जाते त्या पद्धतीला तौलनिक पुनर्रचन पद्धती असे म्हटले जाते. हे पुनर्रचना करताना त्या मूळ भाषेशी नाते सांगणाऱ्या दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषा विचारार्थ घेतल्या जातात. हे नाते व्याकरणिक, मूलभूत शब्दकोश, कालसंगत भाषिक रूपे आणि परिवर्तने असे कोणत्याही प्रकारचे असू शकते. तुलनेसाठी व पुनर्रचनेसाठी घेतलेल्या या भाषांचे भाषिक नमूने उपलब्ध असणे या ठिकाणी आवश्यक असते. या भाषांच्या भाषिक रूपातूनच मूळ भाषेची पुनर्रचन केली जाते. या पद्धती मध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषांचा अभ्यास होत असल्यामुळे तिला बहुभाषिक पुनर्रचना पद्धती असेही म्हणतात.

अर्थात या तौलनिक पुनर्रचन पद्धतीच्या विशुद्धतेसाठी काही नियमाचे काटेकोर पालन करावे लागते. उदा. कोणत्याही दोन किंवा त्याहून अधिक समान गुणधर्म दर्शविणाऱ्या भाषांचे पुरावे गोळा करताना यादृच्छिकतेने आलेले समान शब्द आणि राजकीय अथवा कोणत्याही सहसंबंधातून भाषिक उसनवारीने आलेले समान शब्द या पुनर्रचनामध्ये विचारात घेऊ नयेत. त्यासाठी त्या त्या भाषेतील देशी व परंपरागत शब्दसंग्रह विचारात घ्यावा लागतो. म्हणजेच मराठी, गुजराती व हिंदी भाषेतील साम्यस्थळे शोधताना मराठीतील टोमॅटो, गुजराती भाषेतील टमाटा किंवा हिंदी भाषेतील टमाटर हे शब्द उदाहरणासाठी घेऊ नयेत. कारण टोमॅटो हा शब्द मुळात वेगळ्या भाषेतून उसनवारीने मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये रूढ झाला आहे. या ठिकाणी मराठी भाषेतील माती, गुजराती भाषेतील माटी आणि हिंदी भाषेतील मिट्टी हे शब्द उदाहरणासाठी घ्यावेत.

त्याचबरोबर कोणत्याही भाषेच्या पुर्वावस्थेची पुनर्रचना करुन प्राचीनतम भाषिक रूपांचा व ध्वनिव्यवस्थेचा शोध घेत असताना त्या भाषेतील शुद्ध भाषिक रूपांचा वापर करावा, सामासिक शब्द किंवा अपभ्रंश झालेली भाषिक रूपे उदाहरणासाठी घेऊ नयेत. दोन किंवा त्याहून अधिक भाषांमधील ध्वनी व अर्थ उदाहरणासाठी घेऊ नयेत. दोन किंवा त्याहून अधिक भाषांमधील ध्वनी व अर्थ यांच्यातील साम्यस्थळांच्या आधारे त्यांच्या जनक भाषेचे पुनर्रचना करता येते. या आधारावरच एक भाषांना समूह कल्पिता येतो. यालाच भाषाकुल असे म्हटले जाते. या अर्थाने कोणत्याही भाषेच्या जनक भाषेपर्यंत पोहोचण्यासाठी त्या भाषेच्या प्राचीनतम भाषिक दस्तऐवजाचे ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या द्वारे पुनर्रचना करणे आवश्यक असते.

दोन भाषांमधून निवडलेल्या शब्दांच्या जोड्या नेहमी समान सापडत नसतात. त्यामध्ये कालक्रमामध्ये अनेक ध्वनी परिवर्तन झालेली असतात. अशा वेळी या भाषिक पुराव्यांची पुनर्रचना कशी करावी याचीही एक निश्चित पद्धती आहे. त्यासाठी आपण संस्कृत व अवेस्ता भाषांतून सात ह्या अर्थी आलेल्या सप्त व हप्त या शब्दाची जोडी घेतली तर आपणास असे आढळून येईल की, ह्या जोडीचे (१) सः ह आणि (२) प्तःप्त असे दोन तुकडे केल्यास तिच्या दुसऱ्या भागात ध्वनिदृष्ट्या संपूर्ण साम्य आहे. म्हणजेच तेवढ्या तुकड्यापुरते प्त अशी पुनर्रचना सहज करता येते. परंतु पहिल्या भागात संस्कृत मध्ये स आणि अवेस्ता भाषेत ह आढळत असल्यामुळे त्यांच्यात ध्वनिदृष्ट्या साम्य नाही. हे व्यंजन स मानायचे का ह हा प्रश्न तिसऱ्या भाषाभगिनीतील पुराव्यांच्या आधारे निश्चित करावा लागतो. म्हणजेच या पुनर्रचनामध्ये तिसरी भाषाभगिनी म्हणून आपण सातसाठी लॅटिन भाषेत septem आणि गोथिक भाषेत sibun हे शब्द वापरले जातात याचा विचार करु. या दोन्ही भाषा भगिनींमध्ये देखील आरंभीचे व्यंजन स

असल्यामुळे अंतिम पुनर्रचित शब्दामध्ये 'स' हेच व्यंजन येते आणि अवेस्ता भाषेमध्ये कालक्रमामध्ये 'स' चे परिवर्तन 'ह' मध्ये झाले असल्याचे म्हणता येते. (म.अ. मेहेंदळे : १९८२:१५३) या परिस्थितीमध्ये फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ मेय्ये (meillet) यांनी तौलनिक पुनर्रचन करताना किमान तीन भाषांमधील तरी उदाहरणे हाताशी असावीत असे म्हटले आहे.

तुलनात्मक पुनर्रचना पद्धतीने भाषाभगिनींमधील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मूळ भाषेची ध्वनी व्यवस्था सिद्ध होत असते. त्यासाठी या भाषांमध्ये वापरले गेलेले शब्द व त्यांच्यातील साम्य स्थळांचा विस्तृत अभ्यास करुन या जनक भाषेची एक स्वन व्यवस्था कल्पिली जाते. त्याचबरोबर या आधारे जनक भाषेचा शब्दकोश देखील या पुनर्रचनातून निश्चित करता येतो. त्या आधारे अन्य भाषाभगिनीचा देखील अभ्यास करणे शक्य होत असते. स्वन व्यवस्था व शब्द कोशाच्या निश्चितीनंतर या भाषेच्या व्याकरण व्यवस्थेची देखील पुनर्रचना करणे शक्य असते. भाषा भगिनींमधील व्याकरण सहचर्याच्या नियमाचे विघटन करून व त्यांच्यात तुलना करून जनक भाषेचे ही काही व्याकरणिक नियम कल्पिने शक्य आहे.

त्याचबरोबर ऐतिहासिक भाषाविज्ञानामध्ये स्वनिमिक विघटन हे तर्कसंगत असावे लागते. पुनर्रचनेमध्ये असे स्वनिमिक विघटन कल्पिले असल्यास ते कोणत्या ध्वनिसंदर्भात घडून आले आहे. हे तर्कसंगतपणे मांडता यायला हवे. अन्यथा असे विघटन या अभ्यास पद्धतीमध्ये कल्पिता येत नाही. थोडक्यात दोन किंवा त्यापेक्षा अधिक भाषांमध्ये ध्वनी व अर्थाच्या पातळीवर आढळणारी साम्यस्थळे शोधून त्यांच्यातील परिवर्तनांचा व तपशिलांचा अभ्यास करुन त्या भाषांच्या जनक भाषेच्या ध्वनिव्यवस्थेची, शब्द संग्रहाची आणि व्याकरण व्यवस्थेची पुनर्रचना या पद्धतीने करता येते. हे मूलतत्त्व या भाषाभ्यास पद्धतीच्या मुळाशी कार्यरत असते.

### १.८.२ अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती :

या पुनर्रचन पद्धतीस एकभाषिक पुनर्रचन पद्धती असेही म्हणतात. दोन किंवा त्यापेक्षा जास्त भाषांचा तौलनिक अभ्यास करुन एखाद्या भाषेच्या प्राचीन व अनुपलब्ध इतिहासाची पुनर्रचन तौलनिक पुनर्रचन पद्धतींच्या आधारे करता येऊ शकते हे आपण पाहिले आहे. ही पुनर्रचन या एकाच मार्गाने करता येते असे नाही. एकाच भाषेतील पुराव्यांच्या आधारेही त्या भाषेच्या पुर्वाअवस्थेविषयी काही एक तर्क बांधता येतात. या तर्क पद्धतीला अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती असे म्हणतात. ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या क्षेत्रामध्ये या पुनर्रचन पद्धतीला अनन्य साधारण महत्त्व आहे. भाषेच्या इतिहासात कालक्रमामध्ये अनेक प्रकारची ध्वनिपरिवर्तने होत असतात. हे गृहीतके या अभ्यास पद्धतीच्या मुळाशी कार्यरत असते. ह्या गृहिततत्त्वाचा अर्थ असा होतो की, रूपवैचित्र्य ज्या भाषात आरंभी एखाद्या प्रतीपादकाची सर्व रूपे ध्वनिदृष्ट्या सारखीच असावीत. परंतु त्या भाषांनी केलेल्या काही ध्वनिपरिवर्तनांमुळे ते रूपवैचित्र्य निर्माण झाले आहे. तसे असेल तर त्या भाषांमधील पूर्वकालीन रूपे कोणती होती. हे ठरविण्याचे काम भाषा वैज्ञानिकावर येऊन पडते. ते ठरविण्यासाठी ते एकाच भाषेच्या अंतर्गत संरचनेचा आधार घेत असल्यामुळे या पद्धतीला अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धती असे नाव देण्यात आले आहे. (म.अ. मेहेंदळे : १९८२:१५३) म्हणजेच एकाच भाषेच्या रूपांमध्ये जो ध्वनिविषय फरक दिसतो त्यावर एकभाषिक पुनर्रचन आधारलेली असते.

भाषेच्या परिवर्तनशीलता व गुणग्राहकता या कालोधात वैशिष्ट्यांमुळे वेगवेगळ्या कालखंडातील भाषिक रूपांमध्ये खूप बदल झालेले असतात. कालोघात भाषेमध्ये घडणाऱ्या या

परिवर्तनांचा अभ्यास करण्याची एक पद्धती भाषाभ्यासाच्या क्षेत्रामध्ये विकसित झाली आहे. तिलाच ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती असे म्हटले जाते. या अभ्यास पद्धतीमध्ये एका अर्थाने कोणत्याही दोन कालबिंदूमधील भाषिक परिवर्तनाचा इतिहास लिहिला जात असतो.

भाषा ही एक प्रकारे समकालीन समाजाच्या संस्कृतीवहनाचे कार्य करत असते. त्या त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक मान्यता भाषेच्या द्वारेच जनमाणसात वास करत असतात. विविध भाषिक रूपांना लाभलेल्या अर्थावरुन ती भाषा ज्या काळाचे व समाजाचे प्रतिनिधित्व करते त्या समाजातील परंपरांचा अर्थ लावणे शक्य असते. अशा प्राचीन भाषिक रूपांचा अभ्यास ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीमध्ये केला जातो. त्यामुळे वेगवेगळ्या सामाजिक संस्थानाचा इतिहास लिहिण्याच्या कामात या अभ्यास पद्धतीचा उपयोग होत असतो. त्याचबरोबर एकाच भाषेच्या काळाच्या दृष्टीने एकमेकापासून दूर गेलेल्या रूपांमध्ये खूप अंतर पडलेले असते. आधीचे रूप आणि नंतरचे रूप यांची तुलना करुन या परिवर्तनास कोणत्या घटना कारणीभूत ठरल्या असाव्यात हा अभ्यास या अभ्यास शाखेत अंतर्भूत होतो. या भाषिक परिवर्तनाला कारण ठरलेल्या विभिन्न सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय घटीतांची क्रमवार व सूत्रबद्ध मांडणी करून भाषेच्या बदललेल्या रूपांचा ही परिचय करून घेता येतो. यालाच भाषेचा इतिहास असेही म्हणता येते.

त्या त्या भाषेमध्ये उपलब्ध असलेली प्राचीन भाषिक रूप म्हणजे त्या भाषेचा इतिहास लिहिण्यासाठी आधारभूत ठरणारी साधनसामग्री होय. ही भाषिक रूपे प्राचीन साहित्य व अन्य लेखन सामग्रीच्या रूपाने उपलब्ध होत असतात. हे साहित्य जेवढे प्राचीन व विपुल प्रमाणात उपलब्ध होऊल तेवढा त्या भाषेचा इतिहास अधिक स्पष्टपणे लिहिता येईल. या भाषिक रूपांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करून त्या भाषेच्या प्राचीन अवस्थेबद्दल काही अनुमाने काढता येतात. एवढेच नव्हे तर या अभ्यास शाखेने भाषेच्या प्राचीन अवस्थेचे पुनर्रचना करण्यापर्यंत विकास केला आहे. एखाद्या भाषेच्या दोन विभिन्न काळातील भाषिक परिवर्तनांच्या इतिहास लेखनामध्ये ध्वनी परिवर्तने, अर्थ परिवर्तने, व्याकरण व शब्दसंग्रह यांचे तपशीलवार वर्णन येते. त्याचबरोबर भाषेच्या संशोधनातील ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती म्हणजे भूतकालीन घटनांच्या प्रत्यक्ष पुराव्याची क्रमवार मांडणी करण्याची पद्धत जी विभिन्न सामाजिक संस्थांचा इतिहास लिहिण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते.

थोडक्यात या अभ्यास पद्धतीमध्ये कोणत्याही भाषेच्या दोन कालखंडातील दोन वेगवेगळ्या रूपांची तुलना होणे अभिप्रेत असते. या अभ्यासामध्ये ही भाषिक रूपे कालदृष्ट्या जेवढी जवळची असतील तेवढे अचूक निष्कर्ष निघण्याचा संभव असतो. त्याचबरोबर या अभ्यास पद्धतीमध्ये भाषेचे व्याकरण व शब्द संग्रहाच्या विघटन पद्धतीवर आधारित तर्क पद्धती अधिक उपयुक्त ठरते.

## १.९ ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या मर्यादा

या भाषाभ्यास पद्धतीने भाषिक परिवर्तने, आदान-प्रदान व विकास विस्तार या क्षेत्रामध्ये भाषिक पुनर्रचन पद्धतीचा अवलंब करुन अनेक प्रश्नांची उत्तरे शोधली. शिवाय भाषेच्या द्वारे विभिन्न संस्कृतींमधील अंतरसंबंधांचा अभ्यास करण्याची नवी तर्कपद्धती रूढ केली. तरीही या

munotes.in

अभ्यास पद्धतीमध्ये काही मर्यादाही दाखवता येतात. या अभ्यास पद्धतीमध्ये भाषिक रूपांच्या पुनर्रचनेसाठी जी भाषिक सामग्री वापरली जाते ती सामग्री प्राचीन व पुरातन साहित्यातील भाषिक रूपे असतात. ही भाषा वर्तमानातील रूढ भाषा नसल्यामुळे ती एका अर्थाने मृत भाषाच असते. तिची लिखित रूपे असली तरी तिची ध्वनीरूपे अनुमानानेच कल्पिलेली असतात. त्यामुळे भाषेच्या त्या त्या काळातील मौखिक व लिखित स्वरूपातील संबंधाच्या मूलभूत अभ्यासाखेरीज या पुनर्रचनेतून हाती आलेले निष्कर्ष अचूक असणार नाहीत. त्याचबरोबर जनन म्हणजे अमुक भाषेतून तमुक भाषेचा जन्म झाला. ही कल्पना मुळात खूपच रूपकात्मक व आदर्शवादी आहे. कोणत्याही एक भाषेतून दुसऱ्या भाषेचा जन्म होणे ही बाब तशी अस्वीकार्यच वाटते. कारण विभिन्न काळाचा, भवतालचा, विभिन्न बोली व भाषांच्या दीर्घकालीन संकराचा एकत्रित परिमाण म्हणजे एखाद्या भाषेचे निर्माण होणे असते. या अर्थाने ती अनेक भाषा, बोली, संस्कृती व काळाच्या खुणा आपल्या अंगाखांद्यावर वागवत असते. त्यामुळे तिला पुनर्रचनेच्या माध्यमातून काळाच्या व जनन भाषेच्या बाबतीत वैज्ञानिक कसोटीवर बांधायला ही अभ्यास पद्धती अपुरी पडते.

त्याचबरोबर जनक भाषेची कल्पना करताना या भाषेला एकजिनसी मानावे लागते. परंतु भाषा ही अनेक बोलींच्या सहचर्यातून व अंतरसंबंधातून विकसित झालेली असते. त्यामुळे या अभ्यास पद्धतीमध्ये केंद्रवर्ती असलेले भाषिक परिवर्तनाचे नियम सर्वच बोली भाषांना सर्वकाळ जसेच्या तसे लागू पडत नसतात. त्यामुळे या पुनर्रचनामध्ये बाधा निर्माण होण्याचा धोका संभवतो. थोडक्यात या भाषाभ्यासातील परिवर्तन व त्याच्याशी संबंधित संकल्पना आधुनिक भाषाविज्ञानात स्वीकारल्या गेल्या असल्या तरी जनन, कुल, उत्क्रांती या संदर्भात मात्र अनेक प्रश्नांची उत्तरे या अभ्यास पद्धतीमध्ये सापडत नाहीत. उदा. भाषाकुलामधील जनन संबंधाच्या शोधातून एखाद्या अतिप्राचीन व अनुपलब्ध अशा जनक भाषेचे स्वरूप निश्चित करता येणे खरोखरच शक्य आहे का? एकजिनसी अशी आदिभाषा अस्तित्वात होती याला कसला पुरावा आहे का? थोडक्यात या अभ्यासातून भाषांमधील ऐतिहासिक संबंधांचे ज्ञान मिळू शकेल, परंतु एखादी खरोखरी जनक भाषा हाती लागणे शक्य नाही हा दृष्टिकोन स्वीकार्य वाटतो.

भाषिक परिवर्तन ही संकल्पना ऐतिहासिक भाषाभ्यासामध्ये महत्त्वाची मानली जाते. परंतु ही भाषिक परिवर्तने व्यक्तिलक्ष्यी व समष्टीलक्ष्यी अशी दोन्ही प्रकारची आढळून येत असल्यामुळे भाषेच्या प्राचीन रूपांचा अभ्यास करताना भाषा ग्रहण करण्याच्या प्रक्रियेत व्यक्तीच्या पातळीवरील भाषिक परिवर्तनाचा अभ्यास करणे जिकीरीचे ठरते. त्याचबरोबर भाषा ही सतत परिवर्तनशील असते या तत्त्वानुसार कोणत्याही भाषेचा प्रारंभ बिंदू निश्चित करता येत नाही. हा शोध भूतकाळात उलटया दिशने केल्यास इतिहास-पूर्व काळातील अवस्थेपर्यंत जाऊन पोहचतो. या अवस्थेमध्ये कोणत्या तरी एका भाषेला जनक भाषा मानणे गैरसोईचे ठरते.

विसाव्या शतकामध्ये फेर्दिनां द सोस्यूर या भाषावैज्ञानिकाने भाषेच्या वर्णनात्मक अभ्यास पद्धतीला महत्त्व देऊन एककालिक व कालक्रमिक असे भाषाभ्यासाचे दोन भेद कल्पिले. त्याच्या या मांडणीतून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले. त्याने भाषेच्या विकास क्रमाबद्दल ऐतिहासिक भाषा वैज्ञानिकांच्या तत्कालीन रूढ मांडणीपेक्षा वेगळी मांडणी केली. त्याने भाषेच्या परिवर्तनशीलतेचा स्वीकार करून कोणत्याही एखाद्या कालखंडातील भाषेला अचल व स्थिर मानून तिचे वर्णनात्मक विश्लेषण करणे शक्य असल्याचा क्रांतिकारी सिद्धांत मांडला. या वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती सारख्या नव्या भाषाभ्यास

पद्धतीच्या उदयाच्या मुळाशी ऐतिहासिक भाषाभ्यास या विद्यमान भाषाभ्यास पद्धतीमधील या मर्यादाच होत्या.

**आपली प्रगती तपासा :**

१) ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती म्हणजे काय ते सांगा ?

## १.१० समारोप

थोडक्यात विविध कालखंडातील वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीमध्ये केला जातो. भाषेला परिवर्तनशील मानून कालानुरूप तिची संरचना, अर्थव्यवस्था व शब्द संग्रहामध्ये होणाऱ्या बदलांचा धांडोळा या अभ्यास पद्धतीमध्ये घेतला जातो. या अभ्यास शाखेमध्ये मराठी भाषेचा तिच्या प्राचीन भाषिक रूपांच्या आधारे यादवकालीन मराठी भाषा, बहामनी कालीन मराठी भाषा, शिवकालीन मराठी भाषा असे अनेक टप्पे कल्पिले आहेत. कालप्रवाहामध्ये भाषेच्या ध्वनी, शब्द, प्रत्यय, शब्दार्थ, व्याकरण अशा सर्वच घटकामध्ये बदल होत असतात. कोणत्याही भाषेतील हे बदल लक्षात घेऊन तिची वेगळी संहिता कल्पिने या अभ्यास पद्धतीमध्ये अभिप्रेत आहे. या भाषिक द्रव्याच्या आधारे तिचे कालानुक्रमे वर्गीकरण करणे, तिच्या बदलाला प्रभावित करणाऱ्या ऐतिहासिक घटनाक्रमाचे विवेचन करणे, त्याचबरोबर भाषिक रूपांच्या व ध्वनी-अर्थ साधर्म्याच्या आधारे दोन किंवा त्याहून अधिक भाषांची तुलना करून एका तिसऱ्या भाषेची संरचना करणे ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीमध्ये अंतर्भूत आहे.

## १.११ संदर्भग्रंथ


- कुलकर्णी, कृ.पा. ' मराठी भाषा उद्गम व विकास', २००० (प. आ.), पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस.
- मालशे, मिलिंद स.: १९८२: 'वर्णनात्मक भाषाभ्यासपद्धती : भूमिका व स्वरूप', भाषाविज्ञान : वर्णनात्मक व ऐतिहासिक (संपा. मालशे, इनामदार, सोमण) पुणे, संजय प्रकाशन.
- मालशे, मिलिंद स. १९९८: 'आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन', मुंबई, लोकवाङ्मय गृह.
- मालशे, मिलिंद स. १९९९: 'भाषा : स्वरूप, कार्य व अभ्यास', 'आधुनिक भाषाविज्ञान' (संरचनावादी आणि सामान्य) (संपा. काळे कल्याण, सोमण अंजली) पुणे, प्रतिमा प्रकाशन.
- मेहेंदळे, म.अ. १९७९: 'भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा', मराठीचा भाषिक अभ्यास (संपा. कानडे मु.श्री.) पुणे, श्रीविद्या प्रकाशन.


munotes.in

## १.१२ नमुना प्रश्न :

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

१. जनक भाषेच्या पुनर्रचनेतील ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करा.
२. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.
३. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीची मूलतत्त्वे थोडक्यात स्पष्ट करा.
४. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या दोन पुनर्रचना पद्धती सांगून त्यांची कार्यपद्धती थोडक्यात सांगा.
५. ऐतिहासिक भाषाभ्यास, तौलनिक भाषाभ्यास आणि वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती या भाषाभ्यास पद्धतींचे सहचर्य उलगडून दाखवा.

### ब) लघुत्तरी प्रश्न :

१. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या मर्यादा स्पष्ट करा.
२. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीची कोणती दोन अंगे मानली गेली आहेत? थोडक्यात स्पष्ट करा.
३. तौलनिक म्हणजेच बहुभाषिक पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.
४. अंतर्गत म्हणजेच एकभाषिक पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.
५. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा विकासक्रम व त्यातील सर विल्यम जोन्स यांचे योगदान स्पष्ट करा.

### क) बहुपर्यायी प्रश्न :

१) ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया कोणी घातला?
अ) सर विल्यम जोन्स ब) फेर्दिना द सोस्यूर क) ब्लूमफिल्ड ड) मॅक्सम्युलर

२) सर विल्यम जोन्स यांनी प्रामुख्याने कोणत्या भाषाकुलातील भाषांचा अभ्यास केला?
अ) द्राविडी भाषाकुल ब) इंडो-युरोपियन
क) सिनो तिबेटीयन ड) ऑस्ट्रो - एशियायी

३) सर विल्यम जोन्स यांनी खालीलपैकी कोणत्या भाषा एककुलोद्भव असल्याचा सिद्धांत मांडला.
अ) संस्कृत-ग्रीक्र-लॅटिन ब) मराठी-हिंदी-कन्नड
क) तमिळ-तेलगु-कन्नड ड) हिब्रू-प्राकृत-पाली

४) भारतीय भाषाकुलातील अनेक भाषांचा अभ्यास कोणत्या पद्धतीने केला आहे?
अ) पुरोगामी ब) पश्चाद्गामी
क) अंतर्गत पुनर्रचना पद्धती ड) वरील पैकी सर्व

५) दोन कालबिंदूमधील भाषिक परिवर्तनाचा अभ्यास कोणत्या भाषाभ्यास पद्धतीमध्ये केला जातो?
अ) समाजभाषा विज्ञान ब) वर्णनात्मक भाषाविज्ञान
क) तौलनिक भाषाविज्ञान ड) ऐतिहासिक भाषाविज्ञान

❖❖❖❖

# घटक-२

## भाषाकुल सिद्धांत

**घटक रचना :**


२.० उद्देश

२.१ प्रस्तावना

२.२ भाषाकुल संकल्पना

२.३ वर्गीकरणाचे तत्त्वे

२.४ भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण

२.५ जगातील प्रमुख भाषाकुले

२.६ इंडोयुरोपिअन भाषाकुल

२.७ इंडो-इरानिअन भाषाकुल

२.८ अंतरवर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांत

२.९ आर्यभारतीय शाखा

२.१० समारोप

२.११ सरावासाठी प्रश्न

२.१२ संदर्भ ग्रंथ


## २.० उद्देश

१. भाषाकुल सिद्धांत समजावून घेण्यासाठी भाषा वर्गीकरणाची तत्त्वे प्रथम ध्यानात घेणे.
२. जगातील प्रमुख भाषाकुले यांचा अभ्यास करणे.
३. इंडो-युरोपिअन भाषाकुल व इंडो-इरानिअन भाषाकुल यातील प्रमुख शाखांचा विचार करणे.
४. अंतरवर्तुळ बहिरवर्तुळ सिद्धांत अभ्यासणे.
५. तसेच आर्यभारतीय भाषाशाखेचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

'भाषाकुल संकल्पने'चा विचार ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. भाषा ही परिवर्तनशील असते. ती कालक्रमानुसार बदलते. तिच्या परिवर्तनशील प्रक्रियेचा अभ्यास करणारी भाषाभ्यासाची स्वतंत्र शाखा उदयाला आली. त्या शाखेस भाषाभ्यासाची ऐतिहासिक भाषाविज्ञानाची शाखा म्हणून ओळखले जाते. या अभ्यासपद्धतीमध्ये भाषेच्या परिवर्तनामागील नियम शोधून काढणे आणि परिवर्तनविषयक उपपत्ती मांडणे हे उद्दिष्ट असते. भाषा मानवी जीवनव्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. मानवाच्या विकासात चाकाचा शोध महत्त्वाचा मानला

जातो. परंतु मानवाने लावलेला भाषेचा शोध हा चाकाच्या शोधापेक्षाही महत्त्वाचा ठरला आहे. भाषेच्या बळावरच मानवाने आजवरचा प्रवास केला आहे. त्याच्या विकासात भाषेचे योगदान मोठे आहे. त्यामुळे त्याच्या जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जगाच्या पाठीवरील माणूस जैविकदृष्ट्या सारखा असला तरी, त्यांच्या भाषा वेगळ्या का? असा प्रश्न अनेकांना पडतो. या प्रश्नाचा वेध घेताना जगभरातील भाषांची तुलना करण्यात आली आणि त्यातूनच ऐतिहासिक भाषाभ्यासाची बीजे रुजली. रॉयल ऐशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनामध्ये रविवार दिनांक २ फेब्रुवारी १७८६ रोजी सर विल्यम जोन्स यांनी या संदर्भाने एक व्याख्यान दिले. या व्याख्यानामध्येच जोन्स यांनी ग्रीक, लॅटिन, संस्कृत इत्यादी भाषांच्या साम्यावरून त्या एकाच पूर्वज भाषेपासून निर्माण झालेल्या असाव्यात असे अनुमान व्यक्त केले. त्यांनी भाषांबाबत केलेला हा विचार अभिनव होता. त्यामुळे या विचारातून जगभरातील भाषाभ्यासक प्रभावित झाले. त्यातूनच 'भाषाकुल' या संकल्पनेचे बीज रुजले. या संकल्पनेतून भाषांच्या इतिहासाचा, इतिहासक्रमाचा अभ्यास सुरू झाला. भाषेची पूर्वावस्था, मध्यावस्था, तिचे उत्तरकालीन, अर्वाचीन रूप आणि स्वरूप, त्यातील परिवर्तने, या परिवर्तनामागील नियम, उत्पत्ती, उपपत्ती मांडणे ही ऐतिहासिक भाषाविज्ञानाची उद्दिष्ट्ये बनली. दोन किंवा अधिक भाषांचा तुलनात्मक अभ्यास करुन त्यांचा 'वंशवृक्ष' मांडून दाखविणे असे या अभ्यासाचे स्वरूप आहे. भाषांच्या तौलनिक अभ्यासातूनच 'भाषाकुल' संकल्पनेचा विचार पुढे आला. जगभर पसरलेल्या भाषांचे भाषिक वर्गीकरणाच्या तत्त्वाधारे वर्गीकरण केले. त्या वर्गीकरणांपैकीच 'कुलनिष्ठ' वर्गीकरण हे एक महत्त्वाचे वर्गीकरण 'तत्त्व' आहे. या तत्त्वाच्या आधारेच भाषांचे वर्गीकरण प्रमुख अस्तित्वात आले. येथे आपण भाषाकुल संकल्पना सविस्तर समजून घेणार आहोत.

## २.२ भाषाकुल संकल्पना

१८ व्या शतकात भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विल्यम जोन्स यांनी केलेल्या भाषेच्या अभ्यासामुळेच होय. त्यांनी भाषेचा सूक्ष्म अभ्यास करुन एक महत्त्वाचे गृहीतक मांडले. कलकत्ता येथील रॉयल ऐशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात निबंध वाचताना इ.स. १७८६ मध्ये त्यांनी एक विधान केले. ते असे म्हणाले की, 'संस्कृत, ग्रीक व लॅटिन ह्या भाषात जे साम्य आढळते ते इतके घनिष्ठ आणि खोलवर रुजलेले आहे की, या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्‌भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते.' हे विधान करून सर विल्यम जोन्स यांनी ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केलेले दिसते. या विचारातूनच 'परिवर्तन' आणि 'भाषाकुल' या दोन मध्यवर्ती संकल्पना केंद्रवर्ती मानून ऐतिहासिक भाषाविज्ञान ही ज्ञानशाखा विकसित झाली. या ज्ञानशाखेत भाषेच्या इतिहासात होत जाणाऱ्या परिवर्तनाची, या परिवर्तनाचे नियम शोधून काढण्याची, भाषांच्या तौलनिक अभ्यासातून त्यांचे परस्परसंबंध ठरविण्याची आणि अशा स्वरूपाच्या अभ्यासातून भाषाकुलांची प्रतिष्ठापना करण्याची, अशा भाषाकुलाचे वंशवृक्ष बनविण्याची आणि भाषापरिवर्तनाच्या निश्चित स्वरुपाच्या आधारे उपलब्ध भाषिक पुराव्याच्या तौलनिक अभ्यास करून अनुपलब्ध अशा पूर्वभाषेची निर्मिती करणे इत्यादी अंगानी संशोधन होऊ लागले. यातूनच ध्वनिपरिवर्तनाचे नियम निरपवाद सार्वत्रिक असतात, हे सिद्ध करण्यात भाषावैज्ञानिकांना यश प्राप्त झाले. प्रत्यक्ष अस्तित्वात नसलेल्या पूर्वभाषांची पुनःनिर्मिती करण्याचे तंत्र विकसित झाले. 'भाषाकुल' ही संकल्पना अस्तित्वात आली आणि जगातील भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण करण्यात येऊन त्यांचे वंशवृक्ष तयार करण्यात आले.

भाषाकुल संकल्पना अधिक विस्ताराने समजून घेण्यासाठी या संकल्पनेमागील अभ्युपगम, त्याचा अर्थ आणि अन्वयार्थ आपण समजून घेणे आवश्यक आहे. आजच्या वापरातील किंवा प्राचीन काळच्या दोन किंवा त्याहून अधिक भाषांमधील मूलभूत शब्दकोश, रूपव्यवस्था या बाबतीत विविध प्रकारचे साम्य आढळले आणि ते साम्य यादृच्छिकतेने आढळू शकणाऱ्या साम्यापेक्षा वेगळे असेल, त्याचबरोबर ते साम्य भाषिक उसनवारीमुळे ज्या प्रकारचे साम्य त्या दोन किंवा त्याहून अधिक भाषांत निर्माण होऊ शकते त्या प्रकारचे नसेल तर त्या दोन किंवा अधिक भाषा एका भाषाकुलातल्या आहेत असे गृहीत धरले जाते. अर्थात 'एक भाषाकुल' ह्या संकल्पनेत अपेक्षित असलेल्या अभ्युपगमाचा नेमका अर्थ आणि अन्वयार्थ काय आहे पाहणे गरजेचे आहे.

भाषाकुलाचा विचार करताना 'एक भाषाकुल' या अभ्युपगमाचा प्रथम विचार करून, एक भाषाकुल या अभ्युपगमाचा एक तात्त्विक अर्थ असा की, ज्या प्रकारची साम्यस्थळे दोन किंवा अधिक भाषांत आढळतात; त्या साम्यस्थळांचा या अभ्युपगमामुळे उलगडा होऊ शकतो. याशिवाय या अभ्युपगमाचा दुसरा निर्मितिक्षम अर्थ असा की, ज्या भाषा आपण एका भाषाकुलातील मानतो; त्या सर्व ऐतिहासिक काळी कोणत्यातरी एका भाषेपासून उत्पन्न झाल्या आहेत आणि ही मूळ भाषा जर माहीत नसेल, तर ती माहीत करुन घेण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी पुनर्रचन करावी लागते. या दृष्टीने हे अभ्युपगम निर्मितिक्षम आहे; असे मानले जाते. त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे तौलनिक किंवा बहुभाषिक आणि अंतर्गत किंवा एक भाषिक अशा दोन पुनर्रचन पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यासाठी एखाद्या भाषाकुलात ज्या भाषा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्या भाषांत ध्वनिसाम्य व अर्थसाम्य या दोन कसोट्यांना उतरणाऱ्या शब्दांच्या जोड्या जमविणे व त्यांच्या आधारे पुनर्रचना करणे. उदाहरणार्थ, इंडोयुरोपियन भाषाकुलात संस्कृत, अवेस्ता, ग्रीक, लॅटिन इत्यादी भाषा समाविष्ट आहेत. या भाषांमध्ये आढळणाऱ्या शब्दांच्या जोड्यावरून त्या सर्व भाषांच्या मुळाशी जी एक इंडो-युरोपियन भाषा असल्याची कल्पना करते येते. तसेच अत्यंत ध्वनिसाम्य नसतानाही पुनर्रचना करता येते किंवा तिसऱ्या भाषाभगिनीचा पुरावा वापरुन अथवा ध्वनिविषयक पुरकांची संभाव्यता लक्षात घेऊन व ध्वनिसंवादविषयक तपशील लक्षात घेऊन अशी पुनर्रचना करता येते. तसेच व्याकरण व्यवस्थेचे पुनर्रचनही त्यासाठी लक्षात घेता येते. याशिवाय अंतर्गत किंवा एकभाषिक पुनर्रचनाचे गृहीत तत्त्व लक्षात घेऊनही भाषाकुलांचे वंशवृक्ष ठरविता येतात. यात कुठल्याही भाषेचा आधार न घेता एकाच भाषेतील पुराव्यांच्या आधारे पुर्वावस्थेविषयी अनुमाने करण्यात येतात. कारण भाषेच्या इतिहासात अनके प्रकारची ध्वनिपरिवर्तने घडून येतात. यापैकी काही ध्वनिपरिवर्तने संदर्भसापेक्ष असतात तर काही रूपे वैचित्र्यानेही युक्त असतात. एकंदरीत भाषाकुल संकल्पनेमागील अशा स्वरूपाचा अर्थ आणि अन्वयार्थ लक्षात घेऊनच ही संकल्पना भाषांच्या अभ्यासासाठी लक्षात घ्यावी लागते.

## २.३ वर्गीकरणाची तत्त्वे

जगभरात जवळपास सात हजार भाषा-बोली आहेत असे अभ्यासकांचे मत आहे. तेव्हा जागतिक भाषांची ही प्रचंड संख्या लक्षात घेतल्यास या भाषांचे वर्गीकरण केल्याशिवाय त्यांचा अभ्यास करता येणार नाही. संख्येने प्रचंड असलेल्या भाषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी वर्गीकरण तत्त्वांचा आधार घ्यावाच लागतो. त्यासाठी अभ्यासकांनी काही तत्त्वे निश्चित केली.

ती म्हणजे खंड, देश, धर्म, काल, प्रभाव, भाषेची रचना आणि वंश किंवा कुल. अशा प्रकारची काही तत्त्वे निश्चित केली, आणि या तत्त्वांनुसार भाषांचे वर्गीकरण होऊ लागले. या विविध तत्त्वांच्या आधारे जरी भाषांचे वर्गीकरण करता येत असले तरी भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या दृष्टीने भाषांतील रचना वा आकृतिवैशिष्ट्यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले आकृतिमूलक वर्गीकरण, तसेच रचना शब्दांतील अर्थ आणि ध्वनी यांचे साम्य लक्षात घेऊन केलेले वांशिक किंवा परिवारिक वर्गीकरण विविध भाषावैज्ञानिकांनी विशेषत्वाने लक्षात घेऊन भाषाभ्यास केला.

**आकृतिमूलक वर्गीकरण :**

भाषेतील शब्दांची मूळ प्रकृती व त्यांना लागणारे प्रत्यय यांच्या परस्पर संबंधावर हे वर्गीकरण आधारलेले आहे. या वर्गीकरणाला 'प्रकृतिप्रत्ययान्वित' वर्गीकरण असेही म्हणतात. 'प्रकृतिप्रत्ययान्वित' या संज्ञेतच या वर्गीकरणाचा अर्थ सामावलेला आहे. कारण प्रत्येक भाषेतील शब्दांचे मूळ वैशिष्ट्ये व त्यांना लागणारे लिंग, वचन, काळ, विभक्ती यांचे प्रत्यय व उपसर्ग यांचे परस्पर संबंध विशिष्ट नियम आणि पद्धतीवर आधारित असतात. शब्द वा पद हा वाक्यातील सार्थ घटक असल्यामुळे वाक्यामध्ये शब्दांची योजना विशिष्ट नियमांना अनुसरुन विशिष्ट पद्धतीने होत असते. कर्ता, कर्म, क्रियापदांची वाक्यातील स्थाने प्रत्येक भाषेत ठरलेली असतात. प्रत्येक भाषेची आकृती किंवा प्रकृती, तिचे स्वरूप म्हणजेच तिची वाक्यरचना असते हे लक्षात घेऊन हे वर्गीकरण केले जाते. याला रूपात्मक, रचनात्मक, पदाश्रित, व्याकरणिक अशाही नावांनी ओळखले जाते. श्लेगेल या भाषाभ्यासकाने अशा पद्धतीने वर्गीकरण करुन भाषांचे सहा प्रकार स्पष्ट केले आहेत. त्या प्रकारांचा आधार घेऊन बॉप, ग्रिम, श्लायशर, पॉट या भाषाभ्यासकांनी भाषांचे अयोगात्मक व योगात्मक या दोन गटात वर्गीकरण केले.

**१) अयोगात्मक भाषा :**

ज्या भाषाबांबत प्रकृती व प्रत्यय यांचा योग म्हणजेच जुळणी होत नाही त्यांना अयोगात्मक भाषा असे म्हणतात. या भाषांमध्ये शब्द त्यांच्या मूळ स्थित रूपात अविकृत राहतात. प्रत्यय लागून त्यांच्यात परिवर्तन होत नाही. पदांना लिंग, वचन, काळ, अर्थ इत्यादी साठी प्रत्यय न लागता स्वतंत्र शब्दच लावून ते काम केले जाते. प्रकृती-प्रत्यय असे विभाजन करण्याची येथे गरजच भासत नाही. म्हणूनच या गटातील भाषांना निरवयवी भाषा असेही म्हणतात. या भाषागटात चिनी, सयामी, सुदानी, तिबेटी, ब्रह्मदेशी इत्यादी भाषा येतात.

**२) योगात्मक भाषा :**

जगातील बहुतांश भाषा या गटात मोडतात. शब्दाची मूळ स्थिती म्हणजेच प्रकृती व त्याला लागणारे प्रत्यय यांच्या जुळणीस म्हणजे योगास या भाषांत महत्त्व असते. अशा भाषांचे तीन गटात विभाजन केले गेले आहे. अ) अश्लिष्ट योगात्मक भाषा, ब) श्लिष्ट योगात्मक भाषा आणि क) प्रश्लिष्ट योगात्मक भाषा. या तिन्ही संज्ञांचा परिचय करुन घेऊ.

**अ) अश्लिष्ट योगात्मक भाषा :**

या प्रकारच्या भाषांसाठी 'शब्दनिगडित' किंवा 'चिकट्या भाषा' अशीही संज्ञा वापरली जाते. निरनिराळे अर्थपूर्ण शब्द एकमेकांपुढे चिकटविल्यासारखे ठेवून वाक्य तयार करण्याची पद्धती अशा भाषांमध्ये आहे. अश्लिष्ट योगात्मक भाषांचे पाच वर्गात विभाजन केले जाते. १) अश्लिष्ट पूर्व-योगात्मक, २) अश्लिष्ट मध्य योगात्मक, ३) अश्लिष्ट पूर्वान्त योगात्मक, ४) अश्लिष्ट अन्तयोगात्मक, ५) अश्लिष्ट आंशिक योगात्मक.

अश्लिष्ट पूर्व-योगात्मक या वर्गातील भाषेतील वाक्यात शब्द, अलग अलग दिसले तरी प्रकृती आणि प्रत्यय यांच्या योगास तेथे वाव असतो. या भाषांत प्रत्यय शब्दांच्या आरंभी लागतो. म्हणूनच त्यांना पूर्व योगात्मक म्हटले आहे. आफ्रिकेतील बान्टु, झुलू या भाषात ही प्रवृत्ती दिसून येते. तर अश्लिष्ट मध्य योगात्मक भाषा या वर्गातील भाषांत द्विअक्षरी शब्द असतात. शब्दांच्या मध्येच प्रत्यय लागलेले असतात. आफ्रिकेजवळील मादागास्कर बेटे व हिंदी महासागरातील द्वीपे या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषात ही प्रवृत्ती दिसते. 'युण्डा' कुलातील संथाली भाषाही याच प्रवर्गातील आहे. भाषांत शब्दाच्या मूळ प्रकृतीच्या कधी मागे (पूर्व) तर कधी पुढे (अन्त) प्रत्यय जोडले जातात. न्यूगिनीमधील 'मकोर' भाषा याचे उदाहरण आहे. अशा भाषांना अश्लिष्ट पूर्वान्त योगात्मक भाषा म्हणतात. अश्लिष्ट अन्त योगात्मक भाषा या वर्गातील भाषांत शब्दाच्या मूळ प्रकृतीच्या शेवटी संबंधदर्शक प्रत्यय योजले जातात. द्राविडी परिवारातील भाषा व युरल अल्टाइक भाषा, तुर्की भाषा यामध्ये ही प्रवृत्ती दिसून येते. तर अश्लिष्ट आंशिक योगात्मक भाषा या वर्गातील भाषांत प्रकृतिप्रत्यय - योगाची प्रक्रिया पूर्ण नसते. तेव्हा या भाषा योगात्मक व अयोगात्मक या दोन्हीमध्येही मोडतात. म्हणून त्यांना आंशिक योगात्मक भाषा म्हणून संबोधले गेले आहे. बास्क, हौसा, जपानी, न्यूझीलंड व हवाई बेटे यामध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषा या गटात मोडतात.

**ब) श्लिष्ट योगात्मक भाषा :**

या प्रकारच्या भाषावर्गात मोडणाऱ्या भाषांत प्रकृति-प्रत्यय-योग होऊन शब्दांच्या मूळ प्रकृतीचे रूपपरिवर्तन होते, म्हणून या भाषांना विकारी किंवा विभक्तिप्रधान भाषा असेही म्हटले जाते. सिमेटिक हेमिटिक व इंडोयुरोपिय वंशातील प्रमुख भाषा या गटात येतात. या भाषांचे दोन प्रमुख गट केले जातात. १) अंतर्मुखी श्लिष्ट भाषागट व २) बहिर्मुखी श्लिष्ट भाषा गट या दोन्ही गटाचे पुन्हा प्रत्येकी दोन उपगट आहेत. १) संयोगात्मक व २) वियोगात्मक. पैकी अंतर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा या गटातील भाषांत प्रकृति-प्रत्यय यांचे तादात्म्य झालेले दिसते. सेमिटिक-हेमिटिक व अरबी भाषा या गटात मोडतात. तर बहिर्मुखी श्लिष्ट योगात्मक भाषा गटातील भाषांत शब्दांच्या मूलप्रकृतीनंतर प्रत्यय जोडले जातात. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अवेस्ता इत्यादी इंडोयुरोपीय परिवारातील प्राचीन भाषा संयोगात्मक भाषा येतात. या भाषांगटातील अर्वाचीन रुपे ही वियोगात्मक आहेत.

**क) प्रश्लिष्ट योगात्मक भाषा :**

अशा प्रकारच्या भाषांगटातील भाषांत प्रकृति-प्रत्यय इतके एक जीवित्वाने युक्त होतात की, त्यांचे वेगळेपण जाणवतच नाही. ते एकमेकांपासून वेगळेही करता येत नाही. या भाषागटाचे १) पूर्व प्रश्लिष्ट व २) आंशिक प्रश्लिष्ट असे दोन उपप्रकार केले गेले आहेत. पैकी पहिल्या उपगटातील भाषांमध्ये प्रकृति-प्रत्यययोग अतिशय पूर्णावस्थेत असतो. वाक्यच्या वाक्य पूर्ण शब्दासारखे होते. दक्षिण अमेरिकेतील चेरोकी, ग्रीनलँडमधील भाषा याचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. तर दुसऱ्या उपगटातील भाषांत सर्वनाम व क्रियापद यांचा योग होताना क्रिया ही अस्तित्वशून्य होऊन ती सर्वनामाची पूरक होते. पेरिलिज पर्वताच्या पश्चिम भागात बोलली जाणारी बास्क भाषा फ्रेंच, बंगाली, इंग्रजी, भोजपुरी या भाषा या गटात मोडतात.

आकृतिमूलक किंवा प्रकृतिप्रत्ययान्वित वर्गीकरण आपल्या ज्ञानात भर टाकण्याच्या दृष्टीने आपण समजावून घेतले. परंतु या वर्गीकरणाचा तात्त्विक आणि व्यावहारिक उपयोग फारसा न केल्यामुळे या वर्गीकरणाचा फारसा विकास होऊ शकला नाही. परंतु वर्णनात्मक

भाषाविज्ञानाच्या उदयानंतर 'भाषा ही एक संरचना आहे', 'तो एक चिन्ह, चिन्ह - चिन्हीत संबंध आहे' या तत्त्वांना अनुसरुन भाषाभ्यास होऊ लागला आहे. तेव्हा भाषाभ्यासकांनी या वर्गीकरणाचा आधार घेऊन जागतिक भाषांच्या वर्गीकरणाचा नव्याने विचार करायला हरकत नाही असे वाटते. असे असले तरी ज्या वर्गीकरण संकल्पनेच्या आधाराने ऐतिहासिक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा विकास झाला त्या भाषाकुल संकल्पनेतील मुख्य संकल्पना म्हणून वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरण ही संकल्पना ऐतिहासिक भाषाविज्ञानात महत्त्वाची मानली गेलेली संकल्पना आहे. या वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाची तात्त्विक मीमांसा आपणाला या ठिकाणी करावयाची आहे.

## २.४ भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण

कुलनिष्ठ वर्गीकरण ऐतिहासिक भाषाभ्यासात महत्त्वाचे आहे. या वर्गीकरणाला वाशिंक वर्गीकरण असेही म्हणतात. जगातील प्रमुख भाषांची निर्मिती किंवा त्या भाषांचे मूळ एकाच भाषेत असल्याचे भाषावैज्ञानिकांना जाणवले ते याच वर्गीकरणामुळे. श्लेगेल, रास्क, ग्रीम बंधू, बॉप्प, विल्यम जोन्स अशा पाश्चात्त्य भाषा संशोधकांनी लॅटिन, ग्रीक या भाषातील शब्दांच्या व्युत्पत्तीचा शोध घेताना संस्कृत भाषेशी तुलना करताना शब्दांच्या व्युत्पत्ती संदर्भात त्यांना लक्षणीय साम्य आढळून आले. नातेदर्शक शब्द, सर्वनामे, संख्यावाचक नामे, वार, महिने यांची नावे यांच्यातील साम्य केवळ योगायोगाने आलेले नाही. याची खात्री पटताच त्यांनी या भाषांचा तौलनिक आणि ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करुन या सर्व भाषांचे कुल समान असले पाहिजे असे सिद्ध केले. एकाच मूळ भाषेतून या भाषांची निर्मिती झाली असल्याचे पुरावेही उपलब्ध केले. त्यासाठी त्यांनी भाषांचे वंश निश्चित करून त्यांचे वर्गीकरण केले.

वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाची दृष्टी संस्कृत भाषेच्या अभ्यासानेच भाषा संशोधकांना मिळाली. १७६७ साली सर्वप्रथम कुर्डो या फ्रेंच मिशनऱ्याने एका निबंधातून लॅटिन भाषेशी असलेले संस्कृतचे साम्य विशद केले. त्यानंतर १७८६ मध्ये विल्यम जोन्सने लॅटिन आणि संस्कृत बरोबर ग्रीक भाषेचे साम्य उलगडून दाखविले. यानंतर श्लेगेल, रास्क, फ्रॉझ बॉप सारख्या अनेक भाषावैज्ञानिकांनी संस्कृतचे सखोल अध्ययन करुन विविध युरोपीय भाषांशी संस्कृतशी असलेले नाते स्पष्ट केले. त्यांनी वांशिक किंवा कुलनिष्ठ वर्गीकरणाला शास्त्रीय मान्यता मिळवून दिली. या अभ्यासापूर्वी लॅटिन आणि ग्रीक भाषांतील शब्दांचा हिब्रू भाषेतील शब्दाशी संबंध जोडला जायचा. परंतु नंतर ही अभ्यास करण्याची पद्धती मागे पडली. मॅक्समूलर सारख्या विद्वान अभ्यासकाने तर संस्कृतलाच भाषाभ्यासाचा पाया मानल्यामुळे संस्कृत व तिच्या कुलातील भाषांना महत्त्व प्राप्त झाले आणि एखादी नवी भाषा स्थैर्य पावताच तिचे 'कुळ' शोधण्याचा प्रयत्न होऊ लागला.

## २.५ जगातील प्रमुख भाषाकुले

भाषाभ्यासात ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या मर्यादा फेर्दिनां द सोस्यूर यांच्या अभ्यासातून समोर आल्या. तत्पूर्वी ऐतिहासिक भाषाभ्यासाची पद्धती जगात खूप लोकप्रिय होती. भाषांच्या उत्पत्तीविषयक पुराव्यांचा माग घेत मागे मागे जाताना पुराव्यांच्या अभावी या अभ्यासाला अनेक मर्यादा आल्या. तथापि ऐतिहासिक भाषाभ्यासातून जगातील बहुसंख्य भाषांचे कुलनिष्ठ वर्गीकरण

केले गेले. या अभ्यासातूनच 'भाषाकुल संकल्पना' विकसित होत गेली आहे. भाषांच्या कुलनिष्ठ वर्गीकरणातून जी प्रमुख भाषाकुल निश्चित करण्यात आली त्यांचा थोडक्यात परिचय करुन घेऊ.

**१) इंडो-युरोपियन किंवा आर्यभाषाकुल :**

भाषाभ्यासात सर्वप्रथम अस्तित्वात आलेले 'कुल' म्हणून या भाषाकुलाचा उल्लेख होतो. या कुलाच्या संशोधनामुळेच 'भाषाकुल' ही संकल्पना अस्तित्वात आली. युरोपातील व उत्तर भारतातील भाषांचा समावेश या कुलात प्रामुख्याने केला जातो. या भाषाकुलाला भारत युरोपीय, आर्यभाषाकुल, भारत जर्मानिक, कॉकेशियन, भारत हित्ती अशी ही नावे दिली गेलेली आहेत. 'संस्कृत' ही या कुलातील महत्त्वाची भाषा मानली गेली आहे. याच भाषाकुलाचा सविस्तर विचार आपणाला पुढे करावयाचा आहे.

**२) हेमिटो - सेमिटिक भाषाकुल :**

या कुलातील हेमिटिक गटात प्राचीन इजिप्शियन, कॉप्टिक भाषा, तसेच बार्बार व चाड या अर्वाचीन भाषा येतात तर सेमिटिक गटात अक्काडिअन व फिनिशिअन या प्राचीन हिब्रू व अरबी या अर्वाचीन भाषा मोडतात. ग्रीनबर्ग या अभ्यासकाने हेमिटो-सेमिटिक भाषाकुलाला 'ॲफ्रो-ऐशियायी' भाषाकुल असे नाव दिले आहे. या नावावरुनच गटाचा भौगोलिक विस्तार स्पष्ट झालेला आहे.

**३) सिनो-तिबेटिअन भाषाकुल**

या भाषाकुलाला 'इंडो-चायनीज' भाषाकुल असेही नाव आहे. आशिया खंडात या कुलातील भाषा बोलल्या जातात. बर्मी, तिबेटी, थायी आणि चीनमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेशही याच भाषाकुलात केला गेला आहे.

**४) द्राविडी भाषाकुल :**

दक्षिण भारतातील तामिळ, तेलगु, कानडी, मल्याळम या द्राविडी भाषाकुलातील भाषा होत. प्रथम हे भाषाकुल संस्कृतोद्‌भव भाषाकुल मानले जात होते. रास्क व काल्डवेल या अभ्यासकांनी द्राविडी भाषा या इंडो-युरोपियन भाषाकुलातील नसून त्यांचे वेगळे कुल आहे असा विचार मांडला. इंडो-युरोपियन भाषा बोलणारे लोक भारतात येण्यापूर्वी या कुलातील भाषा भारतभर पसरल्या होत्या. तसेच पूर्व बलुचिस्तानातील ब्राहुई याच कुलातील आहे.

**५) ऑस्ट्रो - ऐशियाची भाषाकुल :**

भारताच्या पूर्व भागात बोलल्या जाणाऱ्या मुंडा शाखेतील भाषा, ब्रह्मदेशातील मॉन-ख्मेर शाखा आणि अनाम-मुआंग शाखा यांचा या भाषाकुलात समावेश होतो. परंतु या शाखांचे कुलनिष्ठ संबंध निश्चित झालेले नाही.

**६) फिनो-उग्रिक भाषाकुल :**

या भाषाकुलाला उरालिक भाषाकुल असेही नाव आहे. फिनी, हंगेरियन, लपिश व सॅमोपेड या भाषा या कुलातील आहेत.

munotes.in

### ७) अल्ताईक भाषाकुल :

या भाषाकुलाचा फिनो-उग्रिक भाषाकुलांशी संबंध दाखवून काही भाषावैज्ञानिक या दोन कुलांचे 'उरल-अल्ताईक' भाषाकुल असेही नामकरण करतात. तुर्की, मंगोल, मांचू या भाषा या कुलातील आहेत.

### ८) कॉकेशस भाषाकुल

कास्पियन समुद्र, काळा समुद्र, कॉकेशस् पर्वत या प्रदेशात या कुलातील भाषा बोलल्या जातात. चेचेयन लेनी, सरकशी (उत्तर कॉकेशस), स्वानी, मिंगरेली, जॉर्जी (दक्षिण कॉकेशस) या भाषा या कुलातील प्रमुख भाषा होत.

### ९) मलायो-पॉलिनिशियन :

इंडोनेशियन व पॉलिनिशियन ह्या प्रमुख भाषा या कुलातील भाषा आहेत. जावा, सुमात्रा, बोर्निया, सिलबिज, फिलिपिन्स, बाली, न्यूझीलंड, सॅमोआ, हवाई, ताहिनी, मादागास्कर, मलायद्वीप आणि प्रशांत महासागरातील अनेक बेटे या परिवाराशी निगडित आहेत. या परिवारातील भाषा अश्लिष्ट योगात्मक आहेत.

### १०) जपानी-कोरियन भाषाकुल

जपानी भाषा ही या कुलातील मुख्य भाषा आहे. जपान, कोरिया, फार्मोसा, मंचुको, केरोलीन आणि मार्शल बेटे इत्यादी ठिकाणी या कुलातील भाषा बोलल्या जातात. या भाषादेखील अश्लिष्ट योगात्मक भाषा मानल्या जातात.

याशिवाय अमेरिकेतील मूळ भाषा, ऑस्ट्रेलियातील भाषा, आफ्रिकेतील भाषा, यांचेही स्वतंत्र भाषा कुल मानलेले आहेत. तसेच सुमेरिअन व इट्रस्कन या प्राचीन भाषा व उत्तर स्पेनमध्ये आज बोलली जाणारी बास्कभाषा या अशा एकाकी भाषा आहेत. तसेच अत्युतरी भाषाकुल, सुदानी भाषाकुल, बन्टु भाषाकुल, होतेन्तोत-बशुमन भाषाकुल, पापुवता भाषाकुल इत्यादी भाषाकुलांचाही उल्लेख केला जातो. येथे आपण इंडो-युरोपियन भाषाकुलाचा सविस्तर विचार नोंदवू.

## २.६ इंडो युरोपिअन भाषाकुल

इंडो युरोपिअन भाषाकुलाला भारत युरोपीय, आर्यभाषासंघ, भारत जर्मानिक, कॉकेशियन, भारत-हित्ती भाषाकुल असेही संबोधण्यात आले आहे. 'संस्कृत' ही या कुलाची केंद्रवर्ती भाषा असल्यामुळे 'संस्कृत भाषा कुल' म्हणूनही या कुलाचा निर्देश केला जातो. भारत युरोपीय भाषांच्या मुळाशी ही एकच भाषा असल्याचे भाषाभ्यासकांनी सप्रमाण सिद्ध केल्यामुळे बाकीची नावे मागे पडून 'भारत-युरोपीय भाषाकुल' हेच नाव सर्वमान्य झाले आहे. अर्थात हे नावदेखील सदोष अशा स्वरूपाचे नाव आहे. कारण भारत आणि युरोपात फक्त याच भाषाकुलातील भाषा बोलल्या जातात असे नाही, तर दक्षिण भारतात द्राविडी कुलातील भाषा बोलल्या जातात. शिवाय या कुलातील भाषा इतर काही देशातही बोलल्या जातात. शिवाय या कुलातील भाषा इतर काही देशातही बोलल्या जातात. परंतु हे नाव सदोष असूनही आज ते प्रचलित झाले आहे. या भाषाकुलातील 'संस्कृत' या मुख्य भाषेच्या अभ्यासानंतर मॅक्समूलर

सारख्या अभ्यासकांनी 'आर्यभाषाकुल' या नावांचाही वापर केला. परंतु हे नाव प्रचलित न होता इंडो-युरोपिअन भाषाकुल या नामाभिधानानेच हे भाषाकुल प्रसिद्ध झालेले आहे. या भाषाकुलात युरोप आणि आशिया खंडातील बहुतेक प्रमुख अशा अनेक भाषांचा समावेश होतो.

इंडो युरोपिअन भाषाकुलाचे प्रामुख्याने दोन वर्गात विभाजन होते. हे विभाजन अस्कोली या भाषावैज्ञानिकाने १८७० मध्ये भाषांच्या मूलध्वनींची तुलना करुन केलेले आहे. या कुलातील भाषांमधील मूल कंठ्यध्वनी काही भाषाशाखांत कायम राहतात. तर काही शाखांत मात्र ते 'श, स, ज' असे स्पर्श-संघर्षी होऊन उच्चारले जातात. 'क' या मूळ इंडो-युरोपिअन स्वनाचा अवेस्ता भाषेत 'स' आणि लॅटिन भाषेत 'क' होतो. हा फरक लक्षात घेऊन 'सतम' (सेन्तुम) आणि 'कन्तुम' या दोन वर्गात या कुलातील भाषा विभागल्या गेल्या आहेत. सतम् वर्गात अवेस्ता, फारशी, संस्कृत, हिंदी, लिथुआनियम, बल्गेरियन, रशियन इत्यादी पूर्वेकडील भाषांचा तर केन्तुम वर्गात लॅटिन, ग्रीक, इटालियन, फ्रेंच, ब्रिटन, गोलिक, तोखारी इत्यादी पश्चिमेकडील भाषांचा समावेश होतो. परंतु पूर्व व पश्चिम दिशांना अनुसरुन केलेले हे वर्गीकरण नव्या संशोधनाने रद्दबातल ठरविले आहे. कारण तुखारी आणि हिटाईट या शाखा भोगोलिक परिसरानुसार पूर्वेकडील असूनही त्यांच्या उच्चारणात बदल झालेला नसल्यामुळे त्यांचा समावेश 'केन्तुम' म्हणजे पश्चिम गटात करावा लागतो.

इंडो युरोपिअन भाषाकुलाचा विचार करताना या कुलातील भाषा बोलणारे भाषिक समाज गट प्रारंभी एकत्र रहात असावेत आणि नंतर ते टोळ्याटोळ्यांनी अन्यत्र गेल्यामुळेच त्यांच्या मूळ भाषेत फरक पडत गेला असावा असा अंदाज व्यक्त केला जातो. ही शक्यता सर्वच अभ्यासकांनी मान्य केली व ही मूळ भाषा इ.स. पूर्व ३००० वर्षे इतकी प्राचीन असून सुमारे इ.स. पूर्व २०० वर्षांनी या भाषाकुलाचा विविध शाखा झाल्या असाव्यात. या भाषाकुलाचा अभ्यास करणाऱ्या भाषावैज्ञानिकांनी ग्रीक, लॅटिन, जर्मन, रशियन अशा अनेक भाषांची तुलना संस्कृत भाषेशी करून या भाषांचे उगमस्थान एकच असण्याच्या अनुमानाला प्रमाणित्व प्राप्त करून दिले आहे.

munotes.in

### ❖ इंडो - युरोपिअन भाषाकुले

इंडो युरोपिअन भाषाकुलाची एकूण दहा शाखांमध्ये विभागणी होते ती खालीलप्रमाणे -

### १) भारत-इराणी शाखा (इंडो - इरानिअन) :

इंडो-युरोपिअन भाषाकुलातील ही प्रमुख शाखा असून मराठी भाषा याच शाखेतील भाषा मानली गेली आहे. कारण वैदिक भाषा आणि प्राचीन इराणी भाषा यांच्यातील साम्य लक्षात घेतल्यास पूर्वी एकत्र राहिलेले लोक याच शाखेतून भारतात आले आणि प्रमुख नद्यांच्या काठी वस्ती करुन राहू लागले. त्यांना 'आर्य' असे संबोधतात. तेव्हा या कुलातही दोन गट होतात. १) भारतीय आर्य भाषा गट आणि २) इराणी आर्य भाषा गट पैकी भारतीय आर्यभाषागटात प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन भारतीय भाषांचा समावेश होतो; तर असेच भाषागट इराणी आर्य भाषागटातही पाडले जातात. या भाषागटांचा सविस्तर आढावा आपण पुढे घेणार आहोत.

### २) बाल्टो - स्लॉविक शाखा :

या भाषागटाचा बाल्टो आणि स्लॉविक अशा दोन उपशाखा आहेत. इंडो-युरोपिअन भाषाकुलातील हा महत्त्वाचा भाषागट आहे. बाल्टिक समुद्राच्या आसपासच्या परिसरात बोलल्या

जाणारी भाषा म्हणून 'बाल्टो' हे नाव या भाषेला मिळाले आहे. या शाखेत लिथुआनियम आणि लॅटिश या भाषांचा समावेश आहे. लिथुआनियन भाषेचे सोळाव्या शतकापासूनचे भाषिक नमुने उपलब्ध आहेत. या भाषेत नामाची विभक्तिरूपे वैदिक संस्कृतप्रमाणे चालतात. वैदिक संस्कृतमध्ये आढळणारा व उत्तरकालीन अभिजात संस्कृतमध्ये लोप पावलेला सुराघात या भाषेने टिकवून ठेवला आहे. परंतु या शाखेच्या प्राचीन प्रशिअन व लॅटिश या भाषांत हा सुराघात आढळत नाही. त्यांच्या प्रयत्नांचे स्वरूपही लिथुआनियमपेक्षा वेगळे आहे. प्राचीन प्राशिअन आज अस्तित्वात नाही. तिची जागा जर्मन व लिथुआनियम या भाषांनी घेतली आहे. लेटिश भाषा व तिच्या बोली मात्र आजही बोलल्या जातात. स्लॉविक या उपशाखेचा प्राचीन नमुना नवव्या शतकातील आहे. या शाखेच्या प्राचीन अवस्थेला 'प्राचीन ख्रिस्ती स्लॉविक' किंवा 'प्राचीन बल्गेरिअन' असे नाव आहे. या शाखेच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण अशा तीन उपशाखा आहेत. पैकी पूर्व वर्गातील महत्त्वाच्या रशियन भाषेतून विविध प्रकारची साहित्य निर्मिती झालेली आहेत. राजकारण, कला, विज्ञान अशा जीवनसन्मुख ज्ञानशाखांत या भाषेचा अग्रक्रमाने वापर करण्यात येतो. सोव्हिएत राज्याची 'राष्ट्रभाषा' होण्याचा सन्मान या भाषेला मिळाला आहे. बल्गेरिअन, झेक, पोलिश, रशियन इत्यादी भाषा या शाखेतील अर्वाचीन भाषा आहेत. बाल्टिक व स्लाविक या उपशाखांत मोठ्या प्रमाणावर साधर्म्य आढळते.

### ३) आर्मिनिअन शाखा :

या भाषेवर इराणी भाषेचा प्रभाव आहे. या भाषेत इराणी शब्द मोठ्या प्रमाणात आढळतात. इराणची राजकीय अधिसत्ता अनेक शतकापर्यंत होती. तसेच इराणच्या सरहद्दीला लागूनच हा भाषिक पट्टा असल्याने स्वाभाविकच इराणीचा पगडा या शाखेवर पडला आहे. कॉकेशचा दक्षिण भाग, मेसापोटेमिया व काळ्या समुद्राच्या दक्षिण भागात ही भाषा वापरली जाते. याशिवाय इजिप्त, तुर्कस्थान, रुमानिया, अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व बल्गेरिया या भागातही अर्मिनिअन भाषा बोलणारे भाषिक समाज गट आहेत.

### ४) आल्बेनियम शाखा :

या भाषेवर लॅटिन, ग्रीक, स्लाविक व तुर्की भाषांचा परिणाम झालेला आहे. या भाषेचा शब्दसंग्रह लॅटिनशी मिळता जुळता आहे. एशियाटिक समुद्राच्या पूर्वेकडील पर्वतीय प्रदेशात ही भाषा बोलली जाते. या भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. तिचा इतिहास सर्वसाधारणतः १४ व्या शतकापासून सांगता येतो. ही भाषा प्रामुख्याने आल्बेनियात बोलली जाते.

### ५) इटालिक किंवा रोमन शाखा :

या शाखेला लॅटिन शाखा असेही म्हणतात. कारण ही शाखा मूळ लॅटिनपासून झालेली आहे. या शाखेचे ओस्कन उम्ब्रिअन आणि लॅटन-फॅलिस्कन गटातील भाषा महत्त्वाची आहे. रुमानिया, स्पॅनिश, फ्रेंच या भाषांचा समावेश या शाखेत होतो. कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून हीच भाषा वापरली जाते. या भाषेतून उच्च दर्जाची साहित्यनिर्मितीही झाली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात या भाषेचा वापर होतो. या भाषेचा प्रभाव वर्तनातही दिसतो. दक्षिण अमेरिकेस आजही लॅटिन अमेरिका म्हटले जाते. ग्रीसमधील ॲटिक बोलीप्रमाणे फ्लॉरेन्स शहरात बोलल्या जाणाऱ्या लॅटिनला महत्त्व प्राप्त झाले आहे. इटलीमधील अन्य बोली प्रचारातून नाहीशा झाल्या आहेत. लॅटिन ही ग्रांथिक भाषा असली तरी तिची बोलीही प्रचारात होती. तिला व्यावहारिक लॅटिन असे म्हणतात. या व्यावहारिक लॅटिनपासूनच इटालिअन फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज व रूमेनिअम भाषा निर्माण झाल्या.

munotes.in

**६) ग्रीक किंवा हेलेनिक शाखा :**

या भाषा गटातील भाषा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असल्या तरी आज फार थोडे लोक या भाषा बोलतात. ग्रीस, सायप्रस व तुर्कस्तानात तुरळकपणे ग्रीक भाषा बोलतात. ग्रीक भाषेतील प्राचीन नमुने इ.स. पूर्व १४५० ते १२०० या काळातील आहेत. मातीच्या शिक्क्यांवरील हे नमुने 'मासेनिअन ग्रीक' म्हणून ओळखले जातात. ग्रीसची प्राचीन संस्कृती व परंपरा जपणाऱ्या ग्रीस बोलीतून ग्रीक भाषेची निर्मिती झाली. या भाषेतील सामासिकता, प्रत्यय, लिंग, वचने अशा काही गोष्टी संस्कृतसारख्याच आहेत. या भाषेला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. ही भाषा अल्बेनियाचा भाग, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, एजियन सामुद्रिक बेटे अशा काही क्षेत्रात वापरली जाते.

**७) जरमॅनिक शाखा :**

या शाखेची तीन उपशाखेत विभागणी केली जाते.

१) **पूर्वशाखा :** या शाखेतील सर्वात प्राचीन नमुना इसवी सनाच्या चौथ्या शतकातील गोथिक भाषेतील आहे. गोथिक ही पूर्व शाखेतील भाषा आहे. परंतु आज तिची अर्वाचीन अवस्था उपलब्ध नाही. पश्चिम जर्मॅनिक शाखेतील जर्मनने आज गोथिकची जागा घेतली आहे.

२) **पश्चिम शाखा :** पश्चिम शाखेचे हाय जर्मॅनिक, लो जर्मॅनिक व ॲग्लो फ्रिझिअन असे गट आहेत. जर्मन ही हाय जर्मॅनिक शाखेतील प्रमुख भाषा आहे, तर डच आणि इंग्रजी या अनुक्रमे लो जर्मॅनिक आणि ॲग्लो फ्रिझिअन शाखातील महत्त्वाच्या भाषा आहेत.

३) **उत्तर शाखा :** आइस्लॅडिक, स्वीडिश, नॉर्वेजिअन व डेनिश या भाषांचा समावेश या शाखेत होतो.

**८) केल्टिक शाखा :**

या भाषेचे प्राचीन नमुने उपलब्ध नाहीत. ही शाखा इटालिक शाखेशी आपले साम्य दर्शविते. या शाखेच्या दोन उपशाखा आहेत. १) गेलिक शाखा व २) ब्रिटानिक शाखा. गेलिक शाखेत आयर्लंडमधील आयरिश भाषेचा समावेश होतो. तर ब्रिटानिक शाखेत इंग्लंडच्या वेल्स भागात बोलली जाणारी वेल्शी आणि फ्रान्सच्या उत्तरेकडील ब्रिटानिआ वसाहतीतील ब्रेटन या भाषांचा समावेश होतो.

**९) तुखारी शाखा :**

इसवी सनाच्या सहाव्या ते आठव्या शतकात लिहिलेली बौद्धधर्मीय हस्तलिखिते ही तुखारी भाषेचे उपलब्ध प्राचीन नमुने होत. ही हस्तलिखिते मध्य आशियातील चिनी तुर्कस्तानमध्ये १९ व्या शतकाच्या अखेरीस सापडली. या भाषेच्या दोन बोली आहेत. यातील पूर्वेकडील बोलीला 'अग्नी' व पश्चिमेकडील बोलीला 'कुची' म्हणतात. भारतीय व ग्रीक भाषेशी या भाषेचा संबंध होता.

**१०) हिटाइट शाखा :**

या शाखेतील भाषांना ॲनटोलिअन असेही म्हणतात. या शाखेतील भाषिक नमुना इ.स. पूर्व १७०० ते १२०० मधील आहे. हिटाईट भाषेत लिहिलेल्या मातीच्या विटा विसाव्या शतकात तुर्कस्तानातील उत्खननात सापडल्या. या कुलाच्या आठ शाखा निश्चित केल्या आहेत. हिटाइट शाखेच्या इंडो-युरोपिअन भाषाकुलातील भाषांचे स्थान कोणते याबाबत अभ्यासकात दोन

munotes.in

मतप्रवाह आहेत. संस्कृत, ग्रीक व भाषांप्रमाणे लॅटिश हिटाइट भाषा इंडो-युरोपियन भाषेपासून निर्माण झाली असे मानणारा एक मतप्रवाह आहे. तर हिटाइट भाषा बोलणारे भाषिक समाजगट इंडो-युरोपियन भाषा बोलणाऱ्या भाषिक समाजगटापासून प्रथम वेगळे झाले असावेत म्हणून हिटाइट भाषेचे स्वरूप संस्कृत ग्रीक इत्यादी भाषांपेक्षा प्राचीन आहे; असे मानणारा दुसरा मतप्रवाह या भाषेच्या संदर्भात आहे.

## २.७ इंडो-इरानिअन भाषाकुल

या शाखेला 'आर्यशाखा' असेही म्हटले जाते. इरानिअन शाखेचे १) इराणी शाखा आणि २) आर्य भारतीय शाखा असे दोन विभाग होतात. प्राचीन आर्यभारतीय भाषा वैदिक संस्कृत आणि प्राचीन इराणी भाषा या भाषांतील साम्य लक्षात घेतल्यास या दोन भाषा बोलणारे भाषिक समाज पूर्वी इराणमध्ये एकत्र राहिले असावेत आणि एकच भाषा बोलत असावेत असे अनुमान या भाषांच्या अभ्यासाने करण्यात आले आहे.

### १) इराणी शाखा :

इराणी शाखेच्या प्राचीन, मध्य व अर्वाचीन अशा तीन अवस्था आहेत हे आपण इंडो - युरोपिअन भाषाकुलाची माहिती घेताना अगदी सुरुवातीला नमूद केले आहेच. 'इराणी' हा शब्द 'आर्याणाम' या शब्दाचा अपभ्रंश असल्यामुळे ही भाषा आर्यभाषाकुलातीलच भाषा ठरते. इराण प्रांतात आर्याची वस्ती  असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन वैदिक संस्कृत विशेषतः ऋग्वेद आणि प्राचीन इराणमधील अवेस्ता या भाषेतील साम्य लक्षात घेण्यासारखे आहे. अवेस्ताची निर्मिती इ.स.पू. सातव्या शतकातील असून या ग्रंथातील गाथांचे स्वरुप ऋग्वेदातील प्रार्थनास्तोत्रांप्रमाणे आहे. या दोन ग्रंथातील साम्य प्राचीन संस्कृत आणि प्राचीन इराणीतही दिसून येते. प्राचीन इराणीचे पूर्वेकडील बोलीत पारशी धर्मग्रंथांची अवेस्ता भाषा येते. अवस्तांच्या 'गाथांची भाषा आणि गाथोत्तर भाषा' अशा दोन अवस्था आहेत. वैदिक संस्कृत आणि अवेस्ता या भाषांत ध्वनिसाम्य व व्याकरणिक साम्य आहे. 'अवेस्ता' हा पारशी धर्मग्रंथ असून 'अवेस्ता' या शब्दाचा अर्थ 'शास्त्र' असा आहे.

पश्चिमेकडील इराणी भाषेत प्राचीन पर्शिअन भाषा येते. या भाषेतील साहित्य उपलब्ध नाही. मात्र इ.स. पूर्व चौथ्या-पाचव्या शतकातील शिलालेख उपलब्ध आहेत. अवेस्ताप्रमाणे प्राचीन पर्शिअनचे वैदिक संस्कृतशी साम्य आहे. प्राचीन पर्शिअनची मध्ययुगीन अवस्था म्हणजे पहलवी आणि अर्वाचीन अवस्था म्हणजे इराणमध्ये आज बोलली जाणारी पर्शिअन भाषा होय. अर्वाचीन पर्शिअन भाषेत विपुल साहित्य निर्मिती झालेली असून या भाषेचे स्वरूप 'अयोगात्मक' आहे. अरबी शब्दांचा भरणाही या भाषेत येतो. अवेस्ताची मध्ययुगीन अवस्था उपलब्ध नाही. पूर्वेकडील अर्वाचीन भाषांचा समावेश यात होतो. याशिवाय पंजाबकडे बोलली जाणारी 'दार्दिक' किंवा 'दरदीय' भाषा ही इराणीशी संबंधित असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. या भाषेला इंडो-इरानियन शाखेची तिसरी उपशाखा मानावी असे काही अभ्यासकांचे मत आहे. 'दार्दिक' या खोवारी, वाखी उपशाखेत काश्मिरी खोवारी, काफिरीसारख्या भारताच्या वायव्यकडे बोलल्या जाणाऱ्या भाषांचा समावेश होतो.

**२) आर्यभारतीय शाखा :**

या शाखेच्या प्राचीन, मध्य आणि अर्वाचीन अवस्था आहेत. प्राचीन अवस्थेत वैदिक संस्कृत आणि पाणिनी उत्तरकालीन संस्कृत किंवा अभिजात संस्कृत अशा दोन भाषिक अवस्था येतात. तर मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश अवस्थांचा समावेश होतो आणि अर्वाचीन अवस्थेत मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती इत्यादी आज बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषांचा समावेश होतो.

## २.८ अंतरवर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांत

होन्र्ले यांनी मांडलेला अंतरबहिर्वर्तुळ सिद्धांत आर्यांच्या द्विरागमन सिद्धांतावर आधारलेला आहे. वरती आपण इंडो-युरोपिअन भाषाकुलातील आर्यभारतीय भाषांची आपण थोडक्यात ओळख करुन घेतली. याच कुलातील मराठी भाषेचा जन्म कसा झाला हे सांगणारे जे अनेक सिद्धांत अथवा मत-प्रवाह आहेत. त्यापैकीच अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत हा एक सिद्धांत होय. या सिद्धांताप्रमाणे पश्चिम हिंदी ही अंतरवर्तुळातील भाषा आहे. तर लोढी, सिंधी, गुजराती, मराठी, ओरिया, बिहारी, बंगाली व आसामी या बहिर्वर्तुळातील भाषा आहेत असे मानले जाते. अंतरवर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत होन्र्ले या भाषाभ्यासकाने मांडला. हा सिद्धांत आर्यांच्या द्विरागमन सिद्धांतावर आधारलेला आहे.

अंतरवर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांतानुसार होन्र्ले यांच्या मते, आर्य भारतात दोन टोळ्यांनी आले. पहिल्यांदा आलेली आर्यांची टोळी गंगेच्या पश्चिम दुआबात वसाहत करुन राहिली होती. परंतु त्यानंतर आलेल्या दुसऱ्या टोळीतील आर्यांनी पहिल्यांदा आलेल्या आर्यांना हुसकावून लावले. ते पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर या चारही दिशांना पांगल्यामुळे दुसऱ्या टोळीने येऊन गंगेच्या दुआबात स्थिरावलेल्या आर्यांच्या वसाहतीभोवती त्यांचे एक कडे झाले. यालाच होन्र्ले यांनी बाहेरचे वर्तुळ असे म्हटले. या बहिर्वर्तुळ आर्यांच्या बोलीपासून म्हणजे 'मागधी बोली' पासून लोढी, सिंधी, मराठी, ओरिया, बिहारी, बंगाली व आसामी या वर्तमान भारतीय भाषा उत्क्रांत झाल्या तसेच बहिर्वर्तुळाच्या आत नंतर येऊन स्थिरावलेल्या आर्यांच्या वसाहतीस होन्र्ले यांनी 'अंतरवर्तुळ' असे म्हटले. या वर्तुळातील आर्यांच्या बोलीपासून म्हणजेच पश्चिमेच्या 'शौरसेनी बोली' पासून पश्चिम हिंदी ही भाषा उत्क्रांत झाली असे मत होन्र्ले यांचा हा सिद्धांत सांगतो. होन्र्लेचा हा सिद्धांत मुख्यतः भाषिक वैशिष्ट्यांवर अधिष्ठित असलेला सिद्धांत आहे. यालाच 'द्विरागमन सिद्धांत' किंवा 'पाचर सिद्धांत' असेही म्हणतात. आधी आलेल्या आर्यांच्या प्रदेशात नंतर आलेल्या आर्यांची भाषा पाचरीसारखी घुसली; म्हणून या सिद्धांताला 'पाचरसिद्धांत' असे म्हटले गेले.

होन्र्ले यांच्या मते प्रागैतिहासिक काळात उत्तर भारत दोन बोली भाषांत विभागला होता. एक पश्चिमेकडील 'शौरसेनी' बोलीचा तर दुसरा पूर्वेकडील 'मागधी' बोलीचा. एवढेच नव्हे तर प्रागैतिहासिक काळापूर्वी सारा उत्तर भारत मागधी बोलीनेच व्यापलेला होता. अर्थात होन्र्ले यांच्या या मतात बरेच तथ्य आहे. कारण आर्यांची दुसरी टोळी येऊन गंगेच्या दुआबात स्थिर होण्याआधी जे आर्य या ठिकाणी होते त्यांच्याच 'मागधी' बोलीने सर्वसाधारणपणे उत्तर हिंदुस्थान व्यापलेला दिसतो. शौरसेनेची लाट नंतर पाचरीसारखी घुसली. होन्र्ले यांच्या या सिद्धांताला रिस्लो व रामप्रसाद चंदा या मानववंशास्त्रज्ञांनीही पाठिंबा दिला. तर ग्रिअर्सन यांना होन्र्ले यांचा हा

सिद्धांत मान्य नसला तरी आर्यभारतीय भाषांची 'अंतबहिर्वर्तुळात केलेली भाषांची वर्गवारी मात्र मान्य आहे. त्यांनी अंतरर्वर्तुळ आणि बहिर्वर्तुळ या दोहोतील भाषांशी साम्य दर्शविणारा 'अंतरबहिर्वर्तुळ' असा तिसरा गट कल्पिला व या गटात पंजाबी, गुजराती, राजस्थानी आणि पूर्व हिंदी भाषांचा समावेश केला. तर डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी 'अंतरवर्तुळ-बहिर्वर्तुळ' सिद्धांताला विरोध केला आहे. होर्न्ले आणि ग्रिअर्सन यांनी दिलेली भाषिक कारणे चटर्जी यांना पुरेशी वाटत नाहीत. त्यांनी याबाबत स्वतंत्र उपपत्तीचे सूचन केले आहे. त्यांच्या उपपत्तीनुसार आर्यलोक हिंदुस्थानात अनेक टोळ्यांनी आले. केवळ दोन टोळ्यांनी आले असे नाही. त्यातील काही टोळ्या परस्परांशी साधर्म्य दाखविणाऱ्या होत्या. पैकी भाषिक साधर्म्य महत्त्वाचे मानावे असे त्यांचे मत आहे. येथे आपण मराठी भाषेच्या संदर्भाने आर्यभारतीय शाखेचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

## २.९ आर्यभारतीय शाखा

**प्राचीन अवस्था :**

आर्यभारतीय शाखेतील प्राचीन भाषा म्हणजे संस्कृत. या संस्कृतचेही वैदिक संस्कृत व पाणिनी उत्तरकालीन किंवा अभिजात संस्कृत असे कालिक भेद मानले आहेत. या भेदांचाही मराठीच्या जडणघडणीत कसा वाटा आहे ते यावरून लक्षात येते.

**वैदिक संस्कृत :**

वैदिक संस्कृतच्या काळाविषयी नेमका अंदाज बांधता येत नसला तरी ही भाषा इ.स. पूर्व १५०० ते १००० या काळात बोलली जात नसावी असा अभ्यासकांचा तर्क आहे. तो सर्वांनीच गृहीत धरला आहे. वैदिक संस्कृतात चार वेद व ब्राह्मण ग्रंथ यांचा समावेश होतो. उपनिषदे आणि सूत्रे या वेदांच्या उत्तरकालीन रचनादेखील वैदिक संस्कृत या भाषिक टप्प्यावरच येतात. वैदिक संस्कृतचा प्राचीन नमुना म्हणून ऋग्वेदाचा दाखला दिला जातो. दोन ते नऊ या मंडलातील भाषा व पहिल्या आणि दहाव्या मंडलातील भाषा यात फरक आहे; असेही मानले जाते. वैदिक संस्कृतची या उपलब्ध साहित्याच्या आधारे काही वैशिष्ट्ये सांगितली गेली आहेत. अ, इ, उ, ऋ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर वैदिक संस्कृतमध्ये आढळतात. विशेषणे नामाप्रमाणे चालतात. लिंगे तीन, वचने तीन आणि विभक्ती आठ आहेत. क्रियापदांच्या रूपांत परस्मैपद आणि आत्मनेपद असा भेद आढळतो. भूतकाळ दर्शविण्यासाठी भूतकाळ, तृतीय भूतकाळ आणि परोक्ष भूतकाळ अशी तीन प्रकारची रूपे दिसतात. भविष्यकाळ दर्शविण्यासाठी 'स्य' प्रत्ययी रूपे आढळतात. परंतु, कालवाचक क्रियापदांची नियमित रूपे आढळत नाहीत.

**पाणिनी संस्कृत :**

अभिजात संस्कृतचा कालखंड सर्वसाधारणतः इ.स. पूर्व १००० ते इ. सनाचे चौथे-पाचवे शतक मानला जातो. या काळात 'रामायण', 'महाभारत' ही महाकाव्ये व कालिदास, भवभूती आदींची काव्य, नाटके तसेच शंकराचार्य, रामानुज इत्यादींची तत्त्वज्ञानपर भाष्ये लिहिली गेली. तर पाणिनी, पतंजली या व्याकरणकारांनी उत्तरकालीन संस्कृतचे व्याकरण लिहिले. अभिजात संस्कृत ही वैदिक संस्कृतची उत्तरकालीन अवस्था मानली गेली आहे. तिच्या स्वनव्यवस्थेत फारसा फरक नाही. संस्कृतमध्ये वाक्यातील शब्दक्रम निश्चित नाही. वैदिक संस्कृतात उपसर्गाचा क्रमदेखील निश्चित नव्हता. उत्तरकालीन संस्कृतमध्ये मात्र उपसर्ग

धातूच्यापूर्वी येतात. वैदिक वाङ्मयातील बरेचसे शब्द उत्तरकालीन संस्कृतमध्ये आढळत नाहीत. याशिवाय वैदिक संस्कृतमध्ये आयात शब्दांची संख्या मर्यादित आहे. उत्तरकालीन संस्कृतात ते मोठ्या प्रमाणावर सापडतात. लिखित भाषा म्हणून संस्कृतचा वापर करताना व्याकरण व्यवस्थेचे काटेकोर पालन केले गेले. परंतु बोलीत कारपरत्वे होणारे विकार होतच राहिले. यातूनच वेगवेगळ्या प्राकृतभाषा निर्माण झाल्या असे मानले जाते.

**मध्य अवस्था :**

मध्य अवस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश भाषांचा विचार केला जातो. प्राकृत शब्दाने निरनिराळ्या भाषांचा म्हणजे मागधी, अर्धमागधी, महाराष्ट्री, शौरसेनी इत्यादी भाषांचा बोध होतो. परंतु खरी प्राकृत म्हणजे एक बाकीचे भेद देशभेदानेच झालेले आहेत. एका मतानुसार संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांपैकी संस्कृताशी विशेषतः वैदिक संस्कृताशी अत्यंत सदृश असलेली भाषा म्हणजे पाली ही होय. या भाषेला बौद्धमागधी असेही संबोधिले जाते.

प्राकृत भाषा म्हणजे त्या वेळी पूर्वेकडील मगध देशापासून ते पश्चिमेकडील पंजाब आणि दक्षिणेकडील माळवा, विदर्भ इत्यादी प्रदेशापर्यंत चालणारी लोकभाषा होती. तिलाच पुढे 'पाली' असे नाव पडले. सम्राट अशोकाने ठिकठिकाणी ज्या आज्ञा कोरुन ठेवल्या त्या पाली भाषेत आहेत. एका मतानुसार पाली ही बौद्ध धम्माची स्वतंत्र भाषादेखील मानली गेली आहे. एवढेच नव्हे तर संस्कृत आणि एतद्देशीय द्रविडादी दोन निकटवर्ती भाषांचा अपभ्रंश स्वरूपातील जो परस्परसंबंध म्हणजे पाली भाषा होय. पाणिनीय संस्कृतपेक्षा आधीची भाषा म्हणूनही पालीचा उल्लेख केला जातो. पाली या शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती दिल्या जातात. 'पाली' या शब्दाचा अर्थ 'ओळ' असा होतो. या दृष्टीने धम्मग्रंथातील ओळीत समाविष्ट झालेली ती पाली.

**प्राकृत भाषा :**

इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड इ.स. २०० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालखंडातील प्राकृत भाषा म्हणजे पैशाची, शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री या संस्कृत नाटकातून प्रकट झालेल्या भाषा. यापैकी शौरसेनी ही उदीच्या देशातील भाषा व मागधी ही प्राच्य देशातील भाषा व पैशाची-पिशाच्य देशाची भाषा तर 'महाराष्ट्री' या शब्दावरुन ही महाराष्ट्र देशातील भाषा असावी. याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. काही अभ्यासकांच्या मते महाराष्ट्री ही कोणत्याही प्रदेशाची किंवा त्या प्रदेशातील लोकांची भाषा नसून ती केवळ काव्याची भाषा होती असे मत आहे. इ. सनाच्या पाचव्या शतकात होऊन गेलेला प्राकृत व्याकरणकार 'वररुचि' यांनी आपल्या 'प्राकृतप्रकाश' या ग्रंथात महाराष्ट्री ही प्रमुख भाषा मानतात. त्याच्यानंतर हेमचंद्र (इ.स. ५०० ते ७००) हा व्याकरणकार प्रत्येक प्राकृत शब्द संस्कृतपर्यंत नेताना कित्येक शब्दांची परंपरा संस्कृतपर्यंत नेता येत नसल्याचे सांगतो. या भाषांमध्ये विपुल साहित्य निर्मिती झाली. वररुचि आणि हेमचंद्र यांनी प्राकृत भाषेचे व्याकरण रचून प्राकृतच्या लिखित स्वरूपाला स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला.

**अपभ्रंश भाषा :**

इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा प्राकृत भाषांचा कालखंड. प्राकृत भाषांमध्ये विपुल साहित्यनिर्मिती झाली. वररुचि आणि हेमचंद्र यांनी प्राकृत भाषेचे व्याकरण रचून प्राकृतच्या लिखित स्वरूपाला स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यवहारातील प्राकृत भाषा मात्र बदलतच राहिल्या आणि इ.स. ४०० च्या आसपास प्राकृत भाषा लुप्त होऊन अपभ्रंश भाषांचा कालखंड

सुरू झाला. पैशाची अपभ्रंश, शौरसेनी अपभ्रंश, मागधी अपभ्रंश, महाराष्ट्री अपभ्रंश अशा अपभ्रंश बोली त्या त्या प्राकृत भाषेपासून निर्माण झाल्या.

अपभ्रंश भाषांच्या निर्मितीस आणखी एक प्रभावी कारण काही भाषाभ्यासक सांगतात; ते म्हणजे इ.स. ६००, च्या थोडे आधी प्राकृत भाषांना परकीय भाषांशी पुन्हा एकदा संघर्ष करावा लागला. पल्लव, शक, गोपाळ, अहिर इत्यादी अन्य धर्माच्या व अन्य मानववंशाच्या भिन्न भाषिक लोकांचे पंजाब मार्गे भारतात आगमन झाले व आपल्या सामर्थ्याने त्यांनी काही काल राज्यपदही भोगले व येथील आर्यांच्या प्राकृत भाषा आत्मसात करायला सुरुवात केली. या दोन भिन्न भाषिक संघर्षातून प्राकृत भाषा बदलू लागली व त्यातूनही अपभ्रंश भाषा जन्मास आल्या. प्राकृत भाषांची सुलभीकरणाची प्रवृत्ती अपभ्रंशात अधिक व्यापक प्रमाणात दिसते. सर्वसाधारणपणे अकराव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषा टिकल्या. पुढे भिन्न भाषिकात संघर्ष होऊन आधुनिक आर्यभारतीय भाषा उदयास आल्या. पैकी मराठी ही एक आर्यभारतीय भाषा आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भाषाकुल सिद्धांतातील आर्यभारतीय शाखा स्पष्ट करा.

## २.१० समारोप

भाषाकुल संकल्पना ही ऐतिहासिक भाषाभ्याचे फलित आहे. कधीकाळी ऐतिहासिक भाषाभ्यास हेच भाषाविज्ञान होते. या अभ्यासपद्धतीचा पाया भारताच्या भूमीवर कलकत्ता येथील ऐशियाटिक सभेच्या वार्षिक अधिवेशनात घातला गेला. त्यासाठी या अधिवेशनातील सर विल्यम जोन्स यांचे भाषण महत्त्वाचे ठरले. त्या भाषाणातील सूत्राधारेच भाषांचा ऐतिहासिक अभ्यास आणि भाषाकुल संकल्पनेचा जन्म झाला. जगभरातील भाषाकुलांचा जन्म त्यातून झाला. येथे आपण भाषाकुल संकल्पनेचा सविस्तर विचार केला. तो करताना भाषिक वर्गीकरणाचे तत्त्व, तसेच भाषांचे वर्गीकरण आणि जगातील प्रमुख भाषाकुले याची चर्चा केली. इंडो-युरोपिअन भाषाकुल व त्यातील आर्यभारतीय भाषाकुलांचा विस्ताराने आढावा घेताना अंतर्वर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांतही सविस्तर अभ्यासला. शेवटी मराठी भाषेच्या संदर्भाने आर्यभारतीय भाषाकुलाचा विस्ताराने अभ्यास केला आहे.

## २.११ संदर्भ ग्रंथ

१) मालशे, इनामदार / सोमण (संपा) : 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक' : पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
२) कुलकणी, कृ.पा. : 'मराठी भाषा उद्‌गम व विकास' : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३) गजेंद्रगडकर, श्री. न. 'भाषा आणि भाषाशास्त्र' : व्हीनस प्रकाशन, पुणे.

munotes.in

४) मालशे, मिलिंद : 'आधुनिक भाषा विज्ञान' : सिद्धांत आणि उपयोजन : लोकवाङ्मयगृह, मुंबई.
५) डॉ. कानडे, मु. श्री. : 'मराठीचा भाषिक अभ्यास' : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक : स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
६) डॉ. मालशे, डॉ. पुंडे, डॉ. सोमण : 'भाषाविज्ञान परिचय' : पद्मगंधा प्रकाशन, पुणे
७) डॉ. गवळी, अनिल : 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा' : हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर
८) डॉ. खैरे, विश्वनाथ : 'मराठी भाषेचे मूळ' : मराठी संशोधन मंडळ, मुंबई

## २.१२ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) ऐतिहासिक भाषाभ्यासाचे फलित म्हणून 'भाषाकुल संकल्पना' विस्ताराने स्पष्ट करा.
२) जगातील प्रमुख भाषाकुलांची सविस्तर चर्चा करा.
३) इंडो - युरोपिअन भाषाकुलांची सविस्तर चर्चा करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१) अंतर्वर्तुळ - बहिर्वर्तुळ सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा.
२) इंडो - इरानिअन शाखा थोडक्यात लिहा.
३) आर्यभारतीय भाषाकुलाची थोडक्यात चर्चा करा.

**क) टिपा लिहा**

१) कुलनिष्ठ वर्गीकरण
२) भाषाकुल
३) पाचर सिद्धांत

❖❖❖❖

munotes.in

# घटक-३

## स्वनपरिवर्तन

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ स्वन म्हणजे काय ?
३.३ स्वनपरिवर्तनः संकल्पना व स्वरूप
३.४ स्वनपरिवर्तनाची कारणे
३.५ स्वनपरिवर्तनाचे प्रकार
३.६ समारोप
३.७ संदर्भ ग्रंथ
३.८ सरावासाठी प्रश्न

### ३.० उद्दिष्ट्ये

१. वर्णनात्मक भाषा जीवनातील 'स्वन' ही संकल्पना लक्षात येईल.
२. भाषेतील स्वनाचे महत्त्व समजेल.
३. भाषा व्यवहारातील स्वनाचा विविधांगी वापर समजून येईल.
४. स्वनपरिवर्तन कशाप्रकारे व कोणत्या रूपात होते ते लक्षात येईल.
५. आधुनिक भाषाजीवनातील स्वनविचार लक्षात येईल.

### ३.१ प्रस्तावना

'भाषा' या दोन अक्षरी शब्दाला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मानवी जीवन जसे प्रवाही असते तसेच भाषा ही सुद्धा परिवर्तनशील असते. तिच्यात सातत्याने बदल होत असतो. मात्र हे बदल संथपणे व निश्चितपणे घडून येतात. यालाच 'भाषिक परिवर्तन' असे म्हणतात. ऐतिहासिक भाषाशास्त्रातील ही पायाभूत संकल्पना आहे. ज्येष्ठ भाषावैज्ञानिक जे.एच. ब्रेडस्डॉर्फ यांनी १८२१ मध्ये सर्वप्रथम भाषेच्या परिवर्तनाचा अभ्यास केला. ब्रेडस्डॉर्फ हे ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे अभ्यासक होते. त्यांनी भाषिक परिवर्तनाची मांडणी करताना त्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यामध्ये एक ध्वनी म्हणजे स्वनपरिवर्तन व दोन अर्थपरिवर्तन यांचा समावेश होतो. या दोन्ही स्तरावरील परिवर्तनाची ब्रेडस्डॉर्फ यांनी सामाजिक, सांस्कृतिक,

munotes.in

राजकीय व भौगोलिक परिप्रेक्ष्यात कारणमीमांसा करून आठ कारणे सांगितली आहेत. यामध्ये श्रवण आणि आकलन यांमध्ये घडणारी चूक, विस्मृती, वागिंद्र यातील दोष, आळस वा सुस्ती, सदृश्यतेकडील प्रवृत्ती, आपण इतरांहून वेगळे आहोत हे दर्शविण्याची इच्छा, नवीन कल्पना व्यक्त करण्याची आवश्यकता, परभाषा वा परसमाज यांचा प्रभाव यांचा समावेश होतो. या सर्व कारणमीमांसेतून भाषिक परिवर्तनाची मूलभूत मांडणी पाहावयास मिळते. ब्रेडस् कारणमीमांसेतून भाषिक परिवर्तनाची मूलभूत मांडणी पाहावयास मिळते. ब्रेडस्डॉर्फ यांनी सर्वप्रथम ध्वनिपरिवर्तनाचा विचार नव्याने केला आहे. आधुनिक भाषाविज्ञानात त्यालाच 'स्वनपरिवर्तन' असे म्हटले जाते. फर्दिना -द - सोस्यूर यांनी वर्णनात्मक भाषाविज्ञानात या 'स्वन' संकल्पनेची मांडणी केलेली आहे. ज्यामध्ये स्वनांची भाषावैज्ञानिक चिकित्सा पाहावयास मिळते. प्रस्तुत घटकामध्ये आपण स्वनपरिवर्तनाचा विचार विस्ताराने करणार आहोत.

## ३.२ स्वन म्हणजे काय?

भाषेच्या संरचनेत ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ हे प्रमुख चार घटक असतात. त्यातील ध्वनी हा आद्य घटक असून ऐतिहासिक भाषाशास्त्रात याचा विचार प्राधान्याने केला जातो. मात्र आधुनिक भाषाविज्ञानात ध्वनींची मूलगामी चिकित्सा करून त्यासाठी स्वन ही नवी संज्ञा वापरलेली आहे. स्वन याला इंग्रजीत Phone असे म्हणतात. याचा स्वतंत्र अभ्यास स्वनविज्ञान (Phonetics) या शाखेमध्ये केला जातो. सामान्यतः मानव मुखावाटे असंख्य ध्वनी उच्चारू शकत असला तरी सर्वच्या सर्व ध्वनी भाषेत वापरत नाही. प्रत्यक्ष भाषेत उपयोजिले जाणारे ध्वनी म्हणजे 'स्वन' होय. स्वनिम विचारात स्वनाची व्याख्या विस्ताराने दिलेली आहे. भाषाभ्यासक लिहितात,

"ज्या ध्वनींच्या अंगी भाषिक ध्वनी बनण्याची क्षमता आहे व ज्या ध्वनींच्या साहाय्याने भाषेत उपयुक्त संप्रेषण कार्य होते. त्या ध्वनींना स्वन असे म्हटले जाते."

स्वनांचा उच्चार व्यक्तिविशिष्ट असतो. स्वनांच्या अंगी अर्थभेद करण्याची क्षमता असते. सुट्या सुट्या स्वनांना काही अर्थ नसला तरी विशिष्ट रचनेमध्ये गेल्यानंतर त्याला अर्थ प्राप्त होतो. त्यामुळे स्वन हा भाषेतील महत्त्वाचा आद्य घटक ठरतो. याचा अभ्यास दोन प्रकारे केला जातो. त्यामध्ये एक स्थैर्यप्रधान व दोन गतिप्रधान यांचा समावेश होतो. स्वनांचे उच्चारानुसार वर्गीकरण करुन त्यांची उत्पत्ती कशी होते याचा अभ्यास हा स्थैर्यप्रधान होय. तर एकाच भाषेतील स्वन कालांतराने बदलतात. त्यांच्यात परिवर्तन होते. याचा अभ्यास हा गतिप्रधान असतो. दुसऱ्या प्रकारातील अभ्यास हा ऐतिहासिक भाषाशास्त्राचा पायाभूत चिंतनविषय आहे. त्यामध्ये स्वन परिवर्तन हा मूलभूत घटक असून त्याची संकल्पनात्मक मांडणी यात केलेली आहे.

## ३.३ स्वनपरिवर्तन : संकल्पना व स्वरूप

ना. गो. कालेलकर यांनी आपल्या 'ध्वनिविचार' या ग्रंथामध्ये भाषेतील ध्वनी म्हणजेच स्वनाचा मूलभूत विचार केलेला आहे. मराठी भाषेतील भाषा विज्ञानातील हा मूलगामी ग्रंथ आहे.

भाषेतील स्वनांचा विशिष्ट संकेत असतो. त्यांची विशिष्ट रचना असते. त्यामध्ये परिवर्तन होते. या स्वन परिवर्तनाची व्याख्या करताना ते लिहितात.

"एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या बोलण्यातील स्वन कालांतराने बदलतात. त्याला स्वन परिवर्तन असे म्हणतात."

स्वन परिवर्तन अखंड व सार्वत्रिक असते. त्याची एक प्रक्रिया सातत्याने कार्यान्वित असते. या प्रक्रियेचे मूळ मानवाच्या शारीरिक व मानसिक स्वभाव वैशिष्ट्यात दडलेले आहे. त्यात व्यक्तिसापेक्ष, काळसापेक्ष, प्रदेश सापेक्ष, समाज सापेक्ष असे बदल होत असतात. स्वन परिवर्तनाचे मूळ कशात असावे यासंबंधी ऐतिहासिक भाषाशास्त्रात काही उपपत्ती सांगितलेल्या आहेत. त्यामध्ये शारीरिक गुणधर्म व विकृती, मानसिक प्रवृत्ती, परिसराची वैशिष्ट्ये, भाषा संपादन व उपयोजन यांचा समावेश होतो.

स्वन परिवर्तनाचे काही स्वरूप विशेष सांगितले जातात. त्यामध्ये ते निर्पवाद असते. म्हणजे त्यात होणारे बदल नियमांनी अभ्यासता येतात. हे परिवर्तन अमर्याद असते. मानव, समाज आणि संस्कृतीमध्ये ज्याप्रमाणे सातत्याने बदल होतात. त्याप्रमाणे स्वन परिवर्तन हे स्वाभाविकपणे होते. त्यात सहजता असते. ते अज्ञेय म्हणजे कुठे, केव्हा, कसे घडेल हे सांगता येत नाही. यांचा समावेश होतो. एकूणच स्वनपरिवर्तन ही संकल्पना भाषाभ्यासात महत्त्वाची असून ऐतिहासिक भाषाशास्त्रातील ती पायाभूत संकल्पना आहे.

## ३.४ स्वन परिवर्तनाची कारणे

भाषा ही परिवर्तनशील आहे. या तत्त्वानुसार ऐतिहासिक भाषाशास्त्रात भाषेचा अभ्यास केला जातो. ब्रेडस्डॉर्फ यांनी स्वनपरिवर्तनाचा मूलगामी विचार करताना त्याची अनेक कारणे सांगितली आहेत. या कारणांचे स्वरूप दुहेरी आहे. कोणतीही भाषा ही बोलणाऱ्याच्या वर्तनावर अवलंबून असते. व्यक्तीपरत्वे भिन्न असते. त्यामुळे भाषेतील स्वन परिवर्तन विविधांगी आहे. त्याची काही कारणे आहेत. ज्यामध्ये काही कारणे बाह्य तर काही कारणे अंतर्गत आहेत. सामान्यतः यामध्ये व्यक्तिकेंद्री, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय परिप्रेक्ष्यातील कारणांचा समावेश होतो. त्यांचा विचार विस्ताराने पुढीलप्रमाणे करता येईल.

### १) अनुकरणांची अपूर्णता :

मानव भाषा शिकत असतो. त्याला ती शिकावी लागते. त्यामध्ये एखाद्याने उच्चारलेल्या शब्दांचे अनुकरण करण्याची प्रक्रिया घडत असते. मात्र हे अनुकरण व्यवस्थित झाले नाही तर त्यातून ध्वनी परिवर्तन घडून येते. उदा. 'डॉक्टर' या शब्दांचे उच्चारण 'डाकटर' असे केले जाते. यातून स्वन परिवर्तन घडून येते.

### २) आळस :

मानव हा स्वभावतः आळशी प्राणी असतो. त्याच्या आळसामागे शारीरिक, मानसिक कारणे असतात. माणसातील या आळशीपणामुळे बऱ्याच वेळा त्याच्या बोलण्यात बदल होत

munotes.in

असतो. विशेषतः त्याच्या बोलण्यातील ध्वनी बदलतात यातून भाषिक परिवर्तन पर्यायाने स्वन परिवर्तन घडून येते.

**३) वांशिक शरीर वैशिष्ट्ये :**

जन्मतः एखाद्या मुलास आई वडिलांकडून वांशिक रूपात काही आचार, विचार, विकार येतात. त्यामुळे त्याच्या उच्चार यंत्रणेत बिघाड घडून येतो. याचा परिणाम त्याच्या बोलण्यावर होतो. त्यातूनही स्वन परिवर्तन घडून येते.

**४) उच्चार इंद्रियातील दोष :**

मानवी शरीराची काही शारीरिक व्यंगे असतात. ती स्वन परिवर्तनास कारक ठरतात. त्यामध्ये जीभ जड असणे, दात नसते, घशात बिघाड असणे इत्यादींचा समावेश होतो. हे स्वन परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे.

**५) श्रवण इंद्रियातील दोष :**

भाषा व्यवहारात बोलणारा हा जसा महत्त्वाचा असतो तशाच प्रकारे ऐकणारा हा सुद्धा महत्त्वाचा घटक आहे. बोलणाऱ्याचे ध्वनी जर व्यवस्थितपणे ऐकले नाहीत तर त्या ध्वनींचे उच्चारण करताना बदल होऊ शकतो. त्यामुळे श्रवण ही क्रिया महत्त्वाची आहे. कान हे श्रवणइंद्रिय असून त्यातील दोष हा स्वन परिवर्तनास कारक ठरतो.

**६) उच्चारशीघ्रता :**

बोलत असताना बोलण्याची गती जलद ठेवल्यास शब्दांचा उच्चार पूर्ण होत नाही. बरेच शब्द लुप्त होतात. उच्चारामध्ये फरक पडतो. याचा परिणाम म्हणजे उच्चार शीघ्रतेतून स्वन परिवर्तन घडून येते.

**७) व्यवसाय :**

मानव अनेक व्यवसाय करत असतो. त्यात त्या व्यवसायामध्ये विशिष्ट पद्धतीने आवाज काढले जातात. उदा. भाजीवाला भाजी विकत असताना 'भाजी घ्या, भाजी!' असा आवाज काढतो. इथे 'भाजी' हा शब्दप्रयोग दोनदा आल्यामुळे बऱ्याच वेळा त्यातील स्वन एकदाच उच्चारले जातात. यातूनही स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे व्यवसाय हे सुद्धा स्वन परिवर्तनाचे कारण ठरते.

**८) लोकभ्रम :**

लोकभ्रम म्हणजे समाजात असणाऱ्या काही चुकीच्या प्रथा अथवा समज होत. भाषा व्यवहारात काही शब्द वापरणे अशुभ, वाईट मानले जाते किंवा त्याचा उच्चार हा अयोग्य मानला जातो. उदा. शिव्या. यातूनही स्वन परिवर्तन घडून येते.

**९) अज्ञान :**

बऱ्याच वेळा एखाद्या वस्तूची माहिती लोकांना असत नाही. तिचे नाव त्यांना माहीत नसते. अशावेळी त्या वस्तू नावाचा उच्चार त्या व्यक्तीला करता येत नाही. यातूनही स्वनपरिवर्तन घडते.

munotes.in

**१०) भाऊकता :**

मानव हा मूलतः भावनाशील असतो. अनेक प्रकारच्या भावभावना प्रसंगपरत्वे त्याच्या मनात निर्माण होतात. प्रत्येक भावनेच्या अभिव्यक्ती वेळी माणसाचा उच्चार बदलतो. उदा. दुःखाच्या वेळी तो रडतो. त्याचा कंठ भरुन येतो. त्यावेळी होणारे उच्चार बदलतात. त्यामुळे भाऊकता हे सुद्धा स्वन परिवर्तनाचे कारण ठरते.

**११) उच्चारसौकर्य :**

भाषाव्यवहार हा बोलणाऱ्याच्या वर्तनावर अवलंबून असतो. बऱ्याच वेळा बोलणारा अवघड वाटणाऱ्या शब्दांचा उच्चार सोपा करून बोलण्याचा प्रयत्न करत असतो. यातून स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे उच्चार सौकर्य हे स्वन परिवर्तनाचे कारण ठरत असते.

**१२) आघात :**

काही लोक बोलताना विशिष्ट शब्दांवर आघात करून बोलतात किंवा काहींच्या आवाजात दीर्घ स्वर सातत्याने येत असतात. मुख्यतः आघातामुळे उच्चारात बदल होतो. यातून स्वनपरिवर्तन घडून येते.

**१३) उच्चारदीर्घता :**

भाषेचा वापर करत असताना बोलणाऱ्याच्या उच्चारात जर सातत्याने दीर्घ स्वर आले तर त्यातूनही स्वन परिवर्तन घडून येते. त्यामुळे उच्चारदीर्घता हे एक स्वनपरिवर्तनाचे कारण सांगितले जाते.

**१४) लेखन पद्धती :**

भाषेच्या तंत्रामध्ये लेखन हे एक महत्त्वाचे तंत्र आहे. वास्तविक लिपीच्या शोधानंतर लेखन पद्धती अस्तित्वात आली. बोलणे आणि लिहिणे यात बऱ्याच वेळा फरक असतो. अशा वेळी बोलणाऱ्याच्या उच्चारात बदल केला जातो. उदा. 'पारंपरिक' या शब्दाचा उच्चार 'पारंपारिक' असा केला जातो. यातून इथे स्वनपरिवर्तन झाल्याचे दिसते.

**१५) नैसर्गिक मनोधैर्य :**

माणसाला नेहमी नव्याचे आकर्षण असते. त्याचे मन प्रत्येक वेळी नव्या गोष्टींचा स्वीकार करत असते. यातूनच भाषेत नवे शब्द येत असतात. त्या शब्दांचा उच्चार करताना बऱ्याच वेळा बदल होत असतो. यातूनही स्वन परिवर्तन घडून येते.

**१६) सामाजिक परिस्थिती :**

मानव समाजशील प्राणी आहे. समाज हा विशिष्ट संस्कृतीने बांधलेला असतो. त्या संस्कृतीच्या अंतरंगात उपसमाज असतात. त्यांची विशिष्ट बोली असते. यात विविधता पहावयास मिळते. या सामाजिक परिस्थितीचा परिणाम बोलीवर होतच असतो. यातूनही स्वन परिवर्तन घडते.

### १७) भौगोलिकता :

भाषेवर अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. त्यामध्ये निसर्ग हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. भाषकाच्या बोलण्यावर या निसर्गाचा परिणाम होतो. त्यातून त्याने उच्चार बदलतात. उदा. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टी या भौगोलिक ठिकाणी नासिक्य उच्चार मोठ्या प्रमाणात येतात. यातून स्वन परिवर्तन घडून येते.

### १८) स्थलांतर :

माणसांचा इतिहास पाहिल्यास त्यामध्ये स्थलांतर हा महत्त्वाचा बदल होता. एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी त्याने आदिम काळापासून स्थलांतर केलेले आहे. आजही अनेक लोक व्यवसाय, प्रवास या निमित्ताने स्थलांतर करतात. यातून त्यांच्या भाषेवर परिणाम होतो. त्यामुळे हे स्थलांतर स्वनपरिवर्तनास कारक ठरते.

### १९) भिन्न भाषासंपर्क :

भाषा हे दोन व्यक्तींना जोडण्याचे प्रमुख माध्यम आहे. बऱ्याच वेळा व्यवसाय, पर्यटन, नोकरी या निमित्ताने दोन वेगवेगळ्या भाषिक समूहातील लोक एकत्र येतात. त्या दोघांच्या भाषेत देवाणघेवाण होते. त्यात भाषामिश्रण घडून बऱ्याच वेळा स्वनपरिवर्तन घडून येते. त्यामुळे हे स्वन परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे.

### २०) जित-जेते संबंध :

भारतावर वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या परकीय लोकांनी आक्रमणे केली आहेत. त्यामध्ये आर्य, हून, डच, इंग्रज यांचा समावेश होतो. या सर्वांनी भारतावर आक्रमण करून इथल्या ऐतदेशीय लोकांना पराजित केले. यावेळी त्यांनी आपली भाषा त्यांच्यावर लादली. यातूनही भाषिक परिवर्तन पर्यायाने स्वन परिवर्तन घडून आले.

एकुणच वरील सर्व स्वन परिवर्तनाची कारणे महत्त्वाची आहेत. त्यामधून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व ऐतिहासिकता पाहावयास मिळते. ब्रेडस्‌डॉर्फ यांनी या सर्वांची मूलभूत मांडणी केलेली आहे. या कारणातूनच स्वन परिवर्तन घडून येते. त्याचे काही प्रकार पडतात. त्यांचाही विचार ब्रेडस्‌डॉर्फ यांनी केलेला आहे.

## ३.५ स्वनपरिवर्तनाचे प्रकार

### १) गुण :

स्वन परिवर्तनामधील गुण हा महत्त्वाचा प्रकार आहे. यामध्ये इ, ऊ, ऋ, लृ ऐवजी ऐ, ओ असे परिवर्तन घडून येते. उदा. - तुण्ड, तोंड असे स्वनपरिवर्तन होते.

### २) वृद्धी :

स्वनपरिवर्तन होत असताना बऱ्याच वेळा अ, इ, ऊ, ऋ, लृ ऐवजी औ, ऑ, ल असा बदल होतो. उदा. मलीन = मैल, महिषी = म्हैस असे स्वनपरिवर्तन घडून येते. या प्रकारास 'वृद्धी' असे म्हणतात.

**३) संप्रसारण :**

भाषाव्यवहार हा संप्रेषण असतो. यामध्ये य, व, र, ल ऐवजी इ, ऊ, ऋ असे स्वनपरिवर्तन होत. उदा. द्विप्रहर = दुपार असा बदल होतो. त्यावेळी होणाऱ्या स्वन परिवर्तनास 'संप्रसारण' असे म्हणतात.

**४) स्वरागमण :**

भाषा व्यवहारामध्ये बोलणाराच्या शारीरिक, मानसिकतेचा प्रभाव पडतो. वागेंद्र यातील दोषामुळे संयुक्त स्वनिमांचे कठीण उच्चार सुलभ केले जातात. त्यात मूळ उच्चारात नसलेले स्वन येतात. उदा. स्क्रू = इसकरू यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'स्वरागमण' असे म्हणतात.

**५) स्वरभक्ती :**

प्रत्येक व्यक्तीचा भाषाव्यवहार हा वेगळा असतो. बऱ्याचवेळा बोलणाऱ्याच्या उच्चारात एखादा शब्द सातत्याने येतो. याचे कारण म्हणजे त्या शब्दाविषयी असणारी आवड होय. स्वन परिवर्तनास यातूनच स्वर भक्ती हा प्रकार निर्माण झाला आहे. उदा. धर्म - धरम, रक्त - रगत, प्रकार - परकार असे स्वनपरिवर्तन केले जाते.

**६) अंत्यस्वरलोप :**

काही शब्दातील शेवटचे वर्ण शब्दावरील आघातामुळे किंवा उच्चाराकडे बोलणाऱ्याचे लक्ष नसल्यामुळे उच्चारले जात नाहीत. अशा अंत्यवर्णाचा कालपरत्वे लोप होतो. त्यास 'अंत्यस्वरलोप' असे म्हणतात. उदा. जावे - जावं, खावे - खावं असे स्वनपरिवर्तन होते.

**७) समान स्वरलोप :**

काही वेळा शब्दात येणारे दोन समान स्वर उच्चारात एकत्र उच्चारले जातात. त्यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'समान स्वरलोप' असे म्हणतात. उदा. एकएक - एकेक, सुके केळे - सुकेळे असे स्वन परिवर्तन होते.

**८) घोषीकरण :**

शब्दातील अघोष ध्वनी घोषयुक्त उच्चारले जातात. म्हणजे ऱ्हस्व उच्चार असणारे दीर्घ केले जातात. त्यावेळी होणाऱ्या स्वन परिवर्तनास 'घोषीकरण' असे म्हणतात.

**९) अघोषीकरण :**

घोषीकरण या प्रकारापेक्षा उलट म्हणजे शब्दातील घोष ध्वनी अघोषयुक्त उच्चारले जातात. म्हणजे दीर्घ उच्चार ऱ्हस्व केले जातात. यावेळी होणाऱ्या स्वनपरिवर्तनास 'अघोषीकरण' असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वन परिवर्तनाची कारणे स्पष्ट करा.

munotes.in

## ३.६ समारोप

ऐतिहासिक भाषाशास्त्रात भाषिक परिवर्तन हा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. त्यामध्ये ध्वनिपरिवर्तन म्हणजेच स्वनपरिवर्तन हा विशेष चिंतनाचा भाग असून त्याविषयी आधुनिक भाषाभ्यासकांनी महत्त्वाची मांडणी केलेली दिसते. जी आपण वरीलप्रमाणे पाहिलेली आहे. कोणत्याही भाषेमध्ये हे स्वनपरिवर्तन सातत्याने घडून येते. ज्यामधून ती भाषा समृद्ध होते. तिला भाषिक वैभव प्राप्त होते. त्यामुळे स्वनपरिवर्तन हे भाषिक परिवर्तनात महत्त्वाचे होते.

## ३.७ संदर्भ ग्रंथ


१) ना. गो. कालेलकर, 'ध्वनिविचार', मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९५५.

२) अशोक केळकर, 'भाषाविज्ञान व वाङ्मय परिभाषा कोश', भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००१.

३) स. ग. मालशे, हे. दि. इनामदार, अंजली सोमण, (संपा.), 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती, २००५.

४) मिलिंद मालशे, 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन', लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००४.


## ३.८ नमुना प्रश्न

१) स्वन संकल्पना स्पष्ट करा.

२) स्वन परिवर्तन म्हणजे काय ते लिहा.

३) स्वन परिवर्तनाची कारणे विशद करा.

४) स्वन परिवर्तनाचे प्रकार स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# घटक - ४

## अर्थपरिवर्तन

**घटक रचना :**

४.० उद्देश
४.१ प्रस्तावना
४.२ अर्थपरिवर्तनाचे स्वरूप
४.३ अर्थपरिवर्तनाची कारणे
४.४ अर्थपरिवर्तनाचे प्रकार / वर्गीकरण
४.५ भाषिक आदान - स्वरूप
४.६ आदानाचे कारण
४.७ आदानाचे प्रकार
४.८ समारोप
४.९ संदर्भ सूची
४.१० सरावासाठी प्रश्न

### ४.० उद्देश

१) अर्थपरिवर्तनाच्या संकल्पनाचे आकलन करणे.
२) अर्थपरिवर्तनाची कारणे समजून घेणे.
३) अर्थपरिवर्तनाची वर्गीकरण उदाहरणासहित आकलन करणे.
४) आदानाचे (भाषिक) स्वरूप समजणे.
५) भाषिक आदानाची कारणे व वर्गीकरणाचे आकलन करणे.

### ४.१ प्रस्तावना

भाषा हे संपूर्ण मानवजातीला मिळालेले सर्वश्रेष्ठ असे वरदान आहे. भाषेचा जन्म मानवाच्या सहजप्रवृत्तीतून झाला. स्वाभाविक प्रवृत्तीमुळे त्याला बहर आला. भाषा हे मानवाचे एक वैशिष्ट्य असल्यामुळे मानवी जीवनाचे ते एक महत्त्वाचे अंग आहे. भाषेच्या अंगभूत सामर्थ्यामुळेच मानवी जीवनात भाषेला एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे. भाषेविना माणूस केवळ मुकाच नव्हे तर दुर्बलही झाला असता. आपले सर्व जीवन भाषेवरच अवलंबून आहे. आपल्या भावभावना माणूस भाषेद्वाराच समर्थपणे व्यक्त करू शकतो.

मराठीतील भाषा हा शब्द मूळ संस्कृत भाषेतील भाष् (म्हणजे बोलणे) या धातूपासून तयार झालेला तत्सम शब्द आहे.

munotes.in

कोणता ना कोणता आशय दुसऱ्यापर्यंत पोहचवण्यासाठी भाषा उपयोगात येत असते. काही वेळा विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यासाठी भाषा विशिष्ट शब्द म्हणजे खुणा किंवा संकेत वापरत असत.

"भाषा म्हणजे मानवनिर्मित ध्वनींमधून निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण संकेतांची योग्य मांडणी होय."

भाषा परिवर्तनशील असल्यामुळे काळाच्या ओघात तिच्या स्वरूपामध्ये बदल होतच असतात. कधी ते बदल व्यक्तिगत पातळीवर होतात. कधी एखाद्या समूहाकडून सामूहिकरीत्या होतात. जेव्हा या बदलांना विस्तृत, व्यापक स्वरूप येते व ते ती भाषा बोलणाऱ्या मोठ्या समाजाकडून स्वीकारले जातात तेव्हा ते भाषेत स्थिर होतात. आपण सर्वजण रोज या भाषा-प्रक्रियेत सहभागी होत असतो. पण हे बदल सूक्ष्मरित्या व हळूहळू होत असतात ते आपल्या लक्षात येत नाहीत. ते भाषेत स्थिर, रूढ झाले की मग त्यांची नोंद घेतली जाते. कधी भाषेच्या शब्दांच्या उच्चारात फरक पडतो तर कधी त्यांचा अर्थ बदलतो.

## ४.२ अर्थपरिवर्तनाचे स्वरूप

शब्द आणि अर्थ याच्या संयोगाने भाषिक व्यवहार करता येते. अर्थात असे जरी असले तरी भाषेते घडून येणाऱ्या बदलाचा परिणाम कधी ध्वनीरूपावर तर कधी त्यांच्या अर्थावरही होतो. उदा. संस्कृतमधील 'वेणा' या शब्दाचा अर्थ भाषेच्या पूर्व काळात कुठल्याही स्वरुपाची शारीरिक वेदना असा होता. परंतु भाषेच्या उत्तरकाळात या विशिष्ट शब्दाचा अर्थ प्रसूती काळाच्या वेदना असा रूढ झालेला दिसतो. शब्दाच्या ध्वनीरुपात फरक न पडता त्याच्या अर्थामध्ये जेव्हा फरक दिसून येतो. त्यावेळेला ते अर्थपरिवर्तन आहे असे म्हणावे लागते.

उदा. संस्कृत शब्द 'आकाशवाणी' घ्या, संस्कृतमध्ये याचा अर्थ 'देववाणी' होतो. आता आकाशवाणीचा अर्थ रेडिओ असा बदलला आहे.

हे अर्थपरिवर्तन भाषेमध्ये सूचित होत असते. जेव्हा जुन्या वाङ्मयातील एखादा शब्द अनपेक्षित अशा संदर्भात योजलेला दिसतो. तेव्हा अर्थपरिवर्तन घडते.

उल्मान या भाषावैज्ञानिकाने अर्थपरिवर्तनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"जेव्हा आशयाला नवे अभिमान प्राप्त होते अथवा एखाद्या अभिमानाशी नवीन अर्थ संबंधित होतो. तेव्हा अर्थपरिवर्तन घडून येते."

ध्वनिरूप आकार व त्याचा आशय यांतील संबंध म्हणजे अर्थ किंवा एखादा अभिधानाशी (ध्वनीरूप आकाराशी) नवा अर्थ संबंद्ध होतो, तेव्हा अर्थपरिवर्तन घडून येते. कर्म > कम्म > काम हे आशयाला प्राप्त झालेले वेगवेगळे ध्वनीरूप आकार होत. 'शेगडी' म्हणजे या एकाच ध्वनीरूप आकाराला प्राचीन काळी वेगळा व अलीकडे वेगळा असे भिन्न अर्थ मिळाले आहेत. ही दोन्ही अर्थपरिवर्तनेच असे 'उल्मान' म्हणतात. ब्लूमफिल्ड मात्र ध्वनिरूपांचा विचार बाजूला

ठेवतात व आशयावर लक्ष केंद्रित करतात. शब्दांचे व्याकरणावर कार्य लक्षात न घेता शब्दांच्या आशयात जे परिवर्तन होते, तेवढ्यापुरतीच अर्थपरिवर्तनाची व्याप्ती करण्यावर त्यांचा भर आहे.

"Innovations which change the lerical meaning rather than the grammatical function of a form are closed as change as change of meaning or semantaic change" असे अर्थपरिवर्तनाचे स्वरुप ते स्पष्ट करतात.

कोणताही शब्द भाषेमध्ये रूढ होतो. तो त्याच्या मुळाशी असलेल्या संकेताच्या कल्पनेच्या जोरावर शब्दाला अर्थ कसा प्राप्त होतो हे पाहण्यापेक्षा एका वस्तूला तिचा वाचक शब्द कसा प्राप्त होतो हे पाहणे संयुक्तिक ठरेल. वस्तू व तिचा वाचक शब्द यांना जोडणारा दुवा म्हणजे संकेत वा कल्पना होय.

उदा. 'तो घरी आला' म्हणजे कुटुंबात 'मुला - माणसांत', 'निवाऱ्याच्या जागी' असा त्याचा अर्थ होतो. बौद्धिक अंशाबरोबर भावनिक अंगही असतो. 'त्याचे पानिपत झाले' हा शब्द इ.स. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतरच मराठीमध्ये रूढ झाला. 'बुद्ध' या शब्दाचा वाच्य अर्थ 'ज्याला ज्ञान प्राप्त झाले आहे असा!' पण आज 'बुद्ध' म्हटल्यावर बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध आठवतात. 'लैला मजनू', 'रोमियो-ज्युलियट' ही वास्तविक व्यक्तिनामे आहेत. पण अशी जोडीने उच्चारली की त्यातून एकमेकांसाठी प्रेमासाठी प्राण देणाऱ्या प्रेमिकांची प्रतीके उभी राहातात. इंग्रजीमध्ये 'मदर', 'सिस्टर' या शब्दाचे एरवीचे अर्थ वेगळे व चर्च किंवा हॉस्पिटलमध्ये वेगळे होतात.

भाषा परिवर्तनशील आहे. पेशवेकालीन बखरीतील गद्य, इंग्रजांच्या कालखंडातील गद्य आणि आजची मराठी एकत्र ठेवली तर भाषेची परिवर्तनशीलता ध्यानात येते.

अशा प्रकारे अर्थपरिवर्तनाचे स्वरूप पाहिल्यानंतर त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## ४.३ अर्थपरिवर्तनाची कारणे

**१) लाक्षणिक प्रयोग :**

आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहचवणे हा भाषेचा मुख्य हेतू असून आपली अभिव्यक्ती इतरांहून सुंदर असावी असा विचार प्रत्येक वक्त्याचा असतो. म्हणूनच तो लक्षणेचा उपयोग करतो.

उदा. 'टेबलाचे पाय', 'खुर्चीची पाठ' इत्यादी याच प्रकारे 'गोड बोलणे', 'कटू अनुभव', 'निर्जीव भाषा' या प्रयोगामध्येही लाक्षणिकता आहे.

**२) परिस्थितीतील बदल :**

मेये या भाषावैज्ञानिकाने अर्थपरिवर्तनाची पुढील तीन कारणे सांगितली आहेत.

**अ) भाषिक परिस्थिती :** भाषेतील विशिष्ट परिस्थितीमुळे काही वेळा अर्थपरिवर्तन घडून येते. फ्रेंचमध्ये नकारार्थी Ne हे अव्यय अन्य शब्द यांचा एकत्रित वापर पूर्वी केला जाई.

उदा. Ne Personne (Nobody) पण कालांतराने Ne हे अव्यय गळून पडले. Personne हा एकच शब्द Person व Nobody या दोन्ही अर्थी वापरला जाऊ लागला.

**ब) ऐतिहासिक परिस्थिती :** शब्दांचे स्वरूप पूर्ववत राहिले तरी परिस्थितीमध्ये घडत आलेल्या बदलामुळे अर्थात बदल घडून येतो.

उदा. मागे पाहिलेले 'शेगडी' चेच उदाहरण पूर्वी 'कोळशाची चूल' या अर्थी हा शब्द वापरला जाई. आता 'गॅस' 'विजेची शेगडी' या अर्थी वापरला जातो. येथे वस्तूच्या रुपांतराने अर्थपरिवर्तन घडून आले. याला ऐतिहासिक परिस्थिती कारणीभूत आहे.

**क) सामाजिक परिस्थिती :** भोवतालच्या सामाजिक परिस्थितीनुसार शब्दांचे अर्थ बदलतात. इंग्रजी भाषेमध्ये कुटुंबामध्ये 'मदर', 'फादर', 'ब्रदर', 'सिस्टर' या शब्दांचे जे अर्थ आहेत ते रुग्णालयामध्ये वेगळे असतात. सामाजिक स्तरभेदामुळे त्या शब्दाच्या मूळच्या अर्थामध्ये बदल घडून आला आहे.

**ड) भौगोलिक परिस्थिती :** 'कॉर्न' या शब्दाचा अर्थ इंग्रजीत 'गहू', स्कॅच लोकांसाठी 'बाजरी', तर अमेरिकेमध्ये 'मका', असा होतो. 'ठाकूर' या शब्दाचा उत्तर प्रदेशात 'क्षत्रियवाचक', बिहारमध्ये 'नभिकवाचक' तर बंगालमध्ये 'स्वयंपाकी' असा उल्लेख होतो.

**इ) भौतिक परिस्थिती :** जसाजसा भौतिक साधनांमध्ये बदल होतो. त्याप्रमाणे वस्तूंची नावेही बदलतात. 'ग्लास' म्हणजे पाणी पिण्याचे भांडे मग ते प्लास्टिक, स्टेनलेस स्टील, पितळ या कशाचेही भांडे असो.

**३) विनम्रता प्रदर्शन :**

नम्रता हा सामाजिक शिष्टाचाराचा अविभाज्य भाग आहे. उर्दूमध्ये स्वतःच्या घराला 'गरीबखाना' म्हणतात. दुसऱ्याच्या घराला 'दौलतखाना' म्हणतात. आज आपण माझ्या झोपडीस पवित्र केलेत. या ठिकाणी 'येणे' या अर्थी 'पवित्र करणे' हा शब्दप्रयोग केला आहे. आमच्या आयुष्यातील काही आठवणी या पुस्तकामध्ये न्या. रानडे यांचा उल्लेख रमाबाई रानडे यांना 'स्वतः' या सर्वनामाने सर्वत्र केला आहे.

**४) भाषाबंदी :**

अनेक अप्रिय गोष्टी वक्त्यांची इच्छा नसताना बोलाव्या लागतात.

उदा. 'मृत्यू' या भीषण वास्तवासाठी देवाज्ञा होणे, स्वर्गवास होणे, पैगंबरवासी होणे, कैलासवासी होणे, बोलावणे येणे यासारखे नवनवीन वाक्प्रचार वापरले जातात. तसेच एखाद्या स्त्रीला आलेल्या वैधव्याचे वर्णन ती विधवा झाली असे न करता कपाळ पांढरे होणे, कुंकु पुसणे, बांगडी फुटणे अशा वाक्प्रचारातून केले जाते.

munotes.in

**५) व्यंगात्मकता :**

उपरोधपूर्ण बोलण्यातून असे अर्थपरिवर्तन दिसून येते.

उदा. बदफैली स्त्रीला उद्देशून 'बाहेरख्याली', 'गावभवानी', 'उष्टी पत्रावळ', 'जन्म सावित्री' अखंड सौभाग्यवती हे शब्द वापरले जातात.

**६) भावावेश :**

भाषेच्या आवेशामध्ये कधी कधी माणसे विचित्र वेगळे वाटणारे शब्दप्रयोग करतात.

उदा. आपल्या मुलाला लाडाने सैतान, बाजी, गधड्या, गाढवा असे म्हटले जाते. हर-हर, राम-राम, शिव-शिव अशा पवित्र शब्दांचा उपयोग घृणा, राग, उद्वेग इ. गोष्टीसाठी केला जातो.

**७) साहचर्य :**

वस्तू, विचार, कल्पना यांचे साहचर्य फार मोठ्या प्रमाणांत शब्दार्थामध्ये दिसून येते. हे साहचर्य तीन प्रकारचे आढळते.

**अ) कल्पनाजन्य साहचर्य :**

काही परस्परभिन्न गोष्टीतही कल्पनांचे साहचर्य असू शकते.

उदा. 'काय बाजार भरला आहे!' असे आपण म्हणतो तेव्हा प्रत्यक्ष बाजार भरलेला नसूनही बाजाराशी संबंध असणारी धांदल व गडबड-गर्दी आपल्या मनात कल्पनेच्या साहचर्यात येते. हे कल्पनेचे साहचर्य होय.

**ब) निकटत्वजन्य साहचर्य :**

दोन वेगवेगळ्या गोष्टी जेव्हा एकमेकांच्या निकट सान्निध्यात येतात. तेव्हा त्यांची मूळ नावे जरी भिन्न असली तरी त्यातून नवीन नामाभिधान मिळू शकते.

उदा. मोत्याचा हार वा रत्नाचा हार गळ्यात घालतात म्हणून त्याला 'कंठीहार /कंठहार' हा शब्दप्रयोग वापरला जातो. याशिवाय 'ताट वाढणे' म्हणजे 'अन्न वाढणे', 'ग्लास घ्या' म्हणजे 'पेय घ्या' असा अर्थ आहे. ही सर्व निकटत्वजन्य साहचर्याची उदाहरणे म्हणता येतील.

**क) सादृश्यजन्य साहचर्य :**

दोन भिन्न गोष्टींमध्ये कोणते ना कोणते साम्य जाणल्यावर त्या दोन गोष्टीसंबंधीचे एक उत्कट साहचर्य मनात सहजपणे जागे होते. त्याचे परिवर्तन वस्तूंचे विशिष्ट नामकरण करण्यात वा अर्थपरिवर्तन होण्यामध्ये होते.

उदा. अनारदाणा (डाळिंबाचे दाणे) 'गोमुखी' (देवळातील पाण्याच्या वाहणीस तिच्या आकारावरून पडलेले नाव). 'आंबेमोहर तांदूळ' (आंब्याच्या मोहराप्रमाणे बारीक व सुवासिक म्हणून तांदळाच्या एका जातीला 'आंबेमोहर तांदूळ' हे सार्थ नाव पडले आहे.)

munotes.in

**ड) साम्यतत्त्व (Analogy) :**

साहचर्याप्रमाणेच साम्यामुळेही शब्दार्थामध्ये परिवर्तन होते. अर्थविस्तार व अर्थसंकोच हे दोन महत्त्वाचे परिवर्तन बऱ्याच अंशी साम्यतत्त्व व रूपक यांमधून निर्माण होताना या दोन्ही घटकांचा उल्लेख ग्रे या भाषाविज्ञानकाने जोडीने केलेला आहे. या दोहोंच्या मुळाशी एकच साम्यतत्त्व आहे.

उदा. रामराज्य (सुख शांतीपूर्ण राज्य ते रामराज्य) घिसाडघाई (लोखंडकाम करणाऱ्या घिसाड्यास लोखंड तापलेले आहे तोवर घाव घालावे लागतात. पैठणी (स्त्रियांचे वस्त्र पैठणी) हे पैठणे या स्थलनामाशी निगडित आहे.) इ.

**८) शब्दांतील संदिग्धता :**

भाषेत समान अर्थाचे अनेक शब्द दिसतात. त्यांचा निश्चित अर्थ सांगणे थोडे कठीण होते. 'प्रगती', 'उन्नती', 'विकास', 'अभ्युदय' इत्यादी. हे या सर्व शब्दांमध्ये अर्थसाम्य दिसते. त्यामुळे नेमका अर्थ सांगण्यास इथे संदिग्धता निर्माण होते.

**९) व्यक्तिव्यक्तीनुसार शब्दांच्या अर्थप्रतीतीमध्ये भेदक :**

माणसाच्या व्यक्तिमत्त्वानुसार, त्याच्या योग्यतेनुसार अर्थात परिवर्तन होते याचे कारण प्रत्येक व्यक्तीच्या मनातील संदर्भ वेगळा असतो.

उदा. चोर ज्याला 'ईश्वरकृपा' म्हणेल, त्याला सत्पुरूष ईश्वरकृपा म्हणणार नाही. यामुळे 'पाप-पुण्य', 'धर्म-अधर्म', 'न्याय-अन्याय' या शब्दांच्या अर्थप्रतीतीमध्ये व्यक्तिव्यक्तीनुसार भेद होणे संभवनीय असते.

**१०) पसंती - नापसंती :**

अर्थपरिवर्तनाकडे ब्लूमफिल्ड याने निरनिराळ्या दृष्टिकोनातून पाहिले आहे. Meat या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'खाद्यपदार्थ' असा होतो. 'मांस' हा अलीकडे नवा शब्द रूढ झाला. ब्लूमफिल्ड यांच्या मते, हा एका भाषिक प्रक्रियेचा परिणाम आहे. 'मांस' या अर्थी वापरल्या जाणाऱ्या Flesh या शब्दांऐवजी त्याजागी Meat हा शब्द योजिण्यात इंग्रजी भाषेच्या निजभाषकांनी अधिक पसंती दाखवली. यावरून ब्लूमफिल्डने असा निष्कर्ष काढला की, काही शब्दांतील अर्थपरिवर्तन हे पसंती - नापसंतीचे द्योतक असते.

**११) सर्वसाधारणसाठी विशेषाचा वापर :**

असे बरेच शब्द आहेत जे प्रथम एखाद्या विशिष्ट पदार्थाच्या अर्थाने वापरले जातात. परंतु नंतर ते सामान्य पदार्थासाठी देखील वापरले जातात. उदा. भाजी, शाई इ. भाजी म्हणजे हिरवीगार म्हणून भाज्या म्हणजे हिरव्या भाज्या असायच्या पण आता भाज्या बटाटे, कांदे इत्यादीसाठीही वापरले जातात. त्याच प्रकारे शाईचा अर्थ काळा आहे. पूर्वी काळ्या शाईसाठी शाई वापरली जात होती, परंतु आता कोणत्याही रंगाचा शाईसाठी शाई शब्द वापरला जात आहे.

munotes.in

**१२) इतर भाषांचे अपूर्ण ज्ञान :**

इतर भाषांचे अपूर्ण ज्ञानदेखील अर्थ बदलतो. उर्दूमध्ये प्रकटीकरणाचा अर्थ थोडक्यात सांगायचा असतो. परंतु हिंदीमध्ये याचा तपशीलवार किंवा स्पष्टीकरण देण्यासाठी वापर केला जात आहे.

वर नमूद केलेल्या कारणांबरोबरच इतरही अनेक कारणे आहेत ज्यांचा अर्थ बदलला आहे. अभिरूचीमुळे अर्थ देखील बदलला आहे. कारण माणूस कधीकधी लाज, द्वेष किंवा अजाणतेपणाच्या भीतीने काही शब्द वापरण्यास संकोच करतो. कधीकधी काव्यात्मक बेतुकीपणा आणि नाविन्यपूर्ण वाक्यांमुळे अर्थ बदलतात. भावुकता या भावात्मक बल शक्तीमुळे अर्थ बदल देखील शक्य आहे. उदा. दृष्ट, सैतान, गाढव चा उपयोग, प्रेम आणि राग दोन्हीमध्ये वापरला जातो.

## ४.४ अर्थपरिवर्तनाचे प्रकार / वर्गीकरण :

अर्थपरिवर्तनाचे वर्गीकरण करताना परिवर्तन पूर्व अर्थ आणि परिवर्तनोत्तर अर्थ यांच्यातील परस्पर संबंध लक्षात घेतला जातो. यानुसार जुने वर्गीकरण आणि नवे वर्गीकरण असे दोन प्रकार आढळून येतात.

**अ) जुने वर्गीकरण :**

जुन्या अर्थपरिवर्तनाचे प्रकार पुढील प्रमाणे मानण्यात आले आहेत.

**१) अर्थसंकोच :**

कोणत्याही प्रगत भाषेतील काही शब्दांची अर्थदृष्ट्या तपासणी केल्यास त्यातील काही शब्द कालांतराने अर्थदृष्ट्या संकुचित झालेले दिसतात. शब्दार्थांचा कल व्यापकतेपेक्षा संकोचाकडेच अधिक झुकतो.

उदा.

| शब्द | जुना अर्थ | नवा अर्थ |
|---|---|---|
| वेणा | वेदना | प्रसूति वेदना |
| मृग | प्राणी | हरीण |
| Meat | Food | Edible flesh |
| Bound | dog | Hunting dog |

**२) अर्थविस्तार :**

नव्या अर्थाची व्याप्ती जुन्या अर्थापेक्षा अधिक असते. शब्द तोच असूनही अर्थ विकसित झालेला असतो.

शब्दांचा कालांतराने विस्तार झालेला पाहावयास मिळतो त्यास अर्थविस्तार म्हणतात.
उदा.

| शब्द | जुना अर्थ | नवा अर्थ |
|---|---|---|
| कुशल /प्रवीण | वीणावादनात प्रवीण | कोणत्याही कलेत निपुण असणारी व्यक्ती |
| यवन | ग्रीक | परकीय |
| अधर | खालचा ओठ | दोन्ही ओठ |

**३) सौम्यार्थत्व :-**

यात शब्दाच्या मूळच्या अर्थापेक्षा नव्या अर्थाचे स्वरूप सौम्य बनलेले असते.

उदा. 'आकांडतांडव' म्हणजे अकाली केलेले विशिष्ट नृत्य, असा मूळ अर्थ आहे. तो सौम्य होऊन हट्टी, दुराग्रही, आरडा-ओरडा असा अर्थ रूढ झाला.

**४) रूपकजन्य परिवर्तन :-**

पराचा कावळा करणे - अतिशयोक्तीने बोलणे.
सिंहावलोकन करणे - गतकालाचा आढावा घेणे.
बाळकडू मिळणे - लहानपणापासून शिकवण मिळणे.

**५) संनिहितार्थ प्राप्ती :-**

यामध्ये स्थलकालदृष्ट्या संनिहित अशा अर्थाची प्राप्ती होते. व अर्थपरिवर्तन घडून येते. Cheek या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'गाल' असा आज आहे.

प्राचीन इंग्रजीमध्ये ceace म्हणजे Jaw (जबडा) असा अर्थ होतो. याउलट Jaw (Old French - joue) जबडा) म्हणजे 'गाल' असा अर्थ होता म्हणजे -

Old English cease 'jaw' > cheek
Old French Joue 'cheek' > jaw.

अशा प्रकारे संनिहितार्थ प्राप्तीने उभय शब्दांच्या अर्थाची उलटापालट होते.

**६) अवयव - अवयवी संबंध :**

शब्दांचे दोन अर्थ अवयव - अवयवी संबंधाने जोडलेले असतात. उदा. 'दरडोई' म्हणजे दरमाणशी.

**७) तीव्रार्थत्व :**

मुळातील अर्थापेक्षा नवा अर्थ अधिक तीव्र होतो. उदा. मिजास (अरबी) म्हणजे प्रकृती तब्येत पण मराठीत तो अवाजवी, ऐट, शिष्टपणा असा झाला. त्याचप्रमाणे अस्सल (अरबी, 'अस्ल') म्हणजे मूळ एवढाच अर्थ, पण पुढे मराठीत तो जातिवंत, उत्कृष्ट, खरा अशा अर्थाने रूढ झाला.

**८) अर्थापकर्ष :**

मुळातील अर्थापेक्षा त्याला अधिक गौणत्व येते. उदाहरणार्थ 'अवतार' हा शब्द देवादिकांच्या अवताराविषयी वापरला जात असे. पण आज मराठीमध्ये त्याला 'गबाळ' 'बावळट'

असा अर्थ प्राप्त झाला. संस्कृत 'श्यालक' या शब्दाचा अर्थ 'मेहुणा' असा आहे. पण त्यापासून मराठीत 'साला' ही शिवी आलेली आहे. संस्कृत 'किन्नर' - देवांचा गायक यापासून मराठीत 'किनरा' म्हणजे खुला नसलेला. चोरटा आवाज काढणारा असा अर्थ प्रचलित झाला आहे.

**९) अर्थोत्कर्ष :**

मूळ अर्थाला अधिक प्रशस्तीची जोड मिळते. फार्सी 'असामी' या शब्दाचा अर्थ 'माणूस' असा आहे. तरी मराठीत तो 'बडा माणूस' या अर्थी योजिला जातो. 'चीज' या शब्दाचा मूळ अर्थ वस्तू एवढाच होता. तथापि मराठीत चीज म्हणजे उत्कृष्ट व वैशिष्ट्यपूर्ण वस्तू.

**आ)नवे वर्गीकरण :**

अर्थाचे जुने वर्गीकरण परिपूर्ण न वाटल्यामुळे त्याच्यात अर्थामुळे होणारी बदलाची दिशा जरी समजली तरी अर्थपरिवर्तन प्रक्रिया व्यवच्छेदकपणे समजण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होत नाही म्हणून आधुनिक भाषा - वैज्ञानिकांनी फेरविचार करुन अर्थपरिवर्तनाचे नवे वर्गीकरण उजेडात आणले. या नवीन वर्गीकरणात शब्दाचा अर्थ म्हणजे तो शब्द ज्या ज्या संदर्भात वापरला जाऊ शकतो त्या सर्व संदर्भाचा एकत्रित समूह होय. त्यामुळेच परिवर्तनाची नवीन व्याख्या "शब्दात भाषिक संदर्भात होणारे बदल" अशी करण्यात आली हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे.

उदा. कर या शब्दाचा विचार करु. 'कर' या शब्दाचे हात, किरण, शासनाला द्यावयाचा पैसा, एखादी कृती करण्याचा आदेश देणे असे संदर्भाप्रमाणे अनेक अर्थ आहेत.

**१) अर्थसंकोच :**

एखादा शब्द पूर्वीपेक्षा कमी संदर्भात उपयोजिला जाऊ लागला की अर्थसंकोच ही प्रक्रिया घडून येते. काही वेळा सततच्या साहचर्यामुळे शब्दाबरोबर येणारे नाम किंवा विशेषण शब्दाचा अर्थ मर्यादित करते. नंतर या नामाचा वा विशेषणांचा लोप झाला तरी शब्द मर्यादित अर्थानेच उपयोगात शिल्लक राहातात. तीर्थयात्रा - यात्रा, देवमंदिर - मंदिर, कुंकुमपत्रिका - पत्रिका, श्राद्धविधी - विधी इ.

ब्लूमफील्डच्या मते एखादा शब्द जर त्याचा संदर्भापैकी काही विशिष्ट संदर्भात पुन्हापुन्हा वापरण्यात आला तर ऐकणारा त्या अर्थालाच त्या शब्दाचा पूर्ण अर्थ मानतो व परिणामी अर्थसंकोच घडून येतो.

**२) अर्थविस्तार :**

शब्दाचा उपयोग पूर्वीपेक्षा अधिक संदर्भात केला जाऊ लागला की अर्थविस्तार घडून येतो. उदा. 'कुशल' व 'प्रवीण' या शब्दाचे कुश जातीचे दर्भ वेचून काढणारा व उत्तम प्रकारे वीणा वाजविणारा हे मूळ अर्थ आहेत. पण आता कोणत्याही कामात तरबेज, चतुर असलेला, असा व्यापक अर्थ त्यांना प्राप्त झालेला आहे. पूर्ण संस्कृत 'तेल' शब्दाचा मूळ अर्थ तिळापासून काढलेले तेल असा होता. आता शेंगदाणा, मोहरी, करडई यांचेही तेल असा व्यापक संदर्भ त्या शब्दाला प्राप्त झाला आहे.

munotes.in

गोपठ म्हणजे गाई ठेवण्याची जागा. पण आता बैल, म्हैस ठेवण्याच्या जागेला गोठा म्हणतात. साम्यमुलक अर्थविस्ताराप्रमाणे साहचर्यमुलक अर्थविस्तारही घडून येतो. उदा. 'वेणीफणी', 'भाकरीभाजी', 'चहापाणी' म्हणजे फक्त उच्चारलेला वस्तू नसून त्याहून थोडेफार अधिक असा अर्थ घेतला जातो.

**३) अर्थान्तर :**

एखादा शब्द जेव्हा आपल्या जुन्या भाषिक संदर्भाचा त्याग करुन संपूर्णपणे नव्या भाषिक संदर्भानी वापरला जाऊ लागतो तेव्हा अर्थान्तराची प्रक्रिया घडून येते. ऋग्वेदामध्ये सुरुवातीच्या ऋचात 'असूर' हा देवतावाचक शब्द आहे. परंतु पुढे त्याचा अर्थ 'राक्षस' असा झाला. ब्लूमफिल्डच्या मते ही प्रक्रिया दोन टप्प्यांनी घडते. प्रथम अर्थ विस्तार होऊन एखादा शब्द जुन्या व नव्या अशा उभय संदर्भात वापरला जाऊ लागतो. कालांतराने अर्थ संकोचाच्या प्रक्रियेत जुने संदर्भ पूर्ण वगळले जातात व तो शब्द केवळ नव्या संदर्भातच वापरला जाऊ लागतो. उदा. सुतक हा शब्द पूर्वी नवीन बालकाच्या जन्मामुळे अशाच अर्थाने वापरला जात असे. नंतर अर्थविस्ताराने तो कुटुंबियांचे जन्म आणि मृत्यू त्या दोहोंमुळे येणारे या अर्थाने वापरला जाऊ लागला. कालांतराने अर्थसंकोच होऊन तो केवळ मृत्युमुळे येणाऱ्या अशुभासाठी उपयोजला जाऊ लागला. जन्मामुळे येणाऱ्या अशुभासाठी वृद्धी किंवा सुयेर हे शब्द प्रचलित झाले.

**४) वस्तूरूपांतर :**

प्रत्यक्ष शब्दाच्या आकारात व स्वरूपात बदल न घडता ही शब्दांमुळे व्यक्त होणाऱ्या वस्तूंच्या स्वरूपाबद्दल घडून येतो. तिला वस्तूरूपांतर प्रक्रिया असे म्हणतात. उदा. शेगडी (कोळशाची शेगडी, विजेची शेगडी) उभय वर्गीकरणांच्या तौलनिक विचार केल्यास दुसरे संदर्भाधिष्ठित वर्गीकरण अधिक शास्त्रशुद्ध वाटते.

## ४.५ भाषिक आदान - स्वरूप

**स्वरूप :** दोन भिन्न भाषा बोलणारे भाषिक कालांतराने एकमेकांच्या व्यक्तीभाषेतील काही विशेष आत्मसात करतात व हे विशेष त्याच्या व्यक्तिभाषेचे घटक बनतात या प्रक्रियेला भाषिक आदान-प्रदान असे म्हणतात.

विभिन्न भाषकांच्या चालीरिती, खाणेपिणे, आचारविचार, वापरातील वस्तू, सणसमारंभ, धार्मिक विधी स्वीकारले की त्याचबरोबर तद्वाचक शब्दही येतात. कारण या गोष्टी पूर्वी आपल्या समाजात नसल्यामुळे भाषेतही नव्हत्या, मुसलमानांचा पोशाष आपण स्वीकारल्याबरोबर 'जामानिमा' हा शब्द आला. इंग्रजीचा पोशाष स्वीकारल्यावर हॅट, बूट, कोट, शर्ट, टाय हे शब्द आले ते मराठी भाषेतलेच शब्द बनले.

शब्द प्रत्यय प्रत्ययसहित शब्द व वाक्यरचना या भाषेच्या सर्व क्षेत्रात आदान होते. शब्द हे मुक्त रुपिम असतात व प्रत्यय हे बद्ध रुपिम असतात. त्यामुळे आदान क्रियेत शब्दांचे प्रमाण हे जास्त असते तर प्रत्ययाचे प्रमाण कमी असते.

शब्दाप्रमाणे काही प्रत्ययही भाषेत आदान केले जातात. 'बे', ना, कम, ऐन, गैर, बिना इत्यादी पूर्व-प्रत्यय (Pre fires) व खोर, गिरी, दार, बाज इत्यादी बरेच प्रत्यय (suffixes) फार्सीतून मराठीत आले. त्यातील काही प्रत्यय मराठीपुरते उत्पादनक्षम ठरतात.

उदा. गैरवर्तन, गैरप्रकार, ऐन वेळी, ऐन दुपारी, किल्लेदार, जामदार, भांडखोर, दंगलबाज इ.

इंग्रजीतून अनेक शब्द मराठीमध्ये आले. उदा. न्हाणीघर ऐवजी बाथरुम, दूरदर्शन ऐवजी टि.व्ही. दूरध्वनी - टेलिफोन असे असले तरी प्रत्ययांबाबत विचार करता 'सब' (sub) सारखा पूर्व प्रत्यय व 'स' (s) सारखा उत्तर प्रत्यय एवढाच विचारात घ्यावा लागेल. 'सब' हा पूर्वप्रत्यय मराठी शब्दांना लागत नाही. सबइन्स्पेक्टर, सबजज्ज असे इंग्रजी शब्द मराठीने जसेच्या तसे आदत्त केलेले आहेत. ही स्थिती अनेक वचनी 'ड' प्रत्ययाची दिसते.

उदा. कॉलेजेस, टिचर्स, वर्कर्स इ. कारण हे प्रत्यय मराठीमध्ये उत्पादनक्षम ठरुन नामांना लागू शकत नाही. याचप्रमाणे एस.टी, एच.एम.टी, सिडको यासारखे अनेक शब्द संक्षेपलेखनातून रुढ झाले आहेत. आदान केलेला शब्द भाषेत हळूहळू रुजतो. मग भाषा तो पूर्णपणे आत्मसात करते. मग पेन्सिल, टेबल यासारख्या परकीय शब्दांना लिंग लाभते. त्यांचे सामान्यरूप होते, विभक्ती प्रत्यय लागतात व तो शब्द पूर्ण मराठी होतो. उदा. पेन्सिल (स्त्री), टेबल (नपु) कधीकधी आदान केलेल्या शब्दांना प्रतिशब्द म्हणून मराठीत भाषांतरित शब्द नव्याने तयार होतात. उदा. रनाऊट - धावचीत क्रिकेट - चेंडू फळीचा डाव. सर्व भाषांची आदान प्रक्रिया सारखी नसते. आदत्त शब्द कोणत्या प्रकारे घ्यायचा याविषयी प्रत्येक भाषा स्वतंत्र असते.

## ४.६ आदानाचे कारण

आदान प्रक्रियेचे स्वरूप पाहिल्यानंतर भाषिक आदानाची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) अनुकरण प्रवृत्ती
२) अभिव्यक्तीची गरज
३) प्रतिष्ठितपणाचे लक्षण

अनुकरणाची वृत्ती ही माणसामध्ये उपजत असते त्यामुळे ते आपल्याला आवडते, त्याचे चटकन अनुकरण केले जाते. हे अनुकरण शब्द, वाक्य याबाबतही दिसते. उदा. 'Oh God', 'Happy Diwali', 'Thank you', 'Excuse me' यासारखे शब्द मराठी माणूस सहजतेने वापरतो.

स्वतःच्या अभिव्यक्तीची गरज भागविणे हे आदान प्रक्रियेचे महत्त्वाचे कारण आहे. दुसऱ्या भाषेतील आचारविचार, वस्तू, अन्नपदार्थ अधिक चपखल वाटत असतील तर त्याच शब्दाचा स्वीकार माणूस पटकन करतो. उदा. सायकल, पेन, शर्ट, ब्लाऊज, आईस्क्रिम, बिस्किट, बिर्याणी इ. असंख्य शब्द अभिव्यक्तीची गरज भागविण्यासाठी स्वीकारले जातात.

प्रतिष्ठितपणाचे लक्षण म्हणूनही भाषेमध्ये आदान प्रक्रिया घडताना दिसते. सर्वसाधारण मराठी कुटुंबातील मुलेही आई-वडिलांचा उल्लेख, 'मम्मी-डॅडी', सहल-पिकनिक, शिक्षक म्हणून टिचर असा उल्लेख केवळ प्रतिष्ठा संपादन करणे या हेतूने करीत असतात.

## ४.७ आदानाचे प्रकार

ब्लूमफील्डने दोन भाषिक समाजातील संबंधाचे स्वरूप व आदानाची सर्वसाधारण दिशा यावर आधारलेले असे आदानाचे पुढील प्रकार मानले आहेत.

### १) सांस्कृतिक आदान (Cultural Borrowng) :

प्रत्येक भाषिक समाज आपल्या शेजाऱ्यांकडून काही ना काही शिकत असतो. हा संपर्क दोन बोली बोलणाऱ्यांचा असतो किंवा शेजारभाषांचा मराठी, गुजराथी, भिन्न वंशीय मराठी कन्नड यांचा येऊ शकतो. दोन भिन्न संस्कृती एकमेकांच्या संपर्कात आल्या की आदान प्रक्रिया सुरू होते. जहाज व्यवसायातील अनेक इंग्रजी शब्दांचे आदान डचमधून झाले आहे. उदा. Freight, leak, pump, yacht इत्यादी opera, piano हे संगीतविषयक शब्द इटालियनमधून इंग्रजीमध्ये आले. मराठीत पचडी, कडबू हे कानडी पदार्थ व शब्द रुळले आहेत. तर 'मसाला डोसा', 'इडली सांबार' खमण ढोकळा हे शब्द भारतातील इतर प्रांतांकडून स्वीकारले गेले आहेत. असे आदानप्रदान दोन्ही प्रांतांमध्ये होत असते.

### २) संनिहित आदान (Intimate Borrowing) :

भौगोलिक किंवा राजकीय दृष्ट्या एकच गणल्या गेलेल्या समाजात ज्या वेळी एकापेक्षा अधिक भाषा बोलल्या जातात व आदान प्रक्रिया होते त्याला ब्लूमफिल्डने 'संनहित आदान' हे नाव दिले आहे. इस्लामी राजसत्ता महाराष्ट्रभर स्थिर झाल्यावर मराठीने जेत्यांच्या फार्सी भाषेतून अनेक शब्द स्वीकारले. अरबी, तुर्की भाषांमधून फार्सीने आदान केलेले शब्दही मराठीत आले. उदा.

युद्धविषयक - चिलखत, लगाम, खंजीर, तोफ, निशाण, बंदूक इ.
वास्तु / बांधकाम - जमीन, गिलावा, इमारत, गच्ची, दरवाजा
वस्त्रविषयक - सदरा, कुडता, पायजमा, झगा इ.
संगीतविषयक - तबला, नगारा, कवाली, मैफल, गजल, जलवा इ.
लेखनविषयक - दौत, शाई, कागद इ.
खाद्यपदार्थ - बिर्याणी, खिमा, फालुदा याप्रमाणे इंग्रजीतील अनेक शब्द मराठीमध्ये आले.

काही वेळा अन्य भाषिक लोक एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर करतात त्यावेळी संनिहित आदान घडून येते. उदा. अमेरिकेमध्ये जर्मन, इटालियन, हंगेरियन, स्पॅनिश इ. भाषा बोलणारे लोक स्थायिक झाले तेव्हा अशीच स्थिती निर्माण झाली.

### ३) बोलीमधील आदान :

ज्याच्याकडे सत्ता, प्रतिष्ठा आहे त्यांच्या वागण्या बोलण्याचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती समाजामध्ये अधिक दिसते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, व्यावहारिक केंद्रे ही भाषिक आदानाची मुख्य केंद्रे बनतात. शहरातून आलेला नवा शब्दप्रयोग खेड्यातील लोक हौसेने

करतात. आधुनिक इंग्रजी-लंडन नमुन्याची, आधुनिक फ्रेंच-पॅरिस नमुन्याची तर आधुनिक मराठी-पुणेरी वळणाची बोली याच कारणामुळे झालेली आहे.

**हॉकेटने केलेले आदान प्रक्रियेचे वर्गीकरण :**

**१) शब्दादान (Loan Word) :**

एखाद्या संस्कृतीचा विभिन्न संस्कृतीशी संबंध आल्यास त्या संस्कृतीमधून वस्तूचा वा चालीरीतीचा स्वीकार लोक करतात. तसेच स्वभाषेत सदर वस्तूचे वा चालीरीतीचे वाचक शब्द किंवा नाव उपलब्ध नसल्याने त्यांना असे शब्द वा नावे ही स्वीकारावी लागतात तेव्हा शब्दादान घडून येते. उदा. मराठीत इंग्रजीमधून रॉकेट, रेडिओ, कॅसेट, क्रिकेट, फ्रिज, ट्यूबलाईट इ. शब्द स्वीकारले तर पोर्तुगीज भाषेतून बटाटा, साबण, तोफ हे शब्द घेतले आहेत.

**२) रुपांतरादान (Loan Shift) :**

काही वेळा परभाषेतील शब्द स्वीकारण्यापेक्षा त्या शब्दांबरोबरच स्वभाषेतलाच शब्द त्या अर्थाने वापरला जाऊ लागतो. 'साखरपुडा' या शब्दातील साखरेचा पुडा भावी वधूच्या हातात देणे हा त्या समारंभाचा अर्थ, पण आता एंगेजमेंट हा प्रतिशब्द वापरला जाऊ लागला. इंग्रजीतील सॉनेट या काव्यप्रकारासाठी त्याच्याशी ध्वनिसाम्य दाखविणारा मराठी वळणाचा 'सुनीत' हा शब्द निर्माण झाला. इंग्रजीतील Responsible या शब्दाला प्रतिशब्द 'जबाबदार' हा मराठीत दोन अर्थांनी वापरला जातो. 'कुटुंबातील जबाबदार व्यक्ती' (कर्तव्याचा भार उचलणारा) किंवा 'सरकार लोकसभेला जबाबदार आहे' (येथे 'जबाबदार' म्हणजे इंग्रजीतील anserable या अर्थी वापरला जातो. या संदर्भात हॉकेट म्हणतात, 'If the model is a from with two different ranges of usage only one of which is matched by a form in the borrowing language. The borrower may extend his native form to the other range of usage of the model.'

**३) भाषांतरदान :**

परभाषेतील आदान केलेला शब्द दोन किंवा अधिक रुपिमांनी बनलेला जोड शब्द असेल तर त्या रुपिमांना समानार्थी अशी स्वभाषेतील रुपिम एकत्र करुन नवीन शब्द बनविला जातो. उदा. विकेटकिपर - 'यष्टिरक्षक', लिपस्टिक - 'ओष्ठसलाका', हनिमून - 'मधूचंद्र', असे शब्द बनवण्यातील फायदा असा की पूर्वी न केलेले अर्थाचे शब्दीकरण भाषा करते. त्यासाठी स्वभाषेतील रुपिमांचा वापर केल्याने या शब्दांचा चेहरामोहरा परका वाटत नाही आणि ते भाषेत सहज कळतात. पण याचा अतिरेक मात्र हास्यास्पदही ठरते. 'स्वयंप्रेरक / वाहन' हा 'ऑटोमोबाईल' साठी कितीही अर्थपूर्ण शब्द वाटला तरी 'मोटार' हा शब्द मराठीत रुळला, याचप्रमाणे सिंहाचा वाटा (लायन्स शेयर), पांढरा हत्ती (व्हाईट एलिफंट) हे वाक्प्रचारही रुळले.

**४) संमिश्रादान (Loan Blend) :**

शब्दादान व रुपांतरदान या दोन प्रकारांचे मिश्रण होऊन अशा प्रकारे शब्द बनतात, म्हणजे त्यांचा काही भाग आदान शब्द असतो. तर काही रुपांतरित, भाषांतरित असतो. उदा. खाणेबल, वाचणेबल असे शब्द मराठी भाषिक कित्येकदा सहजगत्या वापरतात. यात हा इंग्रजी प्रत्यय जसाच्या तसा घेतला आहे तर क्रियेचे रूप मात्र मराठीच कायम ठेवले आहे. मोटारगाडी टाईमशीर यातही असेच मिश्रण आहे.

**५) उच्चारणदान :**

प्रतिष्ठा प्राप्त करुन घेण्यासाठी समाजातील प्रतिष्ठित वर्गाची प्रवृत्ती असते. प्रमाणेत्तर बोलीच्या भाषिकांचा प्रमाण भाषेशी संबंध आल्यावर ते पुष्कळदा प्रमाण भाषेतील उच्चारण स्वीकारतात. उदा. 'व्हतो' ऐवजी 'होता', 'नव्ह' ऐवजी 'नव्हे', तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारी मुले इंग्रजीच्या संसर्गाने मराठीतील 'फ' या उच्चार दोन ओठ जुळवून उच्चार न करता वरचे दात व खालचा ओठ यांच्या स्पर्शातून उच्चार इंग्रजी प्रमाणे करतात. तसेच 'राम', कृष्ण, योग यांचे उच्चार 'रामा', 'कृष्णा', 'योगा' असे करतात.

**६) व्याकरणदान (Gramatical Borrowing) :**

एका भाषेकडून दुसऱ्या भाषेकडे महत्त्वाचे व्याकरणिक घटक बहुधा प्रत्यक्षपणे स्वीकारले जात नाहीत. पण अप्रत्यक्षपणे हे आदान होते. 'जमीनदार', 'दीलदार' या फार्सी शब्दातील 'दार' हा प्रत्यय मराठीत प्रत्यय म्हणून स्वीकारला. कारण 'दिल' हा 'दिलदार', 'जमीन' व जमीनदार असे मूळ शब्द व प्रत्ययासकट मूळ शब्द असे दोन्हीचे आदान मराठीने केल्यामुळे प्रत्ययांचे वेगळेपण लक्षात घेऊन तेही स्वीकारले गेले. मराठी शब्दांना फार्सी प्रत्यय लावून नवे शब्द तयार झाले. उदा. 'चवदार', 'पाणीदार', 'गी' हा प्रत्यय लागून 'पोटगी', 'देणगी', 'खानगी' हे शब्द बनले.

**पिजिन व क्रिओल भाषा :**

पिजिन प्रक्रिया - क्रिओल प्रक्रिया व यांच्या आधारे मराठीच्या निर्मितीचा विचार साऊथबर्थ यांनी केला आहे. द्रविड भाषा बोलणाऱ्या समाजातील काही गटांना महाराष्ट्रीय प्राकृत बोलणाऱ्या आर्यांशी संबंध आल्यावर महाराष्ट्री प्राकृत स्वीकारताना द्रविडांनी स्थानिक किंवा निजभाषेनुसार तिचे स्वरूप काही प्रमाणात बदलले. यातून 'पिजिन प्राकृत' तयार झाली. पुढे आर्यांच्या सांस्कृतिक प्रभावामुळे या द्रविडांनी आपल्या भाषेचा त्याग केला व पिजिन प्राकृत निजभाषा म्हणून स्वीकारली. तिचा विकास होऊन मराठी ही अशा प्रक्रियेतून तयार झालेली क्रिओलाइसड प्राकृत भाषा असावी या म्हणण्यात काही तथ्यांश असावा. कारण महाराष्ट्री प्राकृत ही भिन्न भाषकांची ग्रंथभाषा होती. दुसरे म्हणजे मराठी ही कोणत्याही एका प्राकृत या अपभ्रंशापासून निघाली असे म्हणता येत नाही. तिसरे महाराष्ट्रात भिन्न भिन्न प्राकृत बोलणारे भिन्न समाज येते. (राष्ट्रीक लोक - 'शौरसेनी' बोलत, महाराजिक - 'मागधी', 'महाराष्ट्री', 'वैराष्ट्रीक' व आभीर - अपभ्रंश बोलत) तेव्हा शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री, अपभ्रंश व उत्तरेकडील काही बोली द्रविडांच्या भाषा या सर्वांच्या मिश्रणातून मराठी बनली.

आदानाची आत्यंतिक अवस्था म्हणून पिजिन भाषा दोन भिन्न भाषिक समाज एकमेकांशी संपर्क साधू लागतात. पण संदेशन करू शकणारी सामाईक भाषा त्यांना येत नसते. त्या त्या स्वभाषेत परिवर्तन होण्याची शक्यता असते. एखादा समाज दुसऱ्या समाजाच्या भाषेतच आदान करतो. त्या भाषेवर वेगवेगळे संस्कार करतो. दुसऱ्या भाषेतून मोठ्या प्रमाणावर शब्दसंग्रह होतो. व्याकरण व्यवस्था ही स्वभाषा व परभाषा या दोहोंची असते. स्वनांचे उच्चारण स्वभाषेवरुनच बरेचसे घेतलेले असते. मात्र या नव्या पिजिन भाषेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. तिचा वापर व्यापारक्षेत्र, गुप्तसंदेशवहन अशा मर्यादित प्रमाणात होतो. संपर्क साधण्याच्या गरजेतून ही भाषा निर्माण झालेली दिसते. दुसरी भाषा चांगली बोलता येऊ लागल्यावर पिजन भाषा बोलण्याची गरज नाहीशी होते पण काही वेळा पिजिन भाषा टिकून राहते. तिचा निजभाषा म्हणून स्वीकार केला जातो. साहजिकच तिचे कार्यक्षेत्र विस्ताराते व त्या विकसित होतात. अशा

रीतीने तयार झालेल्या नव्या विकसित भाषांना 'क्रिऑल भाषा' म्हणतात. मुंबईत विविध धर्मांचे, जातीचे बहुभाषक लोक राहतात. या सर्वांची परस्परांची संपर्क भाषा हिंदी आहे पण ही 'शुद्ध' हिंदी नाही ती उत्तर प्रदेशी, महाराष्ट्रीय, दाक्षिणात्य साऱ्यांची संपर्क भाषा आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) अर्थपरिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ४.८ समारोप

अशी ही आदानप्रक्रिया तिच्यामुळे भाषेचा चेहरामोहरा बदलतो. शब्दसंग्रहात भर पडते. अर्थ प्रगटीकरणासाठी शब्दरूप मिळते. कधीकधी व्याकरणिक आदान होऊन भाषेच्या संरचनेवर परिणाम होतो. आदान केलेले शब्द भाषेत लगेच रुळत नाहीत. कालांतराने त्यांचे स्वभाषेतील व्याकरणिक स्थान ठरते. त्या शब्दांची जात ठरते. त्यांना लिंग, वचन, विभक्ती, सामान्यरूप आख्यातप्रत्यय इ. व्याकरणिक वैशिष्ट्ये लाभतात.

भाषेची अभिव्यक्तीक्षमता आदान-प्रक्रियेमुळे वाढते हे निश्चित. तसेच प्रत्येक भाषेच्या संदर्भात आदान-प्रक्रिया अपरिहार्यपणे घडते. त्यामुळे भाषा भ्रष्ट न होता एका अर्थाने समृद्ध होत जाते.

## ४.९ संदर्भ ग्रंथ सूची


१) 'भाषा आणि संस्कृती' - ना. गो. कालेलकर

२) 'वर्णनात्मक भाषाविज्ञान' - संपादक कल्याण काळे, अंजली सोमण

३) 'भाषाविज्ञान - वर्णनात्मक व ऐतिहासिक' - संपादक हे.वि. इनामदार, स.ग. मालशे, अंजली सोमण

४) 'महाराष्ट्र भाषाकोश' - प्रस्तावना खंड - यं.रा. दाते.

५) 'ध्वनिविचार' - ना. गो. कालेलकर

६) 'मराठीचा अर्थविचार' - अनुराधा पोतदार

७) 'आधुनिक भाषाविज्ञान - सिद्धांत आणि आयोजन' - मालशे मिलिंद

८) 'सामान्य भाषाविज्ञान' - सक्सेना बाबुराम (१९४३)

९) 'भाषा' - ब्लूमफील्ड, लियोर्नाड (१९६८)

Links :

1) hi.m.wikibooks.org.
2) hi.m.wikiversity.org.

## ४.१० सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी

१) भाषेतील अर्थ ही संकल्पना स्पष्ट करुन अर्थपरिवर्तनाच्या प्रकारांचे साधार विवेचन करा.
२) अर्थ परिवर्तन म्हणजे काय ते सांगून अर्थपरिवर्तनाची कारणांचे सविस्तर विवेचन करा.
३) अर्थ परिवर्तनाचे जुने वर्गीकरण उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.
४) अर्थ परिवर्तनाचे नवे वर्गीकरण उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.
५) अर्थ परिवर्तनाचे साहचर्य हे कारण विस्ताराने स्पष्ट करा.
६) आदानाची प्रक्रिया सांगून तिचे कारण स्पष्ट करा.
७) आदानाच्या प्रकारांचे साधार विवेचन करा.

### ब) टिपा लिहा.

१) अर्थ विस्तार
२) अर्थ परिवर्तन स्वरूप
३) आदान संकल्पना
४) अर्थपरिवर्तन कारण - परिस्थितीतील बदल
५) रुपांतरदान
६) सांस्कृतिक आदान

❖❖❖❖

munotes.in

# घटक-५

# मराठी भाषेची पूर्वपीठिका, आर्य भारतीय भाषांमधील परिवर्तन, अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत

**घटक रचना :**


५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ आर्यभारतीय भाषाकुल : प्राचीन अवस्था

- ५.२.१ वैदिक संस्कृत
- ५.२.२ पाणिनीय - उत्तरकालीन (अभिजात) संस्कृत

५.३ आर्यभारतीय भाषाकुल : मध्य अवस्था

- ५.३.१ प्राकृत
- ५.३.१.१ पाली प्राकृत
- ५.३.१.२ अन्य प्राकृत भाषा
- ५.३.२ अपभ्रंश भाषा

५.४ आर्यभारतीय भाषाकुल : अर्वाचीन अवस्था

५.५ होर्न्ले यांची मीमांसा

५.६ इतर अभ्यासकांचा विचार

५.७ मराठीची प्रवृत्ती

५.८ समारोप

५.९ संदर्भ ग्रंथ

५.१० पूरक वाचन

५.११ सरावासाठी प्रश्न


## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला, मराठी भाषेची पूर्वपीठिका सांगता येईल.

- संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी ही साखळी उलगडून दाखवता येईल.
- आर्य भारतीय भाषेतील परिवर्तन सांगता येईल.
- आर्यभारतीय भाषांची वैशिष्ट्चे सांगता येतील.

munotes.in

- आधुनिक आर्य भाषांच्या संदर्भात महत्त्वाचा मानला गेलेला अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ हा सिद्धांत सांगता येईल.

## ५.१ प्रस्तावना

भाषा ही मानवनिर्मित आहे. कोणतीही भाषा समाजात निर्माण होत असते. तिच्यामध्ये बदल होत असतात. आज प्रचलित असणाऱ्या भाषांना इतिहास आहे. भाषेच्या जन्माची प्रक्रिया ही प्रदीर्घ काळ चालणारी असते. एक भाषा लोप पावून दुसरी निर्माण होण्याच्या संक्रमणावस्थेत दोन्ही भाषांच्या खुणा दिसत असतात. अशा भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करणे म्हणजे तिची पूर्वपीठिका पहाणे होय. मराठीची निर्मिती गेल्या बाराशे-तेराशे वर्षापूर्वीची आहे. 'भारतीय युरोपीय या प्रमुख भाषाकुलाची एक उपशाखा 'भारतीय आर्य या नावाने भारतात स्थिरावली. या 'भारतीय-आर्य या भाषाकुलातील एक वर्तमान भाषा म्हणजे मराठी होय.' मराठी भाषेच्या जन्मापासून आजपर्यंत अनेक बदल करून ती वावरते आहे. तिच्यामध्ये भाषिक स्थित्यंतरे झाली असली तरी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व तिने टिकवून ठेवलेले दिसते. भाषाशास्त्रज्ञ मराठी भाषा इंडो-इरानियन या प्रमुख भाषाकुलामध्ये येणाऱ्या आर्य भारतीय भाषाकुलातील भाषा आहे असे मानतात. त्याचा मागोवा घेत असताना संस्कृत आणि प्राकृतचा प्रामुख्याने विचार केला जातो. आर्य भारतात आले त्यावेळी त्यांची जी भाषा होती ती भाषा या सर्व भाषांच्या उगमस्थानी असलेली मूळ भाषा होय. ती भाषा कोणती? आर्य भारतात कोणत्या मार्गाने आले? जेव्हा आले तेव्हा त्यांच्या भाषेचे स्वरूप कसे होते? याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. मात्र तरीही आर्य लोक इराणातून अफगाणिस्तान मार्गे भारतात आले हे सर्वसाधारणपणे मान्य केले जाते. आर्य भारतात येताना ते आपली भाषा आणि संस्कृती दोन्ही घेऊन आले. आर्य भारतीय भाषेच्या प्राचीन अवस्था, मध्य अवस्था आणि अर्वाचीन अवस्था अशा तीन अवस्था आहेत. प्राचीन अवस्थेत वैदिक संस्कृत आणि अभिजात किंवा पाणिनीय संस्कृत, मध्य अवस्थेत प्राकृत व अपभ्रंश तर अर्वाचीन अवस्थेत मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली इत्यादी भाषांचा अंतर्भाव होतो. मराठी भाषा ही आर्य भारतीय भाषाकुलातील भाषा आहे. संस्कृतपासून मराठीपर्यंतचा या प्रवासाचा, तिच्या कुलाचा अभ्यास करणे म्हणजे मराठीची पूर्वपीठिका पहाणे होय.

munotes.in

**आर्य भारतीय भाषाकुलाच्या तीन अवस्था :**

१) प्राचीन अवस्था -
   १) वैदिक संस्कृत इ.स. पूर्व १५०० - इ.स. पूर्व १०००
   २) अभिजात संस्कृत (पाणिनीय संस्कृत) इ.स. पूर्व १००० ते इ.स. ४-५ वे शतक

२) मध्य अवस्था -
   १) प्राकृत - इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६००
   २) अपभ्रंश - इ.स. ४०० ते इ.स. १२००

३) अर्वाचीन अवस्था -
   १) आधुनिक भारतीय भाषा
   २) इ.स. १००० पासून पुढे

## ५.२ आर्यभारतीय भाषाकुल - प्राचीन अवस्था

मराठी भाषेच्या घडणीचा विचार करताना आजपर्यंत अनेक अभ्यासक तिच्या पूर्वावस्थेवर प्रकाश टाकतात. हा विचार अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ यांच्या परिप्रेक्ष्यात होताना दिसतो. आर्य भारतीय भाषाकुळातील प्राचीन भाषा म्हणजे संस्कृत. आर्य भारतीय भाषाकुळातील प्राचीन अवस्था दोन भागात विभागली जाते. एक वैदिक संस्कृत आणि दुसरी अवस्था म्हणजे पाणिनीय - उत्तरकालीन किंवा अभिजात संस्कृत.

### ५.२.१ वैदिक संस्कृत (इ.स. पूर्व १५०० - इ.स. पूर्व १००० सुमारे) :

सर्वसाधारणपणे इ.स. पूर्व १५०० ते इ.स. पूर्व १००० हा वैदिक संस्कृतचा कालखंड मानला जातो. पूर्वीच्या उदिच्य (पंजाब) देशात वैदिक संस्कृती नांदत होती. या उदिच्यपासून पूर्वेला प्राच्य (मगध) तसेच दक्षिणेकडे विदर्भापर्यंत आर्यांच्या वैदिक संस्कृतचा प्रभाव पडण्यासाठी लागलेला हा काळ. वैदिक संस्कृतमधील ग्रंथिक भाषा म्हणजे ऋग्वेदाची भाषा. या भाषेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील रूपवैचित्र्य.

**वैदिक संस्कृतची भाषिक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -**

१. अ, इ, उ, ऋ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर आढळतात.

२. मूर्ध्वन्य उच्चार 'ट' वर्गातील वर्ण आणि 'ळ' आहेत. द्रवीडी भाषेच्या संबंधातून हे उच्चार आले असावेत.

३. अति ऱ्हस्व 'अ' चा 'इ' होतो.

४. 'ट' हा मूर्ध्वन्य नव्याने आलेला आहे.

५. 'स', 'श' आणि 'ष' हे घर्षक आढळतात.

६. मूळ आर्य भारतीय भाषेतील 'अ', 'इ' आणि 'ओ' या ऱ्हस्व स्वरांचे वैदिक संस्कृतमध्ये 'अ' या एकाच स्वरामध्ये रूपांतर होते.

७. वैदिक संस्कृतमध्ये तीन प्रकारचे 'क' नाहीत तर 'क्व'चे 'क' किंवा 'च' मध्ये भेदन होते.

८. आत्मन मधील 'आ' चा लोप होतो. उदा. 'त्मना देवेभ्यः।'

९. येथे मध्यस्वनागम मोठ्या प्रमाणात होत असे. उदा. स्वर्गो-सुवर्गो, विश्वस-विषुवम्

१०. 'ए' आणि 'ओ' या स्वरांपुढे 'अ' स्वर आला तरी संधी होत नाही. उदा. 'उप प्रयत्ना अध्यरम्। सुजाते अश्व सूनृते।'

११. विशेषणे नामाप्रमाणे येतात.

१२. वैदिक संस्कृतमध्ये तीन लिंगे, तीन वचने, आठ विभक्ती, काळ आणि अर्थ मिळून दहा आख्याने आणि परस्मैदी व आत्मनेपदी धातू अशा भाषिक रूपांनी समृद्ध आहे.

१३. भूतकाळाची तीन रूपे दिसून येतात.

१४. भविष्यकाळ दर्शविताना 'स्य' प्रत्ययी रूपे आढळतात.

१५. कालवाचक क्रियापदाची अशी नियमित रूपे आर्य भारतीय भाषेत आढळत नाहीत.

१६. वैदिक संस्कृतमध्ये प्रथमेचे एकवचन नरासः, देवासः, ब्राह्मणासः अशी होतात.

१७. षष्ठीचा 'स' सामासिक शब्दामध्ये येतो.

१८. 'प्र' आणि 'सम' इत्यादी उपसर्ग पादपूराणासाठी दोन वेळा येतात. उदा. प्रप्रायमग्नि

वैदिक संस्कृतमध्ये तुर्फरी, ताबुव इत्यादी शब्द खाल्डियन किंवा असुर या भाषेतून आलेले शब्द ऋग्वेदामध्ये सापडतात. त्याचबरोबर नेम, पिक, तामरस यांसारखे शब्द म्लेंछ भाषेमधून आले आहेत. कमीर, कितब, कुंड, नीहार यांसारखे शब्द द्रवीडी भाषेतून आलेले आहेत असे म्हटले जाते. एकूणच वैदिक संस्कृत भाषेवर परभाषेचे प्रभाव असल्याचे म्हटले जाते. वैदिक संस्कृतचा प्राचीन नमुना म्हणून ऋग्वेदाकडे पाहिले जाते. मात्र ऋग्वेदाची रचना टप्पा-टप्याने झाली असावी.

### ५.२.२ पाणिनीय - उत्तरकालीन (अभिजात) संस्कृत - इ.स. पूर्व १००० ते इ.स. ४-५ वे शतक

संस्कृतची ही पुढची अवस्था. वैदिक धर्मात समाविष्ट झालेल्या आर्येतरांच्या भाषेचा परिणाम होऊन आर्यांची वैदिक संस्कृती हळूहळू भ्रष्ट होऊ लागली. तिचे शुद्ध रूप टिकावे म्हणून उदिच्य देशातील पाणिनी यांनी इ.स. पूर्व ५ व्या शतकात 'अष्टाधायी' हा ग्रंथ लिहिला. या काळात संस्कृत भाषेला व्याकरणाच्या चौकटीत बसविलेल्या व्याकरणबद्ध भाषेला 'पाणिनीय संस्कृत' असे म्हणतात. जगातील श्रेष्ठ भाषा म्हणून संस्कृतचे वैभव या काळात वाढले. या काळात 'रामायण' आणि 'महाभारत' अशी महाकाव्ये रचली गेली. महाकवी कालिदास, कवी भवभूती यांच्या रचना ही या काळातील. तसेच शंकराचार्य, रामानुजार्य इत्यादींची तत्त्वज्ञानपर भाष्ये याच काळात लिहिली गेली. वैदिक संस्कृतची उत्तरकालीन अवस्था असल्यामुळे त्यांच्या स्वनव्यवस्थेमध्ये फारसा फरक दिसत नाही. पाणिनी, पतंजली या व्याकरणकारांनी उत्तरकालीन संस्कृतचे व्याकरण मांडून तिचे स्वरूप स्पष्ट केले. संस्कृतचे व्याकरण मांडल्यामुळे ग्रांथिक भाषा म्हणून ती मान्यता पावली मात्र तिचे बोलीभाषेचे जिवंत, प्रवाही रूप राहिले नाही.

**पाणिनीय - उत्तरकालीन (अभिजात) संस्कृतची भाषिक वैशिष्ट्ये :**

१. अभिजात संस्कृतमध्ये मूर्ध्वन्य उच्चार असलेले शब्द जास्त प्रमाणात आढळतात.

२. ऋग्वेदाच्या प्राचीन मंडलामध्ये 'र' हा स्वन आढळतो. दहाव्या मंडलापासून 'र' व 'ल' हे दोन्ही स्वन आढळतात नंतर 'ल' अधिक सापडतो.

३. आदान केलेल्या शब्दाची संख्या अधिक आहे. उदा. द्रविडी भाषाकुल.

४. नामविभक्तीमध्ये प्रत्ययाची विपुलता आहे. संस्कृतला तिच्या प्रत्ययी रूपामुळे एक प्रकारचा ठाशीवपणा निर्माण झाला आहे.

५. सामासिक शब्द करण्याची प्रवृत्ती टिकविलेली दिसते.

६. वैदिक संस्कृतप्रमाणेच अभिजात संस्कृतमध्येही रूपांची समृद्धी आढळते.

७. अभिजात संस्कृतमध्ये प्रथमेचे एकवचन नराः, देवः, ब्राह्मणाः अशी होतात.

munotes.in

## ५.३ आर्यभारतीय भाषाकुल : मध्य अवस्था

आर्य भारतीय भाषेच्या मध्यावस्थेत प्राकृत आणि अपभ्रंश यांचा अंतर्भाव केला जातो. संस्कृत व्याकरणबद्ध केल्यामुळे बोलीभाषा म्हणून जे वैभव असते त्यापासून संस्कृत दूर लोटली गेली. तिच्यामध्ये प्रवाहीपणा न राहता ती ग्रांथिक भाषा म्हणून राहिली. आपल्याकडे संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश अशी परंपरा मांडली जाते. मात्र या भाषांमध्ये सीमारेषा आखता येत नाहीत. एका मतानुसार संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांपैकी संस्कृत भाषेशी विशेषतः वैदिक संस्कृत भाषेशी अत्यंत सादृश्य असलेली भाषा म्हणजे पाली प्राकृत. या भाषेला 'बौद्धमागधी' असेही म्हटले जाते. प्राकृत भाषांचा जन्म कदाचित संस्कृतपूर्वी झाला असावा असाही एक मतप्रवाह आहे. गौतम बुद्ध, महावीर यांच्या काळात प्राकृत भाषांचा पुन्हा विकास झाला असावा. या काळात महावीर आणि गौतम बुद्धांचा उदय होऊन त्यांनी धर्म प्रसारासाठी लोकभाषा म्हणून रूढ असलेल्या प्राकृत भाषेचा स्वीकार केला. प्राकृतची व्याकरणे संस्कृत भाषेच्या प्रभावाने निर्माण झाली. प्राकृत भाषांमध्ये प्रथम प्राकृत म्हणून पाली आणि अन्य काही प्राकृत भाषांचा अंतर्भाव होतो.

### ५.३.१ प्राकृत भाषा - इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० :

गौतम बुद्धाने धर्मभाषा म्हणून पालीचा स्वीकार केला. पुढे तिला राजाश्रयही प्राप्त झाला. अनेक भाषाशास्त्रज्ञ पालीला पाणिनीय संस्कृतची भाषाभगिनी मानतात. कारण पाली ही पाणिनीय संस्कृतपेक्षा आधीची मानण्याकडे अनेकांचा कल आहे. पाली ही प्रथम प्राकृत म्हणजे सर्वात जुनी प्राकृत भाषा होय. या भाषेच्या नावाबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. वि.का.राजवाडे यांनी प्राकृत-पाकड-पाअल-पाल-पली अशी व्युत्पत्ती सांगितली आहे. तर धर्मानंद कोसंबी 'पाल' म्हणजे 'सुरक्षित राखणे' यावरुन ज्या ग्रंथात बुद्धाचे तत्त्वज्ञान सुरक्षित आहे, त्या भाषेला पाली म्हणावे असे म्हणतात. काही बौद्ध धर्मीय वाङ्मय आणि सम्राट अशोकाच्या काळातील वीसहून अधिक शिलालेख यामधून पाली भाषेची काही वैशिष्ट्ये आपणांस दिसून येतात.

#### ५.३.१.१ पाली भाषेची वैशिष्ट्ये :

पाली भाषेमध्ये,

१. 'ऋ' या संस्कृत स्वराऐवजी 'अ', 'इ', 'उ', 'री' असे स्वर येतात. उदा. मृदू - मुदु, धृत - धत

२. 'ऐ' आणि 'ओ' या संयुक्त स्वराऐवजी 'ए' आणि 'ओ' असे एकेरी स्वर येतात. उदा. कैलाश - केलाश, गौतम - गोतम, ऐरावण - एरावण.

३. संस्कृत 'अ' चा पाली भाषेत कधी 'ए' कधी 'इ' तर कधी 'उ' होतो. उदा. शय्या - सेया, ऋपु - त्रिपु

४. पालीमध्ये एकमेकांच्या सान्निध्यातील वर्णांच्या उच्चारांना परस्पर परिणाम होऊन पूर्ववर्ण द्वित किंवा परवर्ण द्वित होतो. उदा. पुत्र-पुत्त (पूर्ववर्ण द्वित) पर्ण - पण्ण, धर्म - धम्म (परवर्ण द्वित)

५. जोडाक्षरांचे सुलभीकरण करताना कधी-कधी मध्येच स्वर जोडला जाऊन स्वरभक्ती होताना दिसते. उदा. सुक्ष्म - सुखुम, दुःखम - दुक्खम, स्मरति - सुमरति

munotes.in

६. पालीमध्ये 'स', 'श', 'ष' ऐवजी फक्त 'स' हा एकच उष्मा वापरला जातो.

७. पाली भाषेमध्ये 'ळ' हा स्वन आढळतो.

८. प्रथमेचे रूप नेहमी ओकारान्त दिसते. उदा. पुत्तो

९. विभक्तीचा विचार करता चतर्थी ऐवजी षष्ठी तसेच पंचमीऐवजी तृतीया विभक्ती यांचा उपयोग केलेला दिसतो. तसेच आकारान्त नामाचा अपवाद सोडता चतुर्थी ऐवजी सर्वगामी षष्ठी वापरली.

१०. संस्कृतमधील व्यंजनान्त शब्द पाली भाषेत स्वरान्त आढळतात. उदा. श्रीमत् - श्रीमन्त, गुणवत् - गुणवन्त

११. पालीने संस्कृतमधील निरनिराळे काळ व अर्थ कायम ठेवले. या भाषेत सुलभीकरणाची वृत्ती दिसते.

१२. पालीमध्ये द्विवचन दिसत नाहीत.

### ५.३.१.२ अन्य प्राकृत भाषा - इ.स. २०० ते इ.स. ६०० :

इ.स. २०० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालखंडात संस्कृत नाटकांतून आढळणाऱ्या शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री या भाषा म्हणजे प्राकृत भाषा. यापैकी मागधी प्राच्य देशातील भाषा तर शौरसेनी उदिच्य देशातील भाषा असावी. याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद असलेले पहावयास मिळतात. एका मतानुसार, संस्कृत नाटकांत गद्यासाठी शौरसेनी तर पद्यासाठी महाराष्ट्रीचा वापर झालेला दिसतो. महाराष्ट्री ही तत्कालीन सर्वच प्राकृत भाषांना साधून जाणारी भाषा. स्टेनकौनो यांनी महाराष्ट्री ही महाराष्ट्र देशाची भाषा मानली यासाठी त्यांनी दण्डी यांच्या 'महाराष्ट्रश्रयां भाषां प्रकृष्ट प्राकतं विदुः' या वचनाचा हवाला दिला आहे. मराठीमध्ये महाराष्ट्रीचे विशेष प्रामुख्याने दिसतात. त्यामुळे मराठीच्या पूर्वपीठिकेत तिचा विचार महत्त्वाचा ठरतो. प्राकृतातील बदल हा एक प्रकारचा प्राकृतिक बदल असलेला दिसून येतो. प्राकृत भाषा पालीच्या जवळच्या असणे स्वाभाविक पण या भाषा मात्र संस्कृतपासून फार दूर गेलेल्या दिसतात. प्रथम प्राकृत म्हणून पालीचे विशेष लक्षात घेतले आहेत. त्यापेक्षा वेगळे विशेष आपण या ठिकाणी पाहणार आहोत.

**या प्राकृत भाषांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -**

१. प्राकृतमध्ये चतुर्थी ऐवजी षष्ठी विभक्तीचा वापर झाला.
२. प्राकृतात संस्कृतची गणव्यवस्था कायमची लोप पावली.
३. परस्मैपद, आत्मनेपद याचा भेद राहिला नाही.
४. आख्यात रूपांची व्यवस्था पूर्णतः पालटली.
५. संस्कृतातील कठोर व्यंजने प्राकृतात मृदू होतात.
६. संस्कृतमधील ऱ्हस्व स्वराचा दीर्घ आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर करणे ही प्रक्रिया सहसा दिसते.

### ५.३.२ अपभ्रंश भाषा :

एखादी भाषा व्याकरणबद्ध झाली की ती साचेबद्ध होत असते. संस्कृतला पाणिनीने व्याकरणबद्ध केले तर प्राकृत भाषेचे व्याकरण रचून तिला व्याकरणबद्ध करुन स्थैर्य प्राप्त करुन

देण्याचा प्रयत्न वररुची यांनी केला. व्याकरणबद्ध झालेल्या प्राकृतला स्थैर्य मिळाले. या स्थिरत्वामुळे बदलत्या जीवनाचे व्यक्तरूप देण्याचे तिचे सामर्थ्य खुंटले. साहजिकच भाषिकांच्या सुलभीकरणाच्या वृत्तीमुळे प्राकृत भाषांचे अवस्थांतर होऊ लागले. यातून इ.स. ६०० च्या सुमारास अपभ्रंश भाषा उदयास येऊ लागल्या. अभिरादी लोकांकडून बोलली जाणारी भाषा म्हणजे अपभ्रंश भाषा होय. हेमचंद्र आपल्या 'प्राकृतचंद्रिका' या ग्रंथात अपभ्रंश भाषांचे एकूण २७ प्रकार सांगतात. दण्डी यांनी आपल्या 'काव्यादर्श' या ग्रंथामध्ये अपभ्रंश ही अभीर लोकांची भाषा आहे असे म्हणतात. अपभ्रंश भाषा 'पैशाची अपभ्रंश', 'मागधी अपभ्रंश', 'अर्धमागधी अपभ्रंश', 'शौरसेनी अपभ्रंश', 'महाराष्ट्री अपभ्रंश' अशा नावाच्या आहेत. जे लोक प्राकृत भाषा बोलत होते त्या लोकांकडून त्या त्या प्रदेशात अपभ्रंश भाषा निर्माण झाल्या. या अपभ्रंश भाषांपासून अर्वाचीन भाषा तयार झाल्या.

**अपभ्रंश भाषांची वैशिष्ट्ये -**

१. अपभ्रंश भाषेत 'ऋ' या स्वराऐवजी 'अ', 'इ', 'उ', 'र' किंवा 'रि' हे पर्याय येतात.
२. 'ऐ' ऐवजी 'ए' किंवा 'अइ' तर 'औ' ऐवजी 'ओ' किंवा 'अउ' येतात.
३. 'न' चा 'ण' होतो.
४. शब्दांच्या शेवटी 'उ' येतो. स्वरांचा उच्चार सानुनासिक होतो.
५. स्त्रीलिंगी नामे आकारान्त होताना दिसतात.
६. क्रियापदाच्या रूपात अगदी सरलत्व आहे.
७. यामध्ये प्राकृतप्रमाणे तीन लिंगे, दोन वचने असून नामाचे चतुर्थी व षष्ठीचे प्रत्यय सारखे आहेत.

## ५.४ आर्यभारतीय भाषाकुल : अर्वाचीन अवस्था

हिंदुस्थानवर भिन्न भिन्न वंशाच्या, भिन्न संस्कृतीच्या वेगवेगळ्या लोकांनी स्वाऱ्या केल्या. सर्व देश परकीय संस्कृतीच्या सान्निध्यात आल्यामुळे भिन्न भिन्न भाषांचा संघर्ष होऊन आधुनिक आर्य भारतीय भाषा निर्माण झाल्या. सर्वसाधरणपणे अर्वाचीन भाषांच्या उदयाचा काळ अकराव्या शतकातील मानला जातो. प्राकृतमधून अपभ्रंश आणि अपभ्रंश भाषेतून मराठी, राजस्थानी, गुजराती, हिंदी छत्तीसगढी, अवधी, मैथिली, भोजपुरी, बंगाली अशा भाषा निर्माण झाल्या. मराठी भाषेच्या उदयासंदर्भात अनेक मत-मतांतरे आहेत.

**अर्वाचीन आर्य भारतीय भाषांची वैशिष्ट्ये :**

१. तत्सम म्हणून 'ऋ' चा उपयोग लिखित भाषेत केला जातो.

२. उष्म्यांचा विचार करता 'स', 'श', 'ष' यांच्यापैकी 'ष' चा उपयोग 'श' प्रमाणे केला जातो. उदा. कोष - कोश.

३. आधुनिक आर्य भारतीय भाषांमध्ये परकीय भाषांमधील अनेक शब्दांचा भरणा असलेला दिसून येतो.

४. प्राचीन भारतीय आर्य भाषेत स्त्रीलिंग, पुल्लिंग आणि नपुसकलिंग यांचा उपयोग केलेला दिसतो. आज मराठी आणि गुजराती भाषा वगळता इतर भाषांमध्ये फक्त स्त्रीलिंग आणि पुल्लिंग यांचा उपयोग केलेला दिसून येतो.

५. अर्वाचीन मराठीचा शब्दसंग्रह, विभक्तीप्रत्यय आणि अख्यातव्यवस्था अपभ्रंशाशी मिळतीजुळती असलेली पहावसास मिळते.

६. ऋ बद्दल अ, इ, उ, र, रि हे पर्याय स्वीकारण्याची पद्धत अपभ्रंशाप्रमाणे असलेली दिसून येते.

७. पुल्लिंगी अकारान्त नामाच्या प्रथमेची एकवचनी रूपे कधीकधी ओकारान्त करण्याची अपभ्रंशातील प्रवृत्ती मराठीने स्वीकारली.

८. धातूसाधित वापरुन क्रियापदाचे रूप साधण्याची पद्धती अपभ्रंशप्रमाणे दिसून येते.

९. अपभ्रंशात न आढळणारे भविष्यकाळाचे 'ल' हे नियतचिन्ह मराठीने स्वीकारले.

१०. अख्यातविभक्तीचा विचार करता क्रियापदाची प्रत्ययी रूपे व धातूसाधिते मराठी अपभ्रंशातून घेतली आहेत. मात्र संयुक्त क्रियापदे मराठीने स्वतंत्रपणे बनवली.

११. य श्रुती आणि व श्रुती यांचा अपभ्रंशापेक्षा अधिकतर वापर होऊ लागला.


१२. मराठी काव्यामध्ये आढळणारी अन्त्य यमक जुळविण्याची पद्धती मराठीने अपभ्रंशापासून घेतलेली दिसते.

१३. अर्वाचीन भाषेमध्ये स्वरांचे सानुनासिक उच्चारण करण्याची प्रधान प्रवृत्ती दिसून येते.

अर्वाचीन भारतीय भाषांची अशी काही ठळक वैशिष्ट्ये सांगतात येतात. अर्वाचीन भारतीय भाषांचा शब्दसंग्रह मुख्यतः संस्कृतोद्‌भव समजला जातो. मराठीमध्ये द्रवीडी, कन्नड, तेलगू, अरबी, फारसी, पोर्तुगीज, इंग्रजी अशा भाषांमधील अनेक शब्द रूढ झालेले आहेत. "मराठी भाषेच्या स्वरूपाविषयी शं.गो. तुळपुळे यांनी मराठी हा अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला असा उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश होय." असे म्हटले आहे.

munotes.in

इंडो युरोपियन भाषाकुलाची रचना आपल्याला इथे पाहता येईल.




munotes.in

## ५.५ होर्न्ले यांची मीमांसा

**अंतर - बहिर्वर्तुळ सिद्धांत :**

अर्वाचीन अवस्थेतील भाषानिर्मितीच्या बाबतीत होर्न्ले यांनी जो सिद्धांत मांडला तो सिद्धांत 'अतंर-बर्हिवर्तुळ सिद्धांत' या नावाने प्रसिद्ध आहे. आर्य भारतात येताना ते आपली भाषा

आणि संस्कृती दोन्हीही घेऊन आले. या आर्य लोकांच्या भाषेचा विचार काही भाषाभ्यासकांनी केलेला आहे. होर्न्ले यांनी मांडलेला अंतर-बर्हिवर्तुळ हा सिद्धांत खालीलप्रमाणे सांगता येईल.

**होर्न्ले यांचा अंतर-बहिर्वर्तुळ सिद्धांत :**

होर्न्ले यांनी १८८० मध्ये आपल्या 'Comparative Grammer of the Goudian Language' या ग्रंथांत भाषिक निकषांवर आधारित अतंर-बहिवर्तुळ सिद्धांत मांडलेला आहे. आपल्या सिद्धांतामध्ये ते म्हणतात, आर्य भारतात आले ते दोन टोळ्यांनी. पहिल्या टोळीने आलेले आर्य गंगेच्या पश्चिम दुवाबात वसाहत करुन राहिले. परंतु नंतर आलेल्या आर्यांनी प्रथम आलेल्या टोळीला हुसकावून लावले व ते स्वत: तिथे स्थिर झाले. पहिले आलेले आर्य लोक गंगेच्या दुवाबात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर असे सभोवती राहिले. म्हणजे नंतर आलेल्या आर्यांच्या सभोवती त्यांचे एक कडे निर्माण झाले. होर्न्ले यांच्या मते हे बहिर्वर्तुळ होय. या बहिर्वर्तुळातील भाषा या आर्यांच्या बोलीपासून म्हणजे मागधी बोलीपासून बिहारी, बंगाली, आसामी, ओरिया अशा भाषा निर्माण झाल्या. आकृतीच्या माध्यमातून आपण समजून घेऊ.




होर्न्ले यांच्या मते प्रागैतिहासिक काळात उत्तर हिंदुस्थानात दोन बोली भाषा होत्या. १) पश्चिमेकडील हिंदी २) पूर्वेकडील मागधी बोली. परंतु तत्पूर्वीच्या काळात उत्तर हिंदुस्थान मागधी बोलीने व्यापलेला असावा नंतर शौरसेनीची लाट त्यामध्ये पाचरीसारखी घुसली. शौरसेनेची लाट येताच मागधी बोलीला पूर्व आणि दक्षिणेकडे हटावे लागले. पुढे शौरसेनीपासून निर्माण झालेल्या पश्चिम हिंदी भाषेभोवती मागधीपासून उत्क्रांत झालेल्या भाषांचे वर्तुळ निर्माण झाले. याला 'पाचर सिद्धांत' किंवा 'द्विरागमन सिद्धांत' असे म्हणतात. होर्न्ले यांच्या पाचर

सिद्धांतानुसार मराठी ही बहिर्वर्तुळातील भाषा ठरते. विविध दिशांमधील भाषांच्या आधारे त्यांनी भाषांचे वर्गीकरण केले आहे.

१. पूर्व गौडीयन - पूर्व हिंदी, बंगाली, उडिया, आसामी
२. पश्चिमी गौडीयन - पश्चिमी हिंदी, गुजराती, सिंधी, पंजाबी
३. उत्तरी गौडीयन - पहाडी
४. दक्षिण गौडीयन - मराठी

## ५.६ इतर अभ्यासकांचा विचार

ग्रिअर्सन यांनी अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळातील भाषिक विभागणी मान्य केली असली तरी त्यांना द्विरागमन मान्य नाही. दोन्ही वर्तुळातील भाषांशी साम्य सांगणारा 'अंतबहिर्वर्तुळ' असा वेगळाच गट सांगून त्यामध्ये पूर्व हिंदी, पंजाबी, राजस्थानी व गुजराती या भाषांचा अंतर्भाव केला आहे.

रामप्रसाद चंदा यांनी होर्न्ले यांनी सांगितलेल्या सिद्धांताला थोडा तपशील वगळता मान्यता दिलेली असते. मराठी भाषा ही आर्यलोक आणि मराठी भाषिक प्रदेशातील मूळचे द्रविड व निषादकरोल यांच्या संकरापासून तयार झालेल्या लोकांची भाषा असे प्रतिपादन केले आहे.

सुनितकुमार चटर्जी यांनी केलेल्या विवेचनानुसार आर्य हिंदुस्थानात अनेक टोळ्यांनी आले. या आर्यांच्या बोली वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचे भाषाकुल एकच होते. अर्थात आधुनिक आर्यभारतीय वेदकालीन बोली असल्या पाहिजेत. त्यांनी वेबर यांनी मांडलेली उत्पत्ती मान्य केली आहे.

पा.दा. गुणे यांना अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ हा सिद्धांतच मान्य नाही. त्यांच्या मते, मराठीचे काही प्रमाणात अंतवर्तुळातील तर काही बहिर्वर्तुळातील भाषांशी साम्य आढळते. त्यामुळे याचे काटेकोरपणे वर्गीकरण करता येत नाही.

स्टेन कौनो यांची मीमांसा - होर्न्ले यांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्री व शौरसेनी या एकाच प्रकारच्या भाषा असून शौरसेनी गद्यासाठी व महाराष्ट्री पद्यासाठी योजलेली असे मत मांडले. स्टेन कौनो यांनी होन्ले यांच्या विवेचनाची चिकित्सा केली आहे. त्यांनी मराठीच्या जनकभाषेचा विचार करताना रूप आणि ध्वनी या दोन्ही अंगाने विचार करुन महाराष्ट्रीचे जनकत्व सप्रमाण सिद्ध केले. मराठी व महाराष्ट्री यांचे नाते स्पष्टपणे मांडले. तसेच त्यांनी महाराष्ट्री ही महाराष्ट्रातील भाषा असल्याचे सांगितले आहे. प्राकृतची वर्गवारी करताना त्यांनी १. शौरसेनी २. महाराष्ट्री, मागधी व अर्धमागधी अशी केली. महाराष्ट्री व शौरसेनी यांच्यातील साम्यापेक्षा महाराष्ट्री व अर्धमागधी यांच्यातील साम्य अधिक आहे.

munotes.in

## ५.७ मराठीची प्रवृत्ती

कोणत्याच भाषेची निर्मिती व तिची वाढ ही एकाकी नसते. तिच्यामध्ये बदल होत असतो. मराठीची प्रकृती संमिश्र स्वरूपाची आहे. तिने संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश भाषेतून अनेक बाबी घेतल्या. प्रामुख्याने अनेक शब्दांचे ऋण संस्कृतकडून स्वीकारले. भावे प्रयोगातील क्रियापदे तृतीयपुरुषी एकवचनी ठेवण्याची पद्धत मराठीने संस्कृतकडून घेतलेली दिसते. शौरसेनी मागधी, अर्धमागधी, पैशाची या भाषांमधील अनेक खुणा मराठीमध्ये दिसतात. कमळ, सरळ, काजळ यातील 'ळ' कार पालीतून आला आहे. उष्णः उन, पर्णःपान, कर्णःकान, असे 'ण'चा 'न' करण्याची प्रवृत्ती पैशाचीमधून घेतलेली दिसते. 'स' बद्दल 'श' करण्याची प्रवृत्ती मागधी भाषेतून आली आहे. उदा. केशरः केसर, तर आकारान्त पुल्लिंगी नामे न बदलणे, नामे स्वरान्त ठेवण्याची वृत्ती, नामाला लागणारे विभक्ती प्रत्यय, आकारान्त पुल्लिंगी नामाचे एकवचन उकारान्त ठेवण्याची प्रवृत्ती, अन्त्य यमक, इच्छादर्शक धातू, काही छंद यांसारख्या अनेक बाबी मराठीने महाराष्ट्री भाषेतून घेतल्या आहेत. अलिकडील मराठी भाषेचे स्वरूप पाहिले असता तिने उर्दू, फार्सी, द्रविडी, पोर्तुगीज, इंग्रजी अशा अनेक परकीय तसेच भारतीय भाषांमधून शब्द स्वीकारले आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) आर्यभारतीय भाषाकुलाची प्राचीन अवस्था स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ५.८ समारोप

मराठीची पूर्वपीठिका पाहताना सर्वसाधारणपणे संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी अशी साखळी मानली जाते. ती संस्कृतोत्पन्न भाषा मानली जाते. मराठीचा विचार करता या भाषेतील काही विशेष अंतर्वर्तुळातील भाषेशी तर काही विशेष बहिर्वर्तुळातील भाषेशी नाते सांगणारे आहेत. असे असले तरी तिने स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. विविध भाषांमधील शब्दांचा साज तिने चढविला आहे. थोडक्यात मराठी भाषेचा प्रवास हा दिवसेंदिवस विविध भाषा सामावून घेत अविरत सुरू आहे.

## ५.९ संदर्भ ग्रंथ


१) तुळपुळे, शं. गो. : 'यादवकालीन मराठी भाषा', पहिली आवृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे

२) कालेलकर, ना.गो. : 'ध्वनीविचार', दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन गृह, मुंबई

३) कुलकर्णी, कृ.पा. : 'मराठी भाषा उद्गम आणि विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे


munotes.in

४) ग्रामोपाध्ये, गं. ब. : 'भाषाविचार आणि मराठी भाषा', व्हीनस प्रकाशन
५) गोसावी, र.रा. : 'मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

## ५.१० पूरक वाचन

१) गोरे, दादा : 'आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', गोदा प्रकाशन
२) जोशी, प्र.न. : 'सुबोध भाषाशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन
३) जोगळेकर, ग.ना. 'मराठी भाषेचा इतिहास'
४) झ्रुल ब्लोक : 'मराठी भाषेचा विकास'
५) मंचरकर, र. बा. : 'भाषाशास्त्र विचार'

## ५.११ सरावासाठी प्रश्न

१) संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी भाषा अशी साखळी उलगडून दाखवा.
२) मराठी भाषेची पूर्वपीठिका थोडक्यात सांगा.
३) आर्य भारतीय भाषांमधील परिवर्तनाचा थोडक्यात आढावा घ्या.
४) अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत सांगा

❖❖❖❖

munotes.in

# घटक - ६

## मराठी भाषेचे कालिकभेद

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ यादवकालीन मराठी भाषा
 ६.२.१ यादवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री
६.३ मराठी भाषेची उत्पत्ती
 ६.३.१ यादवकालीन मराठीचे नमुने
 ६.३.२ यादवकालीन मराठीचे स्वरूप
६.४ बहामनी काळातील मराठी भाषा (इ.स. १३५०-१६००)
 ६.४.१ बहामनीकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री
 ६.४.२ बहामनीकालीन मराठीचे नमुने
 ६.४.३ बहामनीकालीन वर्णनप्रक्रिया
६.५ शिवकालीन मराठी
 ६.५.१ शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री
 ६.५.२ शिवकालीन मराठीचे नमुने
 ६.५.३ शिवकालीन भाषा विशेष
६.६ पेशवेकालीन मराठी भाषा
 ६.६.१ पेशवेकालीन मराठी भाषेचे नमुने
 ६.६.२ पेशवेकालीन भाषा विशेष
६.७ आंग्लकालीन मराठी भाषा (१८५०-१९५०)
 ६.७.१ मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात
 ६.७.२ आंग्लकालीन मराठी भाषेचे नमुने
 ६.७.३ आंग्लकालीन मराठी शब्दसंग्रह
६.८ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी भाषा (इ.स. १९५० ते २०१०)
 ६.८.१ स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी शब्दसंग्रह
६.९ जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा
 ६.९.१ माहिती आणि तंत्रज्ञान काळातील मराठी भाषा
 ६.९.२ माहिती आणि तंत्रज्ञान काळातील शब्दसंग्रह
६.१० समारोप
६.११ संदर्भ ग्रंथ
६.१२ पूरक वाचन
६.१३ सरावासाठी प्रश्न

munotes.in

## ६.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो तुम्हाला अभ्यासक्रमाला असलेली ऐतिहासिक भाषाविज्ञान ही अभ्यासपत्रिका विशेष महत्त्वाची आहे. या पत्रिकेतील शेवटचा घटक म्हणजे कालिकभेद हा होय. ह्या घटकाचे अध्ययन केल्यामुळे खालील उद्दिष्ट्यांची परिपुर्ती होते.

१) कालिकभेद हा घटक अभ्यासल्यामुळे भाषिकभेदांचे स्वरूप, कारणे याची माहिती मिळते.
२) काळ या घटकांचा भाषेवर कसा परिणाम होतो याचे आकलन होते.
३) भाषेचा अभ्यास कालखंडनिहाय केल्यामुळे भाषेचा अभ्यास करणे सोयीचे जाते याची माहिती मिळते.
४) वेगवेगळ्या काळात भाषा कशी बदलत जाते याची जाणीव होते.
५) या घटकांचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी भाषेबद्दलची अभिरुची वाढते.

## ६.१ प्रस्तावना

भाषा ही विचार विनिमयाचे प्रभावी माध्यम आहे. भाषा परिवर्तनासाठी स्थळ आणि काळ हे दोन घटक महत्त्वाचे असतात. भाषा ही स्थळ आणि काळानुसार बदलत असते. भाषेत काळानुसार कसे बदल होत गेले याचा अभ्यास करण्यासाठी भाषा अभ्यासाची सोय म्हणून राजकीय कालखंडाचा आधार घेणे अपरिहार्य असते. भाषा परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी योग्य आणि नेमक्या स्थळ, काळाच्या काटेकोर सीमारेषा ठरविणे कठीण असते. भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करताना त्या काळात लिहिले गेलेले ग्रंथ, त्या काळातील ताम्रपट, शिलालेख, पत्रव्यवहार यांचा आधार घेऊन भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करता येतो. काळानुसार भाषेत भेद कसे होत गेले किंवा काळानुसार भाषिक परिवर्तन कसे होत गेले याचा अभ्यास करणे म्हणजे कालिकभेदाचा अभ्यास करणे होय. यादवकाळ, बहामनी काळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ, स्वातंत्र्योत्तर काळ, जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा, माहिती आणि तंत्रज्ञान काळातील भाषा अशी वेगवेगळे कालखंड पाडून मराठी भाषेच्या कालिकभेदाचा अभ्यास करता येतो.

## ६.२ यादवकालीन मराठी भाषा

राजकीय सत्तेचा भाषा व्यवहारांवर परिणाम होत असतो. राजकीय सत्ता समग्र मानवी जीवनावर परिणाम करीत असते. राजकीय सत्तेच्या व्यवहाराची भाषा कोणती असते तिच भाषा समाजाला शिकावी लागते. इ.स. १२०० ते १३५० ह्या काळात यादवांची सत्ता होती. या काळातील मराठी भाषा जी होती तिला यादवकालीन भाषा म्हटले जाते. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात हा काळ सुवर्णाक्षरांचा काळ समजला जातो. याच काळात मुकुंदराजाने ‘विवेकसिंधु’ ग्रंथ लिहिला. तसेच महानुभाव संप्रदायातील सातीग्रंथ तसेच महदंबेचे धक्के, ‘ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ याच ज्ञानेश्वरांनी लिहिला. यु.म. पठाण यांनी इ.स. १२०० ते इ.स. १३५० या काळालाच मराठी भाषेचा पहिला कालखंड किंवा आदिकाल मानले आहे, असे असले तरी एक अभ्यासाची सोय म्हणून यादवकालीन भाषेचा अभ्यास करण्यासाठी यादवकालीन भाषेचा अभ्यास हा शब्द वापरणे सोयीचे होते.

### ६.२.१ यादवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :

या कालखंडातील भाषाभ्यास करण्यासाठी विपुल अशी साधन सामुग्री उपलब्ध आहे. मराठी कोरीव लेख-शिलालेख व ताम्रपट तसेच यादवकालीन साहित्य संपदा इ. चा आधार यादवकालीन भाषाभ्यासासाठी करता येतो. मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', 'ज्ञानेश्वर', 'नामदेवांचे अभंग', 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र', 'महदंबेचे धवळे', चोंभाविरचित 'उखाहरण' नरेंद्राचे 'रुक्मिणी स्वयंवर' इ. चा या संदर्भात निर्देश करावयास हवा. एका अर्थाने हे विपुल साहित्य उपलब्ध असल्यानेच या कालखंडातील मराठी भाषेचा अभ्यास करणे सोपे झाले आहे.

## ६.३ मराठी भाषेची उत्पत्ती

मराठीची उत्पत्ती संस्कृत - प्राकृत - अपभ्रंश अशा क्रमाने झाली आहे. महाराष्ट्रात रूढ असलेल्या अपभ्रंशाप्रमाणेच तिच्यामध्ये महाराष्ट्री प्राकृतचे अवशेष दिसतात, असे डॉ. शं.गो. तुळपुळे यांनी आपल्या प्रबंधात मांडले आहे. यादवकालीन मराठी भाषेचे स्वरूप विशद करण्यासाठी यादवकालीन भाषेतील ध्वनीविचार, रूप-विचार, शब्दसिद्धी, शब्दसंग्रह, वाक्यरचना व वाक्प्रचार या घटकांचा अभ्यास करावा लागेल. तरच यादवकालीन भाषा कशी होती हे समजण्यास मदत होते.

### ६.३.१ यादवकालीन मराठीचे नमुने :

१) श्री सर्वेस्वराचे शिरी धरुनियां चरण :
मग धवळी गाईन गोविंदराणा :
जेणे रुक्मिणी हरियेली तेणें पवाडे केले अति बहुतः
पाविजे परमागति भगती आइकतां कृष्णचरित्र : जय श्री प्रभु गोविंद।।
भीमकाकुळी रुक्मिणी केला अवतरुः
रूपलावण्ये तिया जिंकियेला संवसारुः
या त्रिभुवनामाझारीं रूपे सुंदरु वाखाणे मुरारी।। (धवळे)

२) ये ग ये ग विठाबाई। माझे पंढरीचे आई।।१।।
भीमा आणि चंद्रभागा। तुझ्या चरणीच्या गंगा।।२।।
इतुक्यासहित त्वां बा यावे। माझे अंगणी नाचावे।।३।।
माझा रंग तुझे गुणी। म्हणे नामयाची जनी।।४।।

### ६.३.२ यादवकालीन मराठीचे स्वरूप :

यादवकालीन भाषा तिचे स्वरूप विशेष पुढीलप्रमाणे पाहता येतात. यात वर्णप्रक्रिया, स्वर, व्यंजन, विभक्ती, सर्वनामाची रूपे, शब्दसंग्रह, वाक्यप्रचार इ. घटकांचा अभ्यास करता येतो.

### अ) स्वरप्रक्रिया :

यादवकालीन भाषेचा अभ्यास करताना यादवपूर्वकालीन भाषेतील स्वर हे यादवकालीन मराठीतही पहावयास मिळतात. दीर्घ 'ॠ' हा संस्कृत भाषेत असलेला यादवकालीन मराठी भाषेत 'ॠ' हा स्वर उच्चारास कठीण असल्याने प्राकृतात व पुढे मराठीच्या यादवकाळात त्याचे

सुलभीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. यात प्रामुख्याने ऋ>अ, ऋ>इ, ऋ>उ या तीन प्रक्रिया झाल्याचे दिसते.

उदा.

१) ऋ>अः, तृण>तणकट, मृदू >मऊ,वृषभ>वसो

२) ऋ>इः, तृतीय>तीज, दृष्टि>दिठी, ह्रदय>हिये

३) ऋ>उः, ऋजु>उजु, प्रावृष>पाऊस, भातु>भाऊ इ. अशीच काही स्वरप्रक्रियेची उदाहरणे देऊन स्वरप्रक्रिया चांगल्याप्रकारे समजून घेता येईल.

**ऱ्हस्व स्वर प्रक्रिया :**

ऱ्हस्व स्वर म्हणजे ज्या स्वरांचा उच्चार दीर्घ होत नाही असे स्वर म्हणजे ऱ्हस्व स्वर होय. ज्या स्वरांचा उच्चार आखूड होतो त्यांचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो म्हणून त्यांना ऱ्हस्व स्वर असे म्हणतात. स्वरांचा उच्चार स्वतंत्र होतो. दुसऱ्या कोणत्याही वर्णाचा आधार घेण्याची गरज नसते त्यास स्वर असे म्हणतात. उदा.

कुमर>अ

ऱ्हदया>ऋ

यरव्ही>ए

अशा काही यादवकालीन मराठीचे उदाहरणे देता येतील.

**दीर्घ स्वर प्रक्रिया :**

ज्या स्वरांचा उच्चार दीर्घ होतो त्या स्वरांना दीर्घ स्वर असे म्हणतात किंवा स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ लागतो. त्यांचा उच्चार लांबट होतो. म्हणून त्यांना दीर्घ स्वर असे म्हणतात. खालील दीर्घ स्वर यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात. उदा.

माहासुखासी>आ

आईके>ऐ

महाराष्ट्री>ई

आझुई>आ, ई

**संयुक्त स्वर :**

दोन स्वर एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना 'संयुक्त स्वर' असे म्हणतात. स्वरांपुढे स्वर आल्याने त्यांचा उच्चार करणे अवघड जाते. या स्थितीला प्रगृह्य किंवा Hiatus (बोलण्यातील खंड) असे म्हणतात. प्रगृह्य टाळण्यासाठी (अ + इ =) ऐ किंवा (अ + उ =) औ अशा संयुक्त स्वरांचा उपयोग केला जातो.

अ + इ = ऐःसं. प्रतिष्ठान > प्रा. पइठ्ठाण > म. पैठण

सं.प्रतिज्ञा > प्रा.पइज्जा > म.पैज

अ + उऔःसं. चतुष्क > प्रा.चउवक > म.चौक

सं.चतुर्थ > प्रा.चउत्थ > म.चौथ. असे संयुक्त स्वर यादवकालीन मराठी भाषेमध्ये पहावयास मिळतात.

**व्यंजन प्रक्रिया :**

व्यंजनाचा उच्चार करताना स्वरांचा आधार घ्यावा लागतो त्यास व्यंजन असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेत खालीलपैकी व्यंजन होते हे लक्षात येते.

चिलिसी,भिच्छा,मंगळवेट,गच्छति, निगाला,रिगाला,
जूझ,निदसुरे,खवणेया,संतोखेली,वीखे,भणिजे,सांघितली,संवछरे
भणती,जाळीण,सर्पीनी,वोलखे,उपावो,गुडाकेष,म्हाजन,संसारसायर,भणती,जाळीण,
सेत,सरभंग,मागीसर,षोपिला,लिषित कुलकर्णी,सरावण,वरूषा,लक्षुमी,रकुमिणी,कीर्ति,
धर्म्म,कर्म्म,वर्णियिली,आइक,इ.

**ब) नामविभक्ती प्रत्यय :**

नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेमध्ये विभक्तीचे सात प्रकार असलेले पहावयास मिळतात.

१) प्रथमा : गणेशु, अनुग्रहो, देओ, संशयो, दिओ, सूर्यो.
२) द्वितीया : इया, जीर्णोद्धारू, गोसवियाते, अभिप्राये, भावाँ, रायाँ.
३) तृतीया : ईश्वरें, राणेन, हरिदेवें, लेखरूवे, मत्स्त्यरूपे, सर्वज्ञे, सोनारे, पंडिती, इ.
४) चतुर्थी : चौकीचिया, दारवंठेया, पन्हेया, तेयासी, सागरा.
५) पंचमी : मेघाहुनि, मेघौनि, समुद्रौनि, सनकादिकांहूनि.
६) षष्ठी : विठलाची, व्यासाचा, उजलाचे, संयमाचेनि.
७) सप्तमी : देऊळी, सकुटुंबी, पाटणी, चरणी, ग्रामांतु, पायाँ.

**१) सर्वनामे :** सर्वनाम म्हणजे वाक्यात नामाच्या ऐवजी येणारा शब्द म्हणजे सर्वनाम होय. नामांचा पुनरूच्चार किंवा पुनर्वाचार टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या नामांच्या जागी येणाऱ्या विकारी शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.

**सर्वनामे :** तुआ, मी, तूं, कव्हणी, जो, जे, काई, कोणहु.
मा, मिये, तां हया.
तिया, मिया, जेणे, तेया, तिआ.
तेयाते, येया, आपुलेया, ऐसेया, तया, तयाते.
जेयाचा, तेयाचे, तेयांची, केहाचा, जेहाचा, जेहाचे, तेहाचे.

**२) आख्यात विभक्ती (क्रियापदाचे प्रत्यय)**

संस्कृतात क्रियापदाला 'आख्यात' असे म्हणतात. क्रियापदांना म्हणजेच आख्यातांना प्रत्यय लागून विविध काळ व अर्थ यांची तयार रूपे होतात. त्यांना आख्यात प्रत्यय असे म्हणतात. काळ व अर्थ क्रियापदांना होणारे विकार असल्यामुळे यांनाच आख्यातविकार असे म्हणतात. यादवकालीन मराठी भाषेतील काळप्रक्रिया पुढीलप्रमाणे पहावयास मिळते.

munotes.in

**३) १) वर्तमानकाळ :**

धांडोळित, करीत, आस, आइके, चाखे, आठवी, बोले, टाठे, घेई, निघे, बांधिती, झांकळीती, करीती.

**२) भूतकाळ :**

सूतला, सिके, झाले, केला, धारिएला, बोभाविली, सरले, निगाला, सांघीतली, रिगाला, ठेविलिआ, उतरिला.

**३) भविष्यकाळ :**

नाशैल, सांडिजैल, अभिवैल, असलै, होवैल.

**१) आज्ञार्थ :** परिसै, सुनु, करीजेसु, न्हवावा, करावे.

**२) अव्यये :** जे तेथोनि, पुढारी, तथा, जैं, यऱ्हवी, तऱ्ही, म्हणौनि, आझुई, कडौनु, आचंद्रार्क, वरी, लागौनि, वेऱ्ही, वांचौनि.

**क) विशेष शब्द :** यादवकालीन मराठीचा शब्दसंग्रह समृद्ध असून यादवकाळात मराठी भाषा ही लोकजीवनाची भाषा होती त्यामुळे शब्दसंग्रहाच्या दृष्टीने मराठी भाषा समृद्ध आणि संपन्न होती हे शब्दसंग्रहामुळे लक्षात येते.

सोनेसळा, कानवडा, जोहार, मांदुस, जिआले, असिवारु, बोहरी, मांदोडा, कुरौंडी, नव्हळी, सासीन्नली, दिठिवा, पायाचेमोगरू, बोहरी, मांदोडा, असलग, आंतौरी, मांदियाळी, राणीव, बहुवस, गातांबील, बुंथी, आरोगन, असे शब्दसंग्रह यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात.

**ड) वाक्प्रयोग :** शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला 'वाक् प्रचार' असे म्हणतात. अशी काही वाक्प्रयोग पुढीलप्रमाणे आहेत.

रथ पेलणे, बाधा पावणे, वरपडा होणे, स्वधर्मे राहाटणे, साहोनि जाणे, आटी काढणे, अंगी वाजणे, आड घालणे, आड जाणे, कान झाडणे, झाडी करणे, नखी लागणे, पाटी बैसणे, मोड धरणे अशी वाक्यप्रयोग यादवकालीन मराठीत पहावयास मिळतात.

## ६.४ बहामनी काळातील मराठी भाषा : (इ.स. १३५०-१६००)

देविगिरीच्या यादवांचे राज्य सन १३१८ साली समाप्त झाले. सन १३५० साली यादवकालीन वाङ्मयाचे सुवर्ण युग समाप्त झाले आणि महाराष्ट्रभर उत्तरेतून इस्लामी धर्मियांचे परचक्र आले. अहमदनगर, विजापूर, विदर्भ, बिदर, गोवळकोंडा या ठिकाणी इस्लामी राज्ये सुरू झाली. या राजवटीचा एकंदरीत महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम झाला. या काळातील मराठी भाषा कशी होती याचा अभ्यास करण्यासाठी या काळातील लिहिलेल्या मराठी वाङ्मयाचा आधार घेऊन या काळातील भाषेचा अभ्यास करता येतो.

munotes.in

**६.४.१ बहामनीकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :**

काही शिलालेख, ताम्रपट, गद्य व पद्य ग्रंथ, ऐतिहासिक पत्रव्यवहार, विजापूर (इ.स. १३३०) खाटेग्राम (इ.स.१३४८) नागाव इ.स. १३६७ मढगाव, वेळुस, बांदोडे येथील काही कोरीव लेख उपलब्ध असलेले पहावयास मिळतात.

'उखाहरण' कर्ता चोंभा, 'वरदनागेश' कर्ता अज्ञानसिद्ध, बहिरापिसा उर्फ बहिराजातवेद, कान्होपाठक-नामापाठक, कान्होपात्रा, दामाजीपंत, भानुदास, श्रीपादवल्लभ व नृसिंह सरस्वती, सरस्वती गंगाधर, जनार्दन स्वामी इत्यादींनी आपापल्या परीने मराठीत ग्रंथकर्तृत्व केले आहे. हिंदू व मुसलमान यांच्या आचारविचारांची व भक्तिपद्धतींची काहीशी सांगड या काळात दत्तसंप्रदायात घातली गेलेली दिसते.

चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रूक्मिणी स्वयंवर, भावार्थरामायण, अभंग व पदे, भारूडे इत्यादी विपुल वाङ्मयसंपदा एकनाथांनी निर्माण केली. शिवकल्याण, रमावल्लभदास, विष्णुदासनामा, जनी जनार्दन, रामाजनार्दन, विठा रेणुकानंद, कृष्ण याज्ञवल्की, रंगनाथ मोगरेकर, महालिंगदास, शांतलिंग, मुक्तेश्वर, 'बालबोध' कर्ते त्र्यंबकराज, शेख महंमद असे अनेक ग्रंथकर्ते या काळात झाले. 'गीतार्णव' कर्ते दासोपंत हे एक याच काळातील बडे अनेक ग्रंथकार होत.

**६.४.२ बहामनीकालीन मराठीचे नमुने :**

**१. चोंभाकृत उखाहरण :**

आला आला नारदमुनी । पाहाती बगाटे उचलौणी ।
अस्थानी तेणें देषीली आंसुवे । अवघेयांचा लोचणी ।। ते वीनोद देषत असे । केही न माये तेने संतोसे । मादीये माजी उभा ठेला । कांही न बोले ना न बैसे ।। राजी करीतु आहे ईंद्राहुनु । तो बळीया उग्रेसेनु । मुनी बैसा सीहासनी । साउमा पावो अवधारुनु ।। आता जाले आमचेया ऐसे । धरीतां धरीतां येताये हांसे । तंव अर्ध सीहासन । सोडिले रूष किसे ।। तेव्हळी म्हणत असे मुनीरावो । न बैसा मोटा असे संदेहो । बाइलां माजी बैसतां । आंगा येईल अन्यावो ।।

**२) गुरुचरित्र सरस्वती गंगाधर :-**

सिद्ध म्हणे नामधारकासी । अपूर्व झाले परियेसी ।। गुरुचरित्र विस्तारेंसी । सांगता संतोष होते ।।१।। गाणगापुरी असतां गुरु । ख्याती झाली अपंरपारू । भक्त होता एक शुदू । तयाची कथा एक पा ।।२।। श्रीगुरु नित्य संगमासी । जात असता अनुष्ठानासी । मार्गी तो शुद्र परियेसी । आपुले शेती उभा असे ।।३।। श्रीगुरुते नित्य देखोनी । धांवत येऊनि शेतांतूनि । आपण साष्टांगी नमोनी । पुनरपि जात आपुले स्थाना ।।४।। माध्यान्हकाळी मठासी येता । पुनरपि चरणी ठेवीन माथा । ऐसे कितीएक दिवस होतां । शुद्राची भक्ति वाढली ।।५।।

**३) एकनाथ :**

अर्जदास्त अर्जदार बंदगी । बंदेनबाज साहेब आलोकम् सलाम । कायापुरीकर जिवाजीपंत सुभेदार । बुधाजीपंत फडणीस । परगणे शरीरबाद ।। हकिकत ।।
सरकारची रजा घेऊन निघाले । तो स्वार होऊन किल्ले कायापूर येथे दाखल जाहले ।। दरोबस्त अंमलदार सर्व सरकारकामास वाकब नव्हते ।।

### ४) सिंहासनबत्तिशी महालिंगदास :

पुनरपि राजा मुहूर्त पाहे। सतरावीये पुतळीये संनीध जाये। तंव तीस वाचा होउनी बोळिली काये। ते परियेसा पा।। तु विक्रमासारीखा धीर्य उदार्य होसि। तरीच ये सीहासनी बैसे। भोजु म्हणे ते कैसे। सांगे मज।। रावो विक्रम उदार्य अति। त्रीलोकीं वाढली ज्याची किर्ती। बहुळोक्ती ज्या भळा म्हणति। तोचि धन्यु।।

### ६.४.३ बहामनीकालीन भाषा विशेष :

या काळातील भाषेचा विशेष म्हणजे अरबी आणि फारसी भाषेतील अनेक शब्द मराठी भाषेत पहावयास मिळतात. यादवकाळात 'ल' कार प्रामुख्याने होता. 'ळ' नव्हता असे नाही, पण बहामनी काळात 'ळ' कार सर्वत्र दिसू लागला. 'स'च्या ऐवजी 'श' अथवा 'ष', 'ख' च्या ऐवजी 'ध' व 'थ' असेही फरक या काळात झालेले दिसून येते.

### १) बहामनीकालीन वर्णप्रक्रिया :

बहामनीकालीन वर्णप्रक्रिया खालीलप्रमाणे दिसून येते. यादवकालीन मराठीतील वर्णात बहामनीकालीन मराठीत पुढीलप्रमाणे बदल झाल्याचे दिसते.

कृ. पा. कुलकर्णी यांनी या संदर्भात यादवकालीन भाषा आणि बहामनी भाषा याची जी तुलना केली ती लक्षात घेतल्यास भाषेचे स्वरूप समजण्यास मदत होते.

| **यादवकाळ** | **बहामनीकाळ** |
|---|---|
| रुतु - | ऋणिया |
| रिणीया - | ऋणिया |
| गाजति | गर्जती |
| ठावो | थावो |
| साचचि | सत्यचि |
| उपेग - | उपयोग |
| रोसें - | रोषे |
| नोहे - | नव्हें |
| बेहों - | भिवो |
| उभगला - | उबगला |
| काई - | काय |
| वोझे - | ओझे |
| निसाण - | निशान |
| सकल - | सकळ |
| पुडुती - | पुढती |

इत्यादी शब्दांची नवी रूपे या काळातील लक्षात येण्यासारखी आहेत.

### ३) प्रत्यय प्रक्रिया :

बहामनी काळातील मराठी भाषेची प्रत्यय प्रक्रिया विचार पुढीलप्रमाणे असलेली पाहाता येते. कंसातील शब्द त्या शब्दांच्या यादवकालीन रूपातले आहेत.

munotes.in

४)

| बहामनी काळ | | यादवकाळ |
|---|---|---|
| तयातें | - | (तेयांते) |
| डोळ्या | - | (डोलेयां) |
| मान | - | (मानु) |
| द्यावा | - | (देयावा) |
| देव | - | (देवो) |
| तुजसी | - | (तुसी) |
| म्हणोनि | - | (म्हणौनि) |
| जाहला | - | जाला |
| आतल | - | आतैल |
| बोलाचे | - | बोलाचिया |
| वर्षे | - | वरिखे |
| तळवटी | - | तलहाटी |
| हृदयावरी | - | हृदयवेन्ही |
| विकास | - | विकोशु |
| सगळा | - | सकल |
| पावया | - | पविया |
| अद्यापि | - | आझुइं |
| विषयी | - | विषि |
| जलिया | - | जालेया |

इत्यादी शब्दांची बहामनीकालीन रूपे नव्या वळणाची वाटतात. फार्सीबरोबर संस्कृतनिष्ठता थोडी वाढलेली दिसते.

* **नामविभक्ती** :-

**१. प्रथमा :** अधिवासु, सोल्हासु, विश्वासु, उत्सावो, मावो, निर्वाहो इत्यादी, नामांची रूपे लक्षणीय आहेत.

**२. द्वितीया :** निजभृत्या, कोण्हा, उदरा, रावळा, सेवेसी, आम्हांसी, माते, निरुपणाते, आम्हांलागुनि, यालागी;

**३. तृतीया :** विश्वासे, येणे, देवे, नारदे, नमनेशी.

**४. चतुर्थी :** वधार्थ, शापार्थ, गमनार्थ, नामासाठी

**५. पंचमी :** धर्माहूनि, द्वारकेहुनी, देवापरिस, तुजपासी

**६. षष्ठी :** लहरीचिया, सेवेचिया, संताचे, त्याचेनि, तुझेनि

**७. सप्तमी :** रणी, दशमी, कानी, माझारी, माजी.

**आख्यात रूप :**

बहामनी काळातील मराठीमध्ये पुढीलप्रमाणे आख्यात रुप पहावयास मिळतात.

करता, पहातो, करिती, उत्पादी, पाळी, करी, उपजे, प्रकटे, इत्यादी.

munotes.in

**वर्तमानकाळाची रूपे :**

ठकला, ठेला, वाढिन्निला, लाजल्या, सांगे, म्हणे, अर्पी, करी, मारी इत्यादी.

**भूतकालीन रूपे :** बहामनीकालीन शब्दांचे भूतकालीन रूपे पुढीलप्रमाणे

करीन, म्हणाल, देखाल, पडेल, नासेल इत्यादी.

**भविष्यकाळाची रूपे :**

असोतु, पाहो, करी, अवधारी, लाहो, इत्यादी.

**आज्ञार्थी रूपे :**

याजिले, बोलिजे, वर्तविजे, म्हणिजे, वंदिजे इत्यादी. या काळात फार्सी - अरबी शब्दांचा जो प्रभाव मराठीवर उमटला त्याचे वर्णन मागे आले आहेच.

**शब्दसंग्रह :**

बहामनीकालीन मराठीमध्ये खालील शब्दसंग्रह पहावयास मिळतात.

नारदमुनी, बगाटे, आंसुवे, लोचणी, वीनोद, संतोसे बळीया, आइकोनि, कपटे, तयासि, उभारुनु, बरवेया, असारू, भातेय, आषीष, परिग्रहो, कवणाचा, वेणू, गाईव्याघ्र, रविमंडळ, तृणचारा, रूणझुण, विमानीं, बाच्छाव, माहार, रसद, तगादा, कोठाडी, बापुडी, बांदोडी, अंबरा, जगत्पूर्णा, सीहासनी, पुनरपि, गाणगापुरी, अनुष्ठानासी, ममताई, वाकब, उखडे, परगणा, इ. मुसलमान राजवट असल्यामुळे सरकार दरबारी फार्सीत कागदपत्रे लिहिली गेली. त्यामुळे फिर्यादी, फैसला, इन्साफ, कागद, अधिकारी जमादार, हवालदार, शिलेदार, राईक, पाईक, राऊत बारी, दरबारी अर्ज अशी शब्द व्यवहारात या काळाने रूढ झालेली दिसून येतात.

## ६.५ शिवकालीन मराठी : (१६००-१७००)

हा काळ म्हणजे शिवरायांच्या निमित्ताने एक नवे तेज प्रकाशमान झालेला होता. शिवरायांच्या नेतृत्त्वाने जुलमी इस्लामी आक्रमणाविरूद्ध प्रतिकारशक्ती याच काळात जागी झाली. या स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या काळात समर्थ रामदास, संत तुकाराम हे दोन फार मोठे सत्पुरूष उदयास आले. भावभक्तीचा एक उत्कट संस्कार संत तुकारामाच्या अभंगवाणीने जनमानसात निर्माण केला. समर्थ रामदासांनी प्रयत्नवाद, संसार व परमार्थ यांचा त्रिवेणी संगम या काळात घालून दिला. याच काळात वामनपंडित, रघुनाथ पंडित यांनी स्वराज्य काळात अनुकूल अशा पंडिती वळणाच्या काव्यलेखनास सुरूवात केली होती.

### ६.५.१ शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामग्री :

शिवकालीन भाषाभ्यासाची साधनसामग्री म्हणून त्या काळात लिहिलेल्या साहित्याचा आधार घेता येईल. मुक्तेश्वर, शेख महंमद, फादर स्टीफन्स, रंगनाथ स्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, नागेश, विठ्ठल, वेणाबाई, अक्काबाई, बहिणाबाई, निळोबा, पिंपळनेर इत्यादी साधुकवी व कवयित्री याच काळात होऊन गेल्याने वाङ्मयरचनेचे प्रकार वाढले. फार्सी, अरबी,

शब्दांची वाढ याच काळात झाली. राजकारण वाढले तसे मराठी पत्रलेखन नव्याने वाढू लागले. पत्रलेखन आणि या काळात लिहिलेल्या साहित्याचा आधार घेऊन शिवकालीन भाषेचा अभ्यास करता येतो.

### ६.५.२ शिवकालीन मराठीचे नमुने

**१) समर्थ रामदासांचे दासबोध :**

ओ नमो जि गणनायका । सर्वसिद्धी फळदायेका । अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ।।१।।
माझिये अंतरी भरावे । सर्वकाळ वास्तव्य करावे । मज वाक् संन्याास वदवावे । कृपाकटाक्षेकरूनी ।।२।।
तुझिये कृपेचिनि बळे । वितुळती भ्रांतीची पडळे । आणि विश्वभक्षक काळे । दाश्यत्व कीजे।।३।।
येता कृपेची निज उडी । विघ्ने कांपती बापुडी । होऊन जाती देशधडी । नाममात्रे।।४।।
म्हणोन नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचे माहेर । आदि करुनी हरीहर । अमर वंदिती।।५।।

**२) वामनपंडिताचे यथार्थदीपिका :**

व्यापक नसे शरारीं । तों भोग घडे कोणेपरी । अत एव सूक्ष्मतर । भिउनी भेदवादी म्हणती व्यापक ।। की चंदनाचा बिंदु सुक्ष्मतरा परी । शैत्ये व्यापी शरीर । ऐसे बोलती परंतु चरणी पडता नीर । नव्हे ओला टिळा ललाटी, हे नकळे ।। चरण भिजती जळी । परी टिळा ओला नव्हे चंदनाचा कपाळी । पाय पोळता अग्निज्वाळी । चंदन ललाटी नव्हे उष्ण ।। तैसा छेदिता हात । जीव दुःखी नव्हे ह्रदयात । तरी हा साजेल दृष्टांत । व्यापकत्वी ।।

**३) रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र :**

संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे ? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणी आधी देशांमध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलेले परचक्रसंकट दुर्गा श्रयी परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेच जलदुर्ग बांधिले; त्यावरून आक्रम करीत सालेरी अहिवंतापासून कावेरीपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले.

### ६.५.३ शिवकालीन भाषा विशेष :

शिवकालीन स्वरप्रक्रिया खालीलप्रमाणे पहावयास मिळते.

**स्वरप्रक्रिया :**

अमच्या, अम्हांस, अश्रिवाद, विस्णदास, लाखोटा, पायमाली, प्रामाथीनाम, हरिवख्त, गाईत्रीची, विषइ, लुखोबा, देऊ, मशारनुले, उलखित, क्रुस्णा, जाग्रुती, पित्रु, धर्मादाऊ, पेडगाऊ, नाचणगाऊ, सत्येस्वर, धर्मपरायेण, छेत्रपती, वेवसाय, दुकोळ, नोबल, विस्लो, भोगोटा, वडिगो, उपद्रौ इ.

**व्यंजनप्रक्रिया :**

शिवकालीन व्यंजनप्रक्रियेची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

दुकोळ, खंदिल, लायख, झरोखा, ज्याजती, जेष्ठ, जोखालत, जजू, देव्हडी, थापना, थीरावीळया, विहमाने, धाशत, पनाळ, कार्बारी, खूब, सिताबी, येस्यास, वळखिले, नामघोश, पलंगपोष, सिवाजी, स्याहाणे, सुद, गोस्ट, अभिसेक इत्यादी.

**विभक्ती :**

शिवकालीन विभक्ती प्रत्यय कसे होते हे पुढीलप्रमाणे पहाता येतील.

१. **प्रथमा :** नेमु, झुंजारराऊ, ,संबंधु, जीऊ, राती, हकीकती, मुदती.

२. **द्वितीया :** महालासी, आपणियासी, रयतीस.

३. **तृतीया :** भटे, महाराजे, जगदळे, आत्मसुखे, हेजिबी.

४. **चतुर्थी :** द्वितीयेप्रमाणे.

५. **पंचमी :** घरीहून.

६. **षष्ठी :** गावीचा, साहेबांची.

७. **सप्तमी :** लोकी, उत्तरे, पश्चिमे, कथे.

**शिवकालीन सर्वनामे :**

तू, मी, जे, ते, मिया, तुवा, यैसी, तुज,
त्यांणी, तेही, येही, कोण्हो, तिही.

**आख्यात रूपे :**

**वर्तमानकाळ :**

गातो, नाचोतो, दोषवितो, असिजे, नेतो, होसी, बुझाविसी, आलेसी, चालिलेस, करिताती, आहेती, देताती, खाताती.

**भूतकाळ :**

जाले, मारिला, दिधले, आनिले, बैसले, खादली, म्हटिले, बोलिले, ठेविले, पुसिले

**भविष्यकाळ :**

येईना, पवाडेल, चालशील इत्यादी.

**शब्दयोगी अव्यये :**

त्यावरी, तुजपरी, माणसाकरवी, मेलियावरी, याउपरे, देखत, खालते, तेथुनु, बरहुकुम, नजदीक, कारणे, मागती.

**उभयान्वयी अव्यये :**

आणि, आण, यैसे, जे, म्हणौनु, व. तऱ्ही, जैसे, तैसे.

**उद्‌गारवाचक अव्यये :**

बेलाशक, खूप, वाहवा, छे, छी, बस, हां. अलबत इत्यादी.

munotes.in

**शिवकालीन शब्दसंग्रह :**

समर्थ रामदास, संत तुकाराम, वामन पंडित, मुक्तेश्वर सारखे कवी या काळात होऊन गेले. त्यांच्या काव्यातून शिवकालीन शब्दसंग्रह कसे होते हे लक्षात येते. विशेष करून या काळातील मराठी भाषेवर अरबी, फार्सी, तुर्की भाषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. गणनायका, वदवावे, सर्वसिद्धी, बापुडी, हरीहर, वंदिती, सर्वज्ञा, ओघु, यथाशक्ती कथिजे, ऋषिचरणां निरोपिली कल्पतरू परिमळामाजी टिळा शाश्वत छेदिता परिहार इ.

**अरबी शब्द :** अख्त्यार, अमीन, इस्ताद.

इशारत, खासा, हशम, हिंमत, सलाबत, मुशाहिरा, मजालस, तगादा, जाब, कस्त इत्यादी.

**फार्सी शब्द :** उस्तवारी, उमेद, खोगीर, आमदरफ्ती, अस्करा, हुन्नर, सर्फराजी, बेलगाम, जेर इत्यादी.

**शिवकालीन वाक्प्रयोग :**

शिवकालीन वाक्प्रयोग पुढीलप्रमाणे पहावयास मिळतात परागंदा होणे, दाखल होणे, गूम होणे, शिरजोरी होणे, दूधभात व बेलभांडार यांची क्रिया करणे, कौल लावणे, गनीमास घेरा करणे इत्यादी.

## ६.६ पेशवेकालीन मराठी भाषा

शिवकालीन कालखंडानंतर पेशवेकालीन राजसत्तेचा उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर छत्रपती संभाजीराजेंचा वध, शाहूची कैद, राजारामाची कारकीर्द, शाहूची सुटका अशा काळात कधी सत्ता स्थिर कधी अस्थिर झाली. पुढे पेशव्यांच्या हाती सत्ता आली. पेशव्यांनी जसे साम्राज्य वाढविली तसेच पेशव्यांच्या पराभवाला तेच कारणीभूत ठरले. मराठी कविता या काळात संतपरंपरेतून पंतपरंपरेकडे झुकली. त्यामुळे पांडित्य आणि शृंगार यात मराठी कविता अधिक गुंतलेली दिसून येते. या काळातील रूक्मिणीहरणकर्ता सामराज व निरंजन माधव हे दोन महत्त्वाचे कवी होते. ‘शिवदिनकेसरी’, ‘हरिवरदा’ कर्ते कृष्णदयार्णव, मध्वमुनीश्वर, अमृतराय, मोरोपंत, श्रीधर, महिपतीबुवा इत्यादी कवी याच काळात होऊन गेले. याच काळात मराठ्यांच्या व पेशव्यांच्या पराक्रमीच्या बखरी निर्माण होऊन मराठी भाषेतील गद्याची परंपरा वाढीस लागली. पेशवाईच्या उतरत्या काळात रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, सगनभाऊ, अनंतफंदी इत्यादी शाहिरांना मराठी भाषेस लावणी आणि पोवाडा हे दोन काव्यप्रकार लिहून मराठी भाषेची प्रतिष्ठा वाढवली. या इंग्रजाचा आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव मराठी भाषेवर वाढला. या काळात अनेक ऐतिहासिक पत्रे लिहिले गेली. त्यातून मराठी भाषेचे वेगळेपण जाणवू लागले.

### ६.६.१ पेशवेकालीन मराठी भाषेचे नमुने :

**१. श्रीधर नाझरेकर लिखित श्रीरामविजय :-**

अबलां न कळे संस्कृत वाणी । जैसे आडातील निर्मळ पाणी ।
परि दोर पात्रावाचोनि । अशक्त जनां केवि निघे ।।

ते तडागासी येतां त्वरे । तत्काळचि तृषा हरे ।
अबलाजन तारावया ईश्वरे । प्राकृत ग्रंथ निर्मिले ।
सर्वास मान्य गीर्वाण । जरी असेल पूर्वपुण्य ।
तरीच तेथींचे होय ज्ञान । अबला जन केवि तरती ।।

**२) भाऊसाहेबाची बखर :**

'भाऊसाहेब मृत्यू पावले हे कोणी ऐकिले नाही पाहिले नाही. भगवंत इच्छेकरून त्या शहरातून पार पडून वाचून हर एक कोठे असले तरि निर्माण होतील.'

**३) रामजोशी :**

हटातटाने पटा रंगवुनी जटा धरिशी का शिरी । मठाची उठाठेव का तरी । वनांत अथवा जनांत हो कां मनाते व्हावे परी । हरीचे नाव भवांबुधि तरी ।। काय गळ्यात घालिती तुळशीची लाकडे । ही काय भवाला दूर करितिल माकडे । बाहेर मिरविशी अंत हरिशी वाकडे । अशा भक्तिच्या रसासहित तू कसा म्हणविशी बुधा । हरिरस सांडुनि घेसी दुधा ।।

**४) मोरोपंतांचे आर्याभारत :**

कृष्ण म्हणे, राधेया, भला बरा स्मरसि आज धर्मातें
नीच व्यसनीं बुडता निंदिती देवासि न स्वकर्मातें ।।
जेव्हा सभेसि नेली पांचाली मानिले न मनीं शर्म
तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म ।।

**६.६.२ पेशवेकालीन भाषा विशेष :-**

**स्वरप्रक्रिया :** पेशवेकालीन स्वरप्रक्रिया पुढीलप्रमाणे असलेली पहावयास मिळते.

महाभारत, ट्रिस्टि, कर्तव्य, येश, येथाज्ञान, क्रपा, ठराविला, मृत्य, हेत, माजोरी, पारायेण, बैसला, ठैराव, दिसोन, भरोसा, उदासन, माजोरी, विरुध्य, येथास्थित, सप्तरिसी, द्रुस्टि, इत्यादी.

**पेशवेकालीन व्यंजनप्रक्रिया :**

पुरस्कार, राजकारण, (ज) पुण्याचवळ (ज), फंडच्या (शा) विच्यार, ज्यार, प्रयोज्यन, भोज्यनास, वसोछर्ग, संवछर, औरंगाबाज, लडाई, धाण्या, बातनी(मा), डाळिंभ, भांधून, औशध, सिव्या, काहाडणे, ठहरतील, विज्यापूर, शेनापती, शीमा, वोक, गल, नगी, त्याजकरू इत्यादी.

**नामविभक्तीचे काही नमुने :**

गोष्टी, स्वामी, यादी, हेत इत्यादी.

**४. प्रथमा :** पुणियास, नबाबासी, डेरियासी, साहेबा.
**५. द्वितीया :** जातिनिशी, प्रकारे, घाटे, चोरटियांनी, श्रीमंतांही.
**६. तृतीया :** तलेगावीहून.
**७. पंचमी :** कोण्हाचा, कोणाच्याने

**८. षष्ठी :** रायपुरी, सातारा, रात्रौ, पुणेयांत, कारखानेयांत,

**९. सप्तमी :** खुळ, मातबर, सरदार मातबर इत्यादी.

**१०. विशेषण :** पेशवेकालीन मराठी भाषेत फार्सीच्या धर्तीवर विशेषणाच्या पुढे विशेषण आढळते. उदाहरणार्थ, परिच्छिन्न, अवलिंबे, वरचेवरी, मागती, मधल्यामधी, देखत, जन्मदारभ्य, होयेस्तवर, इत्यादी.

**११. सामान्यरूपे :** पुणेयास, कारखानेयात, उपाध्येचा, बोलणेंयाचा इत्यादी.

**१२. पेशवेकालीन शब्दसंग्रह :** पाय उतारा, पायगोवा, पान्हव, पोटतिडिक, बिराडराखे, भाईचार, थानपिते, भुकेबंग, वारा पाणी, लागभाग, इत्यादी शब्द ही मधून मधून पेशवेकालीन मराठीत भेटतात.

**पेशवेकालीन वाक्प्रयोग :**

पेशवेकालीन मराठी भाषेमध्ये खालील वाक्यप्रयोग पहावयास मिळतात.

खुळ उभे करणे, दुवा घेत असावे, हिसका पडला, गुंता उरकला, ध्यानात भरत नाही, होषा खादणे, कान पाडिणे, मर्यादा न राहाणे असे काही वाक्प्रचार या काळातील भाषेत पहावयास मिळतात.

## ६.७ आंग्लकालीन मराठी भाषा (१८५० - १९५०)

इ.स. १८१८ ला पेशवाई संपली. इंग्रजाची राजवट सुरु झाली. त्यामुळे समाजात सर्व क्षेत्रात परिवर्तन घडून आले. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला. इंग्रजी संस्कृती आणि भाषेचा शिरकाव सर्वत्र वाढला. इ.स. १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. याचा परिणाम मराठी भाषेवर झाला. इतर भाषेचा प्रभाव कमी होऊन इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला. इंग्रजाच्या राजवटीमुळे छापखान्याची सुविधा उपलब्ध झाली. इंग्रजाच्या शैक्षणिक धोरणातून इ.स. १८२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी तर्फे क्रमिक पुस्तके तयार करण्यात आली. बंगालकडील सेरामपूर येथील विल्यम कॅरे यांच्या देखरेखीखाली मराठि - इंग्रजी कोश तयार आला यातूनच मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात झाली.

### ६.७.१ मराठी वाङ्मय चळवळीला सुरुवात :

इंग्रजांची राजवट स्थिर झाली. पुस्तके छपाईची सुविधा उपलब्ध झाल्याने पुस्तके, साप्ताहिके, मासिके, वृत्तपत्रे सुरु झाली. सिंहासन बत्तीशी, रघुजी भोसल्यांची वंशावळ, गीता भावचंद्रिका, इत्यादी पुस्तके छापली गेली. इ.स. १९७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेनी भाषा आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात एक नवयुग सुरु केले. निबंध, चरित्र, कादंबरी, कथा नाटक इ. वाङ्मय प्रकार लिहू लागले. बाळशास्त्री जांभेकरांनी पहिले 'दर्पण' वृत्तपत्र याच काळात सुरु केले. बापू छत्रे, परशुराम गोडबोले, दादोबा पांडुरंग कृष्णशास्त्री, लोकहितवादी, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, गो.ग. आगरकर, शि.म. परांजपे, इत्यादींनी आपल्या वैचारिक निबंध, वाङ्मयाने समाज परिवर्तनात महत्त्वाचे योगदान होते. याचाच परिणाम साहित्य क्षेत्रावर झाला. यातूनच मराठी भाषा आणि वाङ्मय समृद्ध झालेले पहावयास मिळते.

### ६.७.२ आंग्लकालीन मराठी भाषेचे नमुने :

**१) वेळेचा व्यर्थ खर्च लोकहितवादी :**

जेथे हिंदू लोकांचे राज्य आहे, तेथे सर्वत्र न्यायाचा अंध:कार असतो. एवढेच नाही, परंतु विद्येचा व विचारांचा ही असतो. बाहेर होते काय व जाते काय याचा काही एक विचार नसतो. ज्यांचे त्यांचे ज्ञान आपले पुरतेच, आपले घरापुरते असते. त्यास दूसरे काही एक ठाऊक नसते. कोणी म्हणतील की, थोर लोकांच्या पदरी भिक्षुक, भट, शास्त्री, पंडित असतात. परंतु ते लोक निरुपयोगी असतात. शास्त्री जे आहेत त्यास मागील हजारों वर्षाचे ग्रंथ उलटतांनाच पुरे होते; कारण संस्कृत भाषेचे कुलपांत ते असतात.

**२) महात्मा फुले यांचा शिवाजीचा पवाडा :**

"कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याच्या।
छत्रपती शिवाजीचा।।
लंगोट्यास देई जानवी पोषींदा कूणब्यांचा।
काळ तो असे यवनांचा।।"

**३) सावित्रीबाई फुलेकृत जोतिबाचा बोध :**

स्वामी जोतिबांचा। लागे मी चरणी
त्यांची गोड वाणी। मनीं घुमे
महार मागांची। करते मी सेवा
आवडीच्या देवा स्मरुनिया
सेवा सत्यधर्म। देई समाधान
ठेवी शांत मन। आपल रे.

### ६.७.३ आंग्लकालीन मराठी शब्दसंग्रह :

परसा, पावती, बोध, आरसा, प्याजी, दुनावले, लडी, मोती, ताणिले, भवया, हासूं, विषाद, मृग, मोघीले, जडवांची, कडी, भाळवटी, चांभारगोंदी, लेविवले, छपविले, पैका, बिरडी, दोंदीले, दंगेखोर, खमठोकी, साटिवले, ताडपत्रा, शीपाया, शालजोडी, तस्मात, कुळंबी, गंगातरि, टोपकर, भिक्षुकी, व्यय, यजमान, इत्यादी.

## ६.८ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी भाषा (इ.स. १९५० ते २०१०):

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु इंग्रजी राजवटीचा प्रभाव कमी झाला नव्हता कारण ते शक्य ही नव्हते. प्रदीर्घ पावणेदोनशे वर्षाचा मराठी समाजावर झालेला प्रभाव एकदम जाणे शक्य ही नव्हते. इंग्रजी संस्कृती आणि भाषेचा प्रभाव जनमानसावर कायम होता. तो साहित्यावर होणे ही साहजिक होते. ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूरांची मुले शिक्षण घेतल्यामुळे साहित्य लिहू लागले त्यामुळे त्यांची भाषा ही साहित्याची भाषा बनली. याच काळात व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, भावे, गोखले, गाडगीळ, अण्णा भाऊ साठे, उद्धव शेळके, रणजित देसाई, ना.रा. शेंडे, शंकर पाटील, जयवंत दळवी, चि. त्र्यं. खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, शंकरराव खरात, नारायण सुर्वे, दया पवार, आनंद पाटील, बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, राजन गवस, रंगनाथ पठारे, अरुण साधू, सदानंद देशमुख,

नागनाथ कोतापल्ले, नागनाथ पाटील असे असंख्य साहित्यिक या काळात साहित्य लेखन करीत होते.

**६.८.१ स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी शब्दसंग्रह :**

**१) बी. रघुनाथ आडगावचे चौधरी :**

झडपी, करडा, लघळ, सिपरा, बिल्वदळ, चहाटळ, कडोसरी, किटाळ, इरकली, आडवाड, आकडू इत्यादी.

**२) रा. रं. बोराडे यांची पाचोळा :**

अज्जाती, अवचिंद, आयतळ, इस्कोटा, उखटतोंडया, कडुसं, कवर, डांबीसपणा, पीरपीर, बक्कळ, बाजिंदी, बोचकं, बक्कळ इत्यादी.

**३) ना. धो. महानोराची गांधारी :**

कमीजा, कुरवंडी, तुले, तकावी, खोंग, धटिंगण, पयुभाऊ, बाक्कोळ, बारबिजे, बीट, सप्पर, बजांटी, बिघा, बोन, इत्यादी.

**४) कोंडणातलं जिणं नागनाथ पाटील :**

उकटील्यावनी, उबळ, कडबोळ, खदाट, रांडरु, मईद, सटका, टेंबरी, खोडा, उबळ, खदाट, केंडा, सरका, हिदहिद, खिळा, कडबोळ, बुंग, बोंदा इत्यादी.

**५) संभूती बाबू बिरादार :**

अडबंग, आळंक्या, कुंची, कुड्या, इचिदंर, अडबंग, अंजूमन, किरडू, इसताऱ्या, खडान, खणवट इत्यादी.

## ६.९ जागतिकीकरणाच्या प्रभावातील भाषा

मिक्सर, आईस्क्रीम, कुलर, शॉवर, थर्मास, किचन, बेडरुम, गिझर, कुकर, बिअर, लिफ्ट, व्हिस्की, मोबाईल, मोटार सायकल, टेबल, फॅन, सेलफोन, सेल, गेट, टुगेदर, तुज ॲन्ड थ्रो, टि.व्ही. डायनिंग टेबल, इत्यादी अनेक शब्द जागतिकीकरणामुळे मराठीत आलेले दिसून येतात.

**६.९.१ माहिती आणि तंत्रज्ञान काळातील मराठी भाषा :**

२१ वे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शतक आहे. संगणक आणि आंतरजाल ही या काळाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. ज्ञान, माहिती, व्यापार, उद्योग, शिक्षण, अर्थकारण, मनोरंजन, क्रीडा, प्रसारमाध्यमे, जनसंपर्क, यासारख्या विविध क्षेत्रात संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे म्हणूनच या युगाला ‘संगणक युग’ म्हणून ओळखले जाते.

**६.९.२ माहिती आणि तंत्रज्ञान काळातील शब्दसंग्रह :**

वर्ड प्रोसेसिंग, इंटरनेट, वेबसाइट, बुक क्लब, सर्चिंग, ई-मेल, नेटवर्क, केबल ऑनलाइन, कॉम्प्युटर्स, वर्ल्ड वाइड वेब, मल्टिमिडीया इंटरफेस, क्रेडिट कार्ड, इलेक्ट्रॉनिक कॅश, बुक क्लब, ॲप्लिकेशन, महाजाल, सायबरमॉल, हायपर टेक्स्ट मार्क अप लँग्वेज सर्व्हर, युनिकोड, एडिटर, मार्क अप, प्रोग्राम, कन्व्हर्टर प्रोग्रॅम्स, प्रोव्हायडर, संकेत स्थळ,

हायपरटेक्स्ट, लिंक, ॲनिमेशन, सर्च, गणकयंत्र, पिसो, एटीएम, इत्यादी शब्द माहिती आणि तंत्रज्ञान काळातील असलेले पहावयास मिळतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) शिव कालीन मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

## ६.१० समारोप

भाषा ही परिवर्तनशील असते. परिवर्तनशीलता ही भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण असते. भाषा परिवर्तनासाठी स्थळ आणि काळ हे घटक कारणीभूत असतात. या प्रकरणात काळ हा घटक भाषा बदलासाठी कसा कारणीभूत असतो हे अभ्यासण्यासाठी राजकीय राजवटीच्या कालखंडाचा आधार घेतलेला आहे त्यामुळे भाषेचा कालिकभेद अभ्यासण्यासाठी सोयीचे गेले आहे. यादवकाळ, बहामनीकाळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाल, स्वातंत्र्योत्तर काल, जागतिकीकरणाच्या प्रभावातील मराठी भाषा, माहिती आणि तंत्रज्ञानाचा काळ अशी टप्पे पाडून स्थूलपणे भाषिक कालिक भेदाचा अभ्यास केलेला आहे.

## ६.११ संदर्भग्रंथ

१) कुलकर्णी, कृ.पा. : 'मराठी भाषा : उद्गम व विकास', मॉडर्न पुणे, १९६३ चौथी आवृत्ती.
२) गजेंद्रगडकर, श्री. न. : 'भाषा आणि भाषाशास्त्र', व्हीनस, पुणे, १९९१ तिसरी आवृत्ती.
३) कानडे, मु.श्री. (संपा.) : 'मराठीचा भाषिक अभ्यास', स्नेहवर्धन पुणे, १९९४
४) हिरेमठ, राजशेखर : 'भाषा परिचय': मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती, ऑगस्ट, २००७.
५) गोविलकर, लीला : 'वर्णनात्मक भाषाविज्ञान' : आरती प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी, १९९२
६) कदम, महेंद्र : 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान' : स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती, १ जानेवारी, २००३.
७) कालेलकर, ना.गो. : 'भाषा : इतिहास आणि भूगोल' : मौज प्रकाशन गृह मुंबई आवृत्ती, तिसरी १५ डिसेंबर, २०००.
८) इंदापूरकर, चं.द. 'मराठी भाषा : व्यवस्था आणि अध्यापन', कॉन्टिनेन्टल, पुणे १९८९.
९) मंचरकर, र.बा.: 'भाषाशास्त्र विचार युनिव्हर्सल', कोल्हापूर, १९७५
१०) काळे, कल्याण (संपा.) सोमण, अंजली : 'वर्णनात्मक भाषाविज्ञानः स्वरूप आणि पद्धती', गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक १९८५.
११) वाळिंबे, मो.रा. 'सुगम मराठी व्याकरण लेखन', नितिन प्रकाशन पुणे, सुधारित आवृत्ती २०११.

१२) डॉ. जाधव, मा.म. (संपादक) 'साहित्यधारा' इसाप प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती नोव्हेंबर २०१४.
१३) जंबाले डॉ. विठ्ठल-'ग्रामीण साहित्य व ग्रामीण कादंबरीचे स्वरूप' ओम साई प्रकाशन, देगलूर प्रथमावृत्ती २१ डिसेंबर, २०१२

## ६.१२ अधिक अध्ययनासाठी पुस्तके

१) गोसावी, र.रा. : 'मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन, पुणे, १९९९.
२) मालशे, स.ग., इनामदार हे वि.सोमण अंजली : 'भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक' : पद्मगंधा प्रकाशन पुणे, चतुर्थ आवृत्ती २६ ऑक्टोबर २०१०
३) जोशी, प्र. न. 'सुबोध भाषाशास्त्र' : स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती : २४ एप्रिल, २००३.
४) गोरे, दादा : 'आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती.
५) ग्रामोपाध्ये, गं.ब. : 'भाषा-विचार आणि मराठी भाषा', व्हीनस, पुणे, १९६४.

## ६.१३ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) मराठी भाषेचे कालिकभेद कोणते आहेत ते लिहा ?
२) शिवकालीन भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.
३) शिवकालीन भाषा आणि पेशवेकालीन भाषा यातील साम्यभेदाची चर्चा करा.
४) यादवकालीन भाषांचे वेगळेपण स्पष्ट करा.
५) इंग्रजी राजवटीचा परिणाम आंग्लकाळात मराठी भाषेवर कसा झाला ते लिहा ?

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१) शिवकालीन वाक्प्रयोग लिहा.
२) शिवकालीन भाषाभ्यासाची साधन सामुग्री कोणती ते लिहा ?
३) यादवकालीन भाषेची विभक्ती प्रत्ययाची माहिती लिहा.
४) माहिती आणि तंत्रज्ञान काळातील शब्दसंग्रह लिहा.
५) बहामनी कालीन मराठी भाषेचा कोणताही एक नमुना लिहा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इ.स. १८५० ते इ.स. १९५० हा कुठल्या भाषेचा कालखंड आहे ?
२) मराठी-इंग्रजी कोश कोणत्या देखरेखीखाली तयार झाला ?
३) शिवाजी महाराजांचा पोवाडा कोणी लिहिला ?
४) भाषा परिवर्तनासाठी कोणते घटक महत्त्वाचे असतात ?
५) कोणाच्या निबंधमालेने भाषा आणि वाङ्मयाचे नवयुग सुरु केले ?

❖❖❖❖

munotes.in

## एम.ए. भाग - १, सत्र - १
## मराठी अभ्यासपत्रिका क्र. ४
## ऐतिहासिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास
## परीक्षापद्धत

**अ) अंतर्गत चाचणी परीक्षा - ४० गुण**

**आ)सत्रांत परीक्षा - ६० गुण**

**नमुना प्रश्नपत्रिका** **(एकूण गुण : ६०)**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मूलतत्वे स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या बहुभाषिक पुनर्रचन पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

प्र. २ इंडो-युरोपिअन भाषाकुल स्पष्ट करुन अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धांत थोडक्यात स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

जगातील प्रमुख भाषाकुलांची सविस्तर चर्चा करा.

प्र. ३ स्वन संकल्पना स्पष्ट करुन स्वन परिवर्तनाची कारणे लिहा. **(१५)**

**किंवा**

स्वन परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट करुन स्वनपरिवर्तनाचे प्रकार सांगा.

प्र. ४ अर्थपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून अर्थ परिवर्तनाचे जुने वर्गीकरण उदाहरणाद्वारे स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

आंग्लकालीन मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करुन सांगा.

प्र. ५ संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी भाषा अशी भाषेतील स्थित्यंतरे स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

पेशवेकालीन मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

## Document Information

| | |
|---|---|
| **Analyzed document** | Bhashavidnyan Paper IV.pdf (D110480905) |
| **Submitted** | 7/15/2021 12:28:00 PM |
| **Submitted by** | Pandit Rajashri |
| **Submitter email** | rajashree@idol.mu.ac.in |
| **Similarity** | 0% |
| **Analysis address** | rajashree.unimu@analysis.urkund.com |

## Sources included in the report

munotes.in